सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# भारतीय अर्थविश्वात नवा आत्मविश्वास

**'जेपी मॉर्गन' तसेच 'मॉर्गन स्टॅनली' यांसारख्या जागतिक वित्त संस्थांनी भारतीय अर्थव्यवस्था तसेच भारतीय बाजारांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवतानाच, भारताच्या वाढीबाबत नवनवे अंदाज वर्तवले आहेत. येत्या काही काळात भारतीय शेअर बाजारदेखील ऐतिहासिक असा लाखांचा टप्पा पार करेल, हा त्यातीलच एक अंदाज. त्यानिमित्ताने...**

निमित्त

संजीव ओक

'मॉर्गन'ने नुकतीच उदयोन्मुख बाजारपेठांबाबत आपली भूमिका बदलून त्यांना 'ओव्हरवेट' श्रेणीत ठेवले आहे. या निर्णयामागे अमेरिका-चीन व्यापार तणावात आलेली शिथिलता, तसेच अमेरिकी डॉलरच्या तुलनेत वधारलेला रुपया हे घटक कारणीभूत आहेत. 'जेपी मॉर्गन'ने भारताबाबत चांगला दृष्टिकोन ठेवला असून, त्याला गुंतवणुकीच्या दृष्टीने 'सुरक्षित आश्रयस्थान' असेही संबोधले आहे. तसेच, जागतिक व्यापारयुद्धाच्या काळात भारत ही सुरक्षित बाजारपेठ असल्याचे नमूद केले आहे. या दृष्टिकोनामुळे भारतातील गुंतवणुकीसाठी सकारात्मक संकेत मिळत असून, भारताची आर्थिक वाढ, स्थिर चलन आणि नियंत्रित महागाई हे घटक विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहेत, असे म्हणावे लागेल. भारत म्हणूनच उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये एक महत्त्वाचा देश म्हणून उदयास येत आहे.

'जेपी मॉर्गन'च्या या निर्णयामुळे भारताच्या आर्थिक विकासाला आणखी चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचवेळी 'जेपी मॉर्गन'ने भारतीय शेअर बाजार येत्या काळात एक लाखांचा टप्पा पार करेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. भारतीय शेअर बाजारात होत असलेल्या उलाढाली या केवळ आर्थिक आकड्यांपुरत्या मर्यादित राहत नसून, त्या संपूर्ण देशाच्या आत्मविश्वासाचे प्रतीक बनल्या आहेत. 'मॉर्गन स्टॅनली'ने वर्तवलेला अंदाज हा भारताच्या अर्थकारणाची, स्थैर्याची आणि जागतिक गुंतवणूकदारांतील विश्वासाची साक्ष देणारा दस्तऐवज आहे, असे म्हणता येईल.

भारतीय बाजार तेजीकडे झेपावत असून, ती केवळ एकदिवसीय तेजी नाही, तर मागील काही सत्रांतील अस्थैर्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजारात आलेली ही तेजी म्हणजे, भारतीय अर्थव्यवस्थेतील दीर्घकालीन बळकटीचे स्पष्ट संकेत आहेत. शेअर बाजारातील गुंतवणूकदार केवळ वर्तमान परिस्थितीवर नव्हे, तर देशाचे भवितव्य विचारात घेऊन जोखीम घेत असतात. 'मॉर्गन स्टॅनली'सारख्या जागतिक वित्तसंस्थेनेही हाच विश्वास व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, 'बुल केस' अर्थात बाजारात सकारात्मकता कायम राहिल्यास, 'सेन्सेक्स' एक लाखांचा ऐतिहासिक टप्पा पार करू शकेल, असेही त्यांनी म्हटले आहे. ही केवळ एक संख्या नसून, ती भारताच्या आर्थिक वाटचालीतील आत्मविश्वासाची नवनवीन शिखरे गाठण्याची तयारी म्हणता येईल.

गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने राबवलेली उत्पादन आधारित वाढ, डिजिटायझेशन, नवोद्योगांसाठीचे देशांतर्गत पूरक वातावरण, गुंतवणूकदारांसाठी एक खिडकी व्यवस्था आणि अब्जावधी डॉलर्सच्या पायाभूत सुविधांसाठी केलेली मोठी गुंतवणूक या सर्वांचा प्रभाव आता भारतीय बाजारातही स्पष्टपणे दिसू लागला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आर्थिक सुधारणांची जी दिशा ठरवली आहे, तिचा बहुआयामी फायदा देशाला मिळतो आहे. अर्थव्यवस्था ढासळली, बेरोजगारी वाढली, महागाई वाढली अशा घोषणांद्वारे केंद्र सरकारवर विरोधक सातत्याने टीका करत आले आहेत.

विरोधासाठी विरोध हेच त्यांचे धोरण राहिले आहे. मात्र, जागतिक संस्था, गुंतवणूकदार आणि एजन्सीज जेव्हा भारताच्या अर्थव्यवस्थेवर विश्वास व्यक्त करतात, तेव्हा या आरोपांतील फोलपणा उघड होतो. शेअर बाजार हा काही कोणाच्या भाषणावर चालत नाही, तर तो आर्थिक नीतीवर आणि नियोजनावर विश्वास ठेवूनच निर्देशांक दाखवतो.

अमेरिका-चीन व्यापार तणाव, डॉलरची कमकुवत स्थिती, युक्रेन युद्धाचे आर्थिक पडसाद अशा अनेकार्थाने अस्थिरतेने व्यापलेल्या आंतरराष्ट्रीय अर्थविश्वात भारत एक स्थिर, प्रगतिशील आणि विश्वासार्ह अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत आहे. जागतिक कंपन्यांसाठी 'चीन प्लस वन' धोरणामुळे भारताला विशेष फायदा मिळत आहे आणि यामुळेच 'जेपी मॉर्गन', 'गोल्डमन', 'यूपीएस', 'मॉर्गन स्टॅनली' यांसारख्या आंतरराष्ट्रीय नामांकित वित्त संस्थांकडून भारताला विशेष श्रेणी मिळत असल्याचे दिसून येते. (पान ४ वर)

**भारत जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था झाला. देशाची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचल्याचे नीति आयोगाने जाहीर केले. हे यश भारताच्या धोरणात्मक दूरदृष्टीचे, समन्वयित प्रशासकीय निर्णयांचे आणि १४० कोटी जनतेच्या सहभागाचे मूर्त उदाहरण ठरावे. २०१४ सालानंतर केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेला स्थैर्य आणि दिशा देण्यासाठी अनेक निर्णय घेतले. 'गुड गव्हर्नन्स' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली.**



# प्रतिमान

लक्ष्यवेध


कौस्तुभ वीरकर

'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया', 'डिजिटल इंडिया' अशा योजनांनी उत्पादन, नवउद्योजकता आणि तंत्रज्ञान क्षेत्राला चालना दिली. करसुधारणांनी आर्थिक व्यवहार पारदर्शक आणि समृद्ध केलेच. त्याचबरोबर, 'जनधन- आधार- मोबाईल' यामुळे आर्थिक समावेशानात एक क्रांतीही घडली. कठोर कायद्यांनी व्यावसायिक वातावरणात शिस्त आणि विश्वासार्हता निर्माण केली. भारताची झेप हे केंद्र सरकारच्या विकासाचे प्रतिमान आहे. याकाळात पायाभूत सुविधांमधील सुधारणा ही भारताच्या विकासाचे मुख्य सूत्र ठरली. 'गतिशक्ती योजने'अंतर्गत रस्ते, रेल्वे, जलमार्ग आणि विमानतळांचा वेगाने विस्तार झाला. लॉजिस्टिकचा खर्च कपात करत भारताने निर्यातीसाठी अधिक स्पर्धात्मक भूमिका घेतली.

जगात भारताने स्वतःची एक विश्वासार्ह, सकारात्मक आणि सहकार्यप्रधान राष्ट्र म्हणून प्रतिमा निर्माण केली आहे. भारताची एक मोठी जमेची बाजू म्हणजे भारताची प्रतिमा चीनसारखी आक्रमक नाही. विकासाच्या समान संधींवर भारताचा भर असतो. भारत स्थानिक क्षमतेचा सन्मान करतो आणि स्वाभिमानी भागीदारी घडवतो. भारताचा विकास स्वच्छ, पारदर्शक व हितसंबंधांची जपणूक करणारा असल्यामुळे भारत जागतिक नेतृत्वासाठी अधिक योग्य आणि विश्वासार्ह पर्याय म्हणून उदयास येत आहे.

कधीकाळी भारतीय अर्थव्यवस्थेची सुस्तावलेला हत्ती अशी संभावना केली जात असे. परंतु, गेल्या दशकातील धोरणात्माक सुधारणांमुळे आज तो हत्ती धावू लागला आहे. अनेक प्रगत अर्थव्यवस्था मंदावलेल्या असताना भारताने सातत्याने सहा ते सात टक्क्यांच्या दराने वाढ कायम राखली. भारताचा हा वेग केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून, आत्मनिर्भरतेकडून जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करण्याची क्षमता दर्शवतो. ही केवळ सुरुवात आहे, 'विकसनशील' ते 'विकसित' राष्ट्राच्या प्रवासाची. भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी केंद्र सरकारला २.६८ लाख कोटींचा लाभांश जाहीर केला. हा आकडा भारताच्या आर्थिक व्यवस्थापनातील उत्कृष्ट नियोजनाचे उदाहरण आहे.

देशाच्या आर्थिक सक्षमतेचे हे प्रतिबिंबच आहे. यामुळे केंद्र सरकारला आपली राजकोषीय तूट कमी करण्यास मदत होणार असून विकासासाठी अधिक गुंतवणूक करण्याची संधी मिळेल. 'आरबीआय'ला मुख्यत्वे उत्पन्न विदेशी चलनव्यवहार आणि विविध ठिकाणाच्या परतव्यातून मिळते. या वर्षातील आर्थिक व्यवहार आणि परकीय चलनांच्या बदलाच्या परिणामामुळे 'आरबीआय'च्या उत्पन्नात विशेष भर पडली. विशेष म्हणजे या वर्षी 'आरबीआय'ने आपल्या 'सीआरबी'चे प्रमाण (पान ४ वर)





# पाकचे बुडते जहाज...



**भारत आणि पाकिस्तान हे दोन देश एकाच दिवसाच्या अंतराने स्वतंत्र झाले. मात्र, एकाने दहशतवाद्यांना आंदण दिले आणि दुसरा देश हा कायम दहशतवादविरोधी भूमिका घेऊन विकासाची कास धरत प्रगतिपथावर राहिला. मात्र, पाकिस्तान आजही गरिबी, उपासमार आणि पोसलेल्या दहशतवादाच्या दाहकतेने ग्रस्त आहे. पाकिस्तान पुरस्कृत पहलगाम दहशतवादी हल्ल्याला एक महिना उलटून गेला. भारतातील विविध पक्षाच्या नेत्यांची शिष्टमंडळे आता पाकिस्तानच्या खोटेपणाचा बुरखा जगभर जाऊन टराटरा फाडत आहेत. यामध्ये भारतातील विरोधी पक्षातील नेतेही आघाडीवर दिसतात.**

वेधक

तेजस परब

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी काही दिवसांपूर्वी खासदार असदुद्दीन ओवेसी यांचा एक व्हिडिओ पोस्ट करत याच गोष्टीचा पुरावाही दिला होता. भारतातील लोकशाही किती सुंदर आहे, याचे नव्या पिढीने उदाहरण पाहिले, ते 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने. या व्हिडिओत ओवेसी म्हणतात, पाकिस्तानला नक्कल करण्याचीही अक्कल नाही. पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी पाक पंतप्रधानांना एक फोटो भेट दिला. पाकचे राष्ट्रपतीही तिथेच होते. २०१९ सालच्या चीनच्या युद्धसरावाचा एक फोटो भेट देतात आणि सांगतात, हे घ्या भारताविरोधात आम्ही हे युद्ध जिंकलो, असा दावा ते करतात. हा असा पाकिस्तान आहे.पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय बदनामी करणारे हे एकमेव उदाहरण नव्हे. त्यांच्याच एका मंत्र्याने 'टेलिग्राफ' वृत्तपत्राची 'एआय'द्वारे खोटी प्रत तयार करत पाकिस्तानी वायूदलाची स्तुती करणारा मथळा 'ट्विट' केला होता. जो धादांत खोटा निघाला. पाकिस्तानने सुरू केलेल्या दहशतवादी प्रशिक्षण केंद्रांना भारताच्या हवाईदलाने उद्ध्वस्त केल्याचे पुरावेही दाखवण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने स्पष्ट दाखवून दिले की, आम्ही कुठल्याही प्रकारे दहशतवाद खपवून घेणार नाही, ही काळ्या दगडावरील पांढरी रेष. मात्र, यानंतर पाकिस्तानचे शेपूट सरळ होईल का? हा प्रश्न उपस्थित होतो.

पाकिस्तानला सध्या भारतात विशेषतः काश्मीरमध्ये अशांतता माजविण्याचा प्रयत्न करायचा होता. भारताविरोधात तणाव वाढवत काश्मीर प्रश्नावर जगात सहानुभूती अपेक्षित होती. जागतिक पातळीवर पाकिस्तानची तशी कुठल्याही मुद्द्यावर निर्णायक भूमिका नाही. त्यामुळे काश्मीरची ढाल करून अमेरिकेसह अन्य देशांकडे आर्जव करण्याची ही संधी पाकिस्तान सोडू शकत नव्हता. असे केल्याने पाकिस्तानला स्थानिकांचे समर्थन मिळणार होते. इमरान खानला सत्तेतून पायउतार करण्यामागे सैन्याची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे विद्यमान सरकार सैन्याच्या तालावर नाचणार, हे नक्की होते. पाकिस्तानपासून बलुचिस्तान स्वतंत्र व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तिथे स्थानिकांमध्ये प्रचंड रोष आहे. त्या सगळ्यातून लक्ष विचलित करण्यासाठी पहलगाम हल्ला घडवून आणण्यात आला. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला कुणी अर्थतज्ज्ञ गांभीर्याने घेतच नाहीत. त्यामुळे 'आयएमएफ'ची आकडेवारीच केवळ आकलनासाठी शिल्लक राहते. 'आयएमएफ' कर्ज हा एकच स्रोत पाकिस्तानच्या उपजीविकेचे साधन आहे. त्यांनीही पाकिस्तानवर कठोर नियमावली लादली आहे.

पाकिस्तानवर 'आयएमएफ'चा २०२४ सालचा अहवाल भाष्य करतो; ज्यात तिथली गंभीर स्थिती, सरकारचा उद्योग क्षेत्रांमध्ये असलेला प्रमाणापेक्षा जास्तीचा हस्तक्षेप, कमकुवत प्रशासन, राजकीय परिस्थिती, व्यवहारांमधील अपारदर्शकता, यामुळे उद्योग आकर्षित करण्यास पाकिस्तान अपयशी ठरलेला आहे. १९८० सालापासून घसरत चाललेला विकासदर आणि जीवनमान वरचा आलेख गाठण्याचे नाव घेत नाहीत. पाकिस्तानात विदेशी मुद्रा स्थितीही नाजूकच आहे. केवळ दोन महिन्यांची आयात करू शकतील, इतकीच रक्कम शिल्लक आहे.

२०२२-२३ सालापासून वस्तूंच्या किमती सुरुवातीला ३० टक्के त्यानंतर आणखी २३ टक्क्यांनी वाढत गेल्या. २०१५ साली जी आर्थिक स्थिती होती, तशीच स्थिती २०२४ सालीही आहे. सुस्त पडलेल्या मागास देशाने दहशतवादी पोसण्यापेक्षा स्वतःच्या नागरिकांवर खर्च केला असता, तरी स्थिती सुधारली असती. मात्र, त्यांची प्राथमिकता आपल्यापेक्षा कित्येकपटींनी मोठ्या असलेल्या भारताला दहशतवादाने पोखरण्यात व्यस्त दिसते. पाकिस्तानमध्ये अप्रत्यक्ष स्वरूपात सैन्याचेच नियंत्रण आहे. भारतापासून आपल्याला धोका आहे, हे कारण पुढे करत पाकिस्तानी सैन्याचे सर्वच सरकारी यंत्रणांवर वर्चस्व आहे. त्यामुळे पाकिस्तानात निवडणुका घेतल्या तरी निकाल लष्करप्रेमी पक्षाच्या समर्थनार्थच असतो. यंदाही पाकी सैन्याने माजी पंतप्रधान इमरान खान यांना अधिक जागा जिंकूनही शिताफीने सत्तेपासून वंचित ठेवले. आता पाकिस्तानी सैन्य त्यांच्या संरक्षण क्षेत्रातील निधीत वाढ करून घेत आहे. त्यामुळे भविष्यात पाकिस्तान 'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या दणक्याने सुधारेल, असे तरी चित्र नाही. त्यासाठी त्यांची झोप रात्री बेरात्री उडवणे गरजेचेच. पण, पाकिस्तानी सैन्याच्या या कृत्यांमुळे देश अधिकच गरीब होत चालला आहे. दुसरीकडे भारत नुकताच जगातील चौथी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून अभिमानाने पुढे आला. जपानसारख्या देशालाही भारताने मागे सारत हा विक्रम गाठला. भारतापुढे आता फक्त जर्मनी, चीन आणि अमेरिका अशी चढत्या क्रमावरील देश. 'एआय', उत्पादन क्षेत्र, माहिती-तंत्रज्ञान, संरक्षण, सेवा अशा विविध क्षेत्रांमध्ये भारताची उत्तुंग कामगिरी कुठे आणि महागाईने पोळलेल्या पाकिस्तानची अवस्था कुठे... त्यातच पाकिस्तानने गळ्यात घातलेला 'सीपेक' नामक चीनचा पट्टा हळूहळू अधिक घट्ट होत जाईल. (पान ४ वर)

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

# खबर सिंधची

गेल्या आठवड्याच्या लेखात आपण पाकिस्तानचा बलुचिस्तान हा प्रांत कसा स्वतंत्र होऊ पाहात आहे, याचा आढावा घेतला होता. आता खबर घेऊया सिंध प्रांताची. गुलाम मूर्तझा सय्यद किंवा जी. एम. सय्यद या नावाने जास्त परिचित असलेल्या सिंधी मुसलमान नेत्याने १९७२ सालीच 'जिये सिंध तहरीक' अशी चळवळ सुरू करून वेगळ्या 'सिंधू देशा'ची मागणी केली होती. १९७१ साली बंगाली भाषिक मुसलमानांचा बांगलादेश निर्माण झाला. तसाच आम्हा सिंधी भाषिक मुसलमानांना वेगळा सिंधू देश हवा, अशी त्यांची मागणी होती. पाकिस्तान सरकारने सय्यदना त्यांच्या घरातच कैदेत टाकले आणि त्यांच्या असंख्य अनुयायांना ठार मारले.

महाभारताच्या काळात त्या प्रांताचे नाव होते सिंधू देश. त्याची राजधानी होती वीतभय. म्हणजे जिथून भय, भीती दूर निघून गेले आहे ती. त्या राज्याच्या राजाचे नाव होते वृद्धक्षात्र. हा राजा आपला कर्तबगार राजपुत्र जयद्रथ याला राज्यावर बसवून तपस्या करण्यासाठी वनात निघून गेला. राजा जयद्रथ याने आपल्या पराक्रमाने शेजारची सौबीर आणि शिबी अशी दोन राज्ये आपल्या राज्याला जोडून घेतली. त्यामुळे त्याला सिंधू-सौबीर नरेश जयद्रथ असे म्हणू लागले.

सौबीर म्हणजे आजचा कच्छ आणि सौराष्ट्र. अशा पराक्रमी राजाला हस्तिनापूरचा राजा धृतराष्ट्र याने आपली शंभर पुत्रांनंतर झालेली कन्या दुःशला देऊन जावई करून घेतले. तिथेच गडबड झाली. जयद्रथ दुर्योधन-दुःशासन यांचा मेव्हणा बनला आणि त्यांच्याचसारखा वागू लागला. असो. पुढचा इतिहास आपल्याला माहीतच आहे. या झाल्या महाभारतकालीन म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वीच्या गोष्टी. इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकात म्हणजे

आजपासून साधारण अडीच हजार वर्षांपूर्वी जग जिंकायला निघालेल्या अलेझांडरचा सामना याच सिंधू देशाचा सम्राट पुरू (पोरस हा भ्रष्ट उच्चार) याच्याशी झाला. शेकडो प्रशिक्षित लढाऊ हत्तींच्या वर स्वार होऊन लढणाऱ्या सिंधी वीरांनी अलेक्झांडरच्या तोंडाला फेस आणला. मात्र, सम्राट पुरूचा हत्ती ग्रीक सैनिकांच्या वेढ्यात सापडला आणि त्यांनी तो पळवत-पळवत थेट ग्रीक छावणीत आणला. एवढ्यावरूनच असे म्हटले जाते की, पुरू पराभूत झाला. इसवी सन ७११७१२ मध्ये आक्रमक अरब मुसलमानांची पहिली जमिनीवरची स्वारी सिंधवर धडकली. यावेळी मात्र राजा दाहीर किंवा दाहीरसेन हा पराभूत झाला. यानंतर क्रमाक्रमाने तुर्क, अफगाण आणि इराणी मुसलमान सिंधवर धडक राहिले. सिंधी हिंदू पराभूत झाले, पण समूळ संपले मात्र नाहीत. पुढच्या खलजी, तुघलख, लोदी आणि बाबरापासून पुढच्या मुघल बादशहांच्या काळात सिंध सतत या ना त्या सल्तनतींच्या गुलामीतच जखडलेला होता.

१८ व्या शतकात दिग्विजयी मराठी फौजा दिल्लीवरून पुढे पंजाबात पेशावर आणि अटकेपर्यंत पोचल्या. पण पश्चिमेकडे त्यांची धडक गुजरात नि पुढे सौराष्ट्रापर्यंतच पोचली. आणखी थोडा अवधी मिळाला असता, तर ते नक्कीच पुढे कच्छ आणि सिंधपर्यंत पोचले असते. पण... पण सिंधचा असा नाही तसा महाराष्ट्राशी संबंध यायचाच होता. ईस्ट इंडिया कंपनीने हळूहळू अख्खा भारतच गिळला. साधारणपणे ज्या क्षेत्रातल्या सेनापतीने जो भाग जिंकला असेल, त्या क्षेत्राकडेच त्या नव्या भागाचे प्रशासन सोपवायचे, असा इंग्रजांचा खाक्या होता. सन १८४० च्या सुमारास सिंध प्रांतातल्या अनेक सरदार-जहागिरदारांनी ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध बंड पुकारले. तेव्हा गव्हर्नर (जनरल लॉर्ड ॲलनबरो याने तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील बॉम्बे आर्मीचा प्रमुख सेनापती जनरल चार्ल्स नेपियर याला, ती बंडे मोडून काढण्याचा हुकूम दिला.

जनरल नेपियर यावेळी ६० वर्षांचा होता. पण तो इतका तडफदार होता की, त्याने नुसतीच बंडे मोडण्याऐवजी सिंध आणि जोडीला बलुचिस्तान दोन्ही प्रांत सरळ कंपनी सरकारच्या साम्राज्याला जोडून टाकले. यालाच म्हणतात, 'न रहेगा बाँस, न बजेगी बाँसुरी.' अशा तऱ्हेने सन १८४३ मध्ये मुंबई इलाख्याला जोडला गेलेला सिंध प्रांत थेट



जी. एम. सय्यद

सन १९३६ पर्यंत मुंबई राज्याचा भाग होता. मॅट्रिकच्या नि विद्यापीठाच्या परीक्षा द्यायला विद्यार्थी कराचीहून मुंबईला यायचे. खरे म्हणजे सगळे ठाकठीक होते. पण हळूहळू सिंधी लोकांच्या पोटात दुखायला लागले. आम्हाला मुंबई राज्यातून वेगळे करा, अशी त्यांची इंग्रज

सरकारकडे पिरपिर सुरू झाली. थांबा! मी सिंधी लोकांची पिरपिर असे म्हटले, ते अधिक स्पष्टपणे सांगायला हवे. सिंधी मुसलमानांची पिरपिर सुरू झाली, असे म्हणणे जास्त बरोबर ठरेल. लारकाना हे सिंध प्रांतातले एक मोठे नि महत्त्वाचे शहर आहे. तिथे फेब्रुवारी १९२० मध्ये काँग्रेसचे पुढारी मौलाना आझाद आणि मौलाना शौकत अली यांनी एक जंगी सभा घेऊन मुसलमानांना आवाहन केले की, तुर्कस्तानमध्ये खिलाफत ही संस्था रद्द करण्यात आली आहे तर भारतातल्या मुसलमानांनी या घटनेचा जोरदार निषेध केला पाहिजे. या जंगी सभेचा गुलाम मूर्तझा सय्यद नावाच्या एका कोवळ्या तरुणावर जबरदस्त परिणाम झाला. अवघ्या १६ वर्षांच्या या मुलाने

लगेच मार्च १९२० आपल्या सना या गावी खिलाफत चळवळीच्या समर्थनासाठी सभा आयोजित केली.

तेव्हापासून सिंध प्रांतातल्या मुसलमानांना नेता मिळाला- जी. एम. सय्यद. पुढे सिंधी मुसलमानांनी आम्हाला मुंबई राज्यापासून वेगळे करा, अशी जी मागणी सुरू केली, तिच्या मुळाशी ही भावना होती की, मुंबई राज्यात सत्ता इंग्रजांची असली, तरी व्यापारासह इतर सर्वच क्षेत्रात हिंदू लोक पुढे आहेत. त्यामुळे आम्हाला म्हणजे मुसलमानांना पुढे सरसावायला वाव मिळत नाही. इंग्रज सरकारने बराच काळ या मागणीकडे दुर्लक्ष केले. १९३६ साली मात्र त्यांनी ही मागणी मान्य करून सिंध प्रांत मुंबई राज्यातून वेगळा काढला.

आता सिंधचे वेगळे प्रांतिक कायदेमंडळ अस्तित्वात आले. १९३७ साली जी. एस. सय्यद या कायदेमंडळावर निवडून आले. १९३८ साली त्यांनी रीतसर मुस्लिम लीग या पक्षात प्रवेश केला आणि १९४० साली ते सिंध प्रांताचे शिक्षण मंत्री बनले. त्याचवर्षी मुस्लिम लीगने, आम्हाला पाकिस्तान हा वेगळा देश हवा, अशी मागणी अधिकृतपणे पक्षाच्या लाहोर अधिवेशनात मांडली. पुढच्या सात वर्षांत बॅरिस्टर जीनांनी अचूक खेळ्या करीत, नेभळट हिंदू नेत्यांना घाबरवून सोडत आणि इंग्रजांच्या सक्रिय सहकार्याने, पाकिस्तान कसा अस्तित्वात आणला, हे आपल्याला माहीतच आहे. या सगळ्या वाटचालीत जीनांना खरा जोरदार पाठिंबा दिला तो उत्तर प्रदेशातल्या मुसलम ानांनी आणि मग त्या खालोखाल पंजाबी आणि सिंधी मुसलमानांनी.

नवनिर्मित पाकिस्तानची राजधानी कराची हे सिंध प्रांतातले शहर राहील, हा निर्णय जीनांचा होता. मुस्लिम लीगच्या पंजाबी नेत्यांना तो फारसा पसंत नसावा. पण पाकिस्तान निर्मितीनंतर अवघ्या १३ महिन्यांत जीना मरण पावले. मग पंजाबी मुसलमान नेत्यांनी आपले दात आणि नखे एकदमच बाहेर काढली.

पाकिस्तानच्या सर्व क्षेत्रातील सर्व सत्ता स्थानांवर फक्त पंजाबी मुसलमानांचाच भरणा होऊ लागला. तेव्हा मग जी. एम. सय्यद सारख्या नेत्यांना जाणवू लागले की, हा देश मुसलमानांचा नसून फक्त पंजाबी मुसलमानांचा आहे. इथे आपणा सिंध्यांना काही भवितव्य नाही. उगाच त्या सिंधी हिंदूंना दूर लोटले. हे कळेपर्यंत १९५८ साल उजाडले. पाकिस्तानी

सैन्यातला एक महत्त्वाकांक्षी सेनापती जनरल मुहम्मद अयुब खान याने बंड पुकारून राष्ट्राध्यक्ष इस्कंदर मिर्झा याला पदच्युत केले आणि सत्ता हाती घेतली. भ्रमनिरास झालेल्या जी. एम. सय्यदनी इथून पुढे सिंधी भाषिक मुसलमानांना एकत्र करुन त्यांचा एक दबाव गट बनवण्याचा खूप प्रयत्न केला. आंदोलने केली, तुरुंगवास भोगला, पुस्तके लिहून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

१९७१ मध्ये बंगाली भाषिक मुसलमानांचा, भारताच्या मदतीने, बांगलादेश बनल्यावर त्यांना परत आशा वाटू लागली. १९७२ साली 'जिये सिंध तहरीक' सुरू करून त्यांनी झुल्फिकार अली भुत्तोंना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला. भुत्तोसुद्धा सिंधी भाषिक होते. पण भुत्तो उच्चशिक्षित, अतिश्रीमंत, खानदानी जमीनदार घराण्यातले, जगभर भाषणे करीत हिंडणारे; नि जी. एम. सय्यद जमीनदार असले तरी एकंदर सामाजिक प्रतिष्ठेत भुत्तोंपेक्षा कमीच. म्हणून बहुधा भुत्तोंनी सय्यदना बरोबर घेतले नाही. पुढे सिंधी भुत्तोंना पंजाबी झिया-उल-हकने फासावर लटकावले.

जी. एम. सय्यद १९९५ साली घरातच नजरकैदेत मरण पावले. सांई म्हणजे आदरणीय. सय्यद यांचे अनुयायी त्यांना सांई सय्यद म्हणून ओळखतात. आपले मराठी लोक सगळ्या उत्तरप्रदेशी लोकांना 'भय्या', सगळ्या कानडी लोकांना 'अण्णा' म्हणतात, तसेच सगळ्या सिंध्यांना 'सांई' म्हणतात. सय्यद यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या 'जिये सिंध तहरीक'मधून 'जिये सिंध कौमी महज' हा राजकीय पक्ष निघाला. पण २००० साली त्यातून 'जिये सिंध मुत्ताहिदा महज' हा पक्ष वेगळा झाला. पुन्हा २००६ साली आणखी फूट पडून 'जिये सिंध कौमी महज (असरार)' हा वेगळा पक्ष निर्माण झाला.

या अशा भांडणांमुळे त्यांच्या चळवळींचा प्रभाव मर्यादितच राहिला आहे. पंजाबी मुसलम ान बलुचींप्रमाणे नि पठाणांप्रमाणेच सिंध्यांनाही चेपत असतात. १९५९ साली हुकूमशहा अयुब खानने देशाची राजधानी सिंधच्या कराचीहून पंजाबच्या रावळपिंडीत हलवली. सिंधी नेते मनगटे चावण्यापलीकडे काहीही करू शकले नाहीत. पाकिस्तानी राजकारणाप्रमाणेच पाकिस्तानी लष्करातही सिंधी सेनापती नि सिंधी सैनिक अत्यल्प आहेत. लढाऊ हत्तींवरून अलेक्झांडरशी झुंजणारे सिंधी एवढे प्रभावहीन का बरे झाले? हिंदुत्वापासून दूर गेल्यामुळे तर नव्हे? (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

# एक पर्याय असतोच



आता माझ्याजवळ काहीच पर्याय नाही. झाले सारे काही संपलेय. आता माझ्यासमोर मला केवळ अंधार दिसतोय. काहीही होऊ शकत नाही. माझे नशीबच असे आहे. काय करावे? मी कितीही प्रयत्न केला तरी नेहमी असेच होते. माझ्या नशिबातच देवाने एवढे लिहिले असेल तर कुणी काय करू शकते? शेवटी नशिबाच्या पुढे मानव हतबलच असतो. 'समय से पहले और तकदीर से ज्यादा किसी को कुछ नहीं मिलता' असे कुणीतरी म्हटलेय ते अगदीच खरे आहे. मी शेवटी एक मानव म्हणून नशीबरूपी शक्तीच्या हातातील बाहुलेच आहे. त्यामुळे त्या एका बिंदूवर पोहोचल्यानंतर सारे त्याच्या हातात असते.

आपल्या हातातून सारे काही निसटून जाते. मी माझ्या संपूर्ण क्षमतांचा वापर केला, परंतु शेवटी माझा मार्ग या अशा डेड एंडवर येऊन थांबलाच. आता पुढे काहीही नाही. मला या संकटाला सामोरे तर जावेच लागणार आहे. कोणताही पर्याय नाही. आता येथून पुढे जाणे म्हणजे मरण्याशिवाय काहीच पर्याय नाही. १०० टक्के मरण हाच पर्याय आहे. निरमा नाव असलेल्या आणि एका कोणत्या तरी कारणामुळे मनाने संपूर्णपणे खचून गेलेल्या एका मुलीचे हे सारे नकारात्मक विचार ऐकून आर्टिस्ट नावाचा तिजोऱ्या फोडणारा, परंतु व्यंजने बनविण्याची आवड असलेला एक चोर तिला अफलातून एक धडा शिकवितो. 'चॉपस्टिक' नावाच्या एका अत्यंत गोड चित्रपटातील हा प्रसंग आहे. एका अफलातून विचित्र प्रसंगामध्ये ही बिचारी निरमा अडकते व त्यामधून बाहेर पडण्यासाठी तिला आर्टिस्ट हे नाव असलेल्या एका चोराची मदत घ्यावी लागते. तो तिला त्या प्रसंगातून बाहेर काढताना, एका ठिकाणी मार्ग संपल्यासारखी स्थिती निर्माण होते व त्यावेळी घाबरून जाऊन निरमाच्या या नकारात्मक बडबडीमुळे चिडून जाऊन हा आर्टिस्ट तिला धडा शिकवितो. आपल्या जीवनात काही वेळेला असे प्रसंग येतात, ज्यावेळी समोरच्या सर्वच वाटा बंद झाल्यागत स्थिती निर्माण होते. प्रत्येकाच्याच आयुष्यात असे प्रसंग येत असतात. या प्रकारच्या मनःस्थितीतून कुणी सुटत असेल, असे वाटत नाही. असल्या प्रसंगांना सामोरे जाताना अशा अनेक बाबी असतात, ज्याचा आधार कामी येतो. त्या बाबी त्या विशिष्ट प्रसंगाशी किंवा घटनेशी संबंधितच असतील असेही नाही. अशा कठीण प्रसंगी आपण असल्या स्थितीला सामोरे जाणे हे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवरदेखील अवलंबून असते. काही अकारण निर्माण करून ठेवलेले भयगंड याला कारणीभूत असतात. अशा अडकून गेलेल्या स्थितीमधून बाहेर तर आपल्याला पडावे लागते, आलेल्या स्थितीला तोंड द्यावेच लागते.

एक नवा चष्मा आपल्याला मिळतो ज्यामधून आपल्याला तीच गोष्ट नव्या पद्धतीने बघता येते. मग आपण त्या अडचणीच्या परिस्थितीवर मात करण्याचा आत्मविश्वास प्राप्त करतो. आत्म विश्वास हीच ती गुरुकिल्ली असते, जी कोणत्याही स्थितीमध्ये मार्ग शोधण्याची क्षमता आपल्याला प्रदान करते. ही दृष्टी प्रदान करणे ही छोटीशी बाब असली, तरी अडचणीच्या स्थितीमध्ये अडकलेलो असताना आपल्याला ती सुचत नसते. अशावेळी एखादा बाह्यस्रोत आपल्याला त्याची आठवण करून देतो. निरमा नावाच्या त्या मुलीच्या बाबतीत तो आर्टिस्ट नावाचा चोर नेमके हेच करतो. तिची ही नकारात्मक बडबड ऐकून तो तिच्या हाताला धरून तिला त्या दहाव्या मजल्यावरील खोलीच्या बाहेर काढतो. तिला असे वाटते की, तो तिला घरातून हाकलून लावतो आहे. परंतु तो तसे करत नाही. तो तिला धरून आणखी काही मजले वर असलेल्या टेरेसवर ओढत घेऊन जातो. ती ओरडत राहते, परंतु तो तिचे काही एक ऐकत नाही. सर्वात वरच्या मजल्यावरील गच्चीवर तो तिला आणतो. साधारण पाच फूट उंचीची पॅरापीट वॉल तेथे असते. एका ठिकाणी त्या पॅरापीट वॉलच्या जवळ काही पोती पडलेली असतात. त्या पोत्यांवरून तो तिला वर चढवतो. ती घाबरते. तो तिला पॅरापीट वॉलवर उभे करतो व स्वतः तिच्या बाजूने त्या वॉलवर उभा राहतो. तिचा हात त्याने धरून ठेवलेला असतो. आपण विचार करू शकतो की, आधीच अडचणीने थकून गेलेल्या त्या बिचाऱ्या निरमाचे काय होत असेल? १५ मजली इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावरील गच्चीवरील पॅरापीट वॉलवर उभे राहून खाली बघितल्यावर तिला तर गरगरायला होते. ती गच्च डोळे मिटून घेते. तो तिला विचारतो, 'तुझ्या म्हणण्याप्रमाणे येथून उडी मारल्यावर आपल्याला मरण्याशिवाय काही पर्याय आहे का?' तिलाही वाटते, हा काय प्रश्न आहे आणि ही काय जागा आहे असला प्रश्न विचारण्याची! ती बिचारी घाबरत असते आणि तो तिला पुन्हा पुन्हा विचारतो, 'तुझ्या मतानुसार येथून उडी मारल्यावर मरणाशिवाय काही पर्याय आहे का?' ती ओरडून 'नाही - नाही' म्हणते. काही वेळ तिला तसेच घाबरलेल्या स्थितीत ठेवून नंतर तो अचानक तिचा हात धरून, उलट दिशेने वळून पॅरापीट वॉलच्या आतल्या बाजूने उडी मारतो. ती चकित होते. तो तिचा हात सोडून देतो व आतापर्यंत तिच्यासोबत अत्यंत उद्धटपणे व्यवहार केलेला आर्टिस्ट तिला शांतपणे समजावतो... 'मी तुला उडी मारण्यासंबंधी सांगितले होते. आपण आतल्या बाजूने तर उडी मारू शकतो. परिस्थिती कोणतीही असो, एक पर्याय नेहमी उपलब्ध असतो.' कायम घाबरत घाबरत जगणाऱ्या निरमाच्या आयुष्यात तिला मिळालेला हा छोटासा, परंतु अत्यंत महत्त्वाचा धडा असतो. निरमाचे व्यक्तिमत्त्व अशा पद्धतीचे असते की, बहुतांश परिस्थितींमध्ये तिला आनंदापेक्षा भीतीचा आभास जास्त प्रमाणात होत असतो. आपला संपूर्ण आत्मविश्वास जवळपास गमावलेली, कोणतेही काम करताना बावरून जाणारी, आपले मत सक्षमतेने व्यक्त न करू शकणारी, स्वतःहून निर्णय न करू शकणारी, छोट्या छोट्या निर्णयांसाठीदेखील कायम कुणाच्या तरी परवानगीची वाट बघणारी, स्वतःमधील क्षमता माहीत असूनही कोणत्या तरी अनामिक दडपणामुळे त्यांचा वापर करण्यास न धजावणारी व या सर्व प्रकारांमुळे स्वतःचा विकास न करू शकणारी असे निरमाचे व्यक्तिमत्त्व असते. परंतु आर्टिस्टने शिकविलेल्या धड्यामुळे तिचे जीवनच बदलून जाते. चित्रपटाच्या पुढील भागात तिच्या बाबतीत निर्माण झालेल्या संकटावर ती मात करते व त्या निमित्ताने तिचे व्यक्तिमत्त्व पार बदलून जाते. कारण तिला आर्टिस्टने शिकविले असते... एक पर्याय असतोच!

खरे तर किती छोटासा विचार आहे, परंतु या विचाराच्या आधारे आपल्या आयुष्यात येणाऱ्या कोणत्याही परिस्थितीवर मात करण्याचे मन मात्र तयार होऊ शकते. शेवटी खेळ सारा मनाचाच आहे. वेगवेगळ्या प्रकारचे भयगंड बरेच वेळा मनामध्ये रुजलेले किंवा रुजविलेले असतात. त्या भयगंडांचा पगडा इतका जास्त असतो की, त्याच्यापुढे कोणतेही तत्त्वज्ञान किंवा विचार ते भयग्रस्त मन स्वीकारतच नाही. आपल्या जीवन जगण्याच्या व माणूस म्हणून स्वतःला विकसित करण्याच्या मूलभूत अधिकारांचादेखील कधी कधी या भयांमुळे विसर पडतो. अमूक एक गोष्ट मी केली तर मी संपलो, असा विचार करीत करीत अनेक गोष्टी करायच्या राहून जातात. मग वेळ निघून गेल्यावर उरतो तो केवळ पश्चात्ताप. अर्थात या पश्चात्तापावर तोडगा म्हणजे माझ्या नशिबात एवढेच आहे, अशी आपल्याच मनाची घातलेली समजूत. ही समजूत फार काळ टिकत नाही. आपण जे गमावले आहे त्याचे दुःख मात्र कायम टोचणी देत राहते. त्यापेक्षा ज्यावेळी आता यापुढे काहीच नाही, अशी स्थिती निर्माण होते, त्यावेळी एक पर्याय असतोच, हा मंत्र उराशी बाळगला तर अनेकांना निरमासारखे स्वतःला बदलता येईल आणि मग आत्मविश्वासाने कोणत्याही अनामिक दडपणाशिवाय मनमोकळा श्वास घेता येईल. तो आयुष्यातील सर्वोत्तम सकारात्मक बदल ठरेल.


---

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

# राष्ट्र देवो भव

भारतीय विचार परंपरेचा गाभा कृतज्ञतेचा आहे. जे जे काही आपल्या जीवनाला आधार आणि आकार देणारं, जीवन सुकर आणि सुखकर करणारं, सार्थ आणि कृतार्थ करणारं आहे ते ते सारंच दिव्य आहे. त्या त्या मूर्त अमूर्त सर्वांप्रती मनात कृतज्ञता भाव जोपासला जावा. आपलं शरीर धारण करणारी माता आणि पृथ्वी या दोघी प्रथम वंदनीय आहे तसेच ज्याच्या छत्रछायेत आपलं लालनपालन होतं तो पिता आणि आकाश यांना नमन. ज्याच्यामुळे आयुष्याची दशा सुधारते आणि जीवनाला दिशा मिळते त्या आचार्याला प्रणिपात. आणि हे सगळं ज्या भूमीवर घडतं, जी आपल्याला सर्व प्रकारची संसाधनं उपलब्ध करून देतो, आपली अस्मिता जागृत करते, ज्यात आपली नाळ गाडलेली असते, तो आपली ओळख असलेला भूप्रदेश म्हणजे आपलं राष्ट्र! त्या 'राष्ट्राला देव मानणारी/रा तू हो' हा राष्ट्रभक्ती जागवणारा संस्कार आपल्यावर अनेक सहस्त्रकांपासून करण्यात आलेला आहे.




राष्ट्रासाठी प्राणांची आहुती देण्यास तत्पर

आधुनिक काळात कार्ल मार्क्स नावाच्या एका माणसानं मांडलेल्या विचारांचा पगडा असलेले, स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारे अनेक वैचारिक गोंधळी कन्ट्री आणि नेशन म्हणजे देश आणि राष्ट्र या दोन शब्दांचा गोंधळ मांडतात. आपल्या दुर्दैवानं आपण त्यांच्या या सगळ्या कारस्थानाचा बळी ठरत असतो. संस्कृत भाषा आणि तिच्यातून उगम पावलेल्या भारतीय भाषांत देश आणि राष्ट्र ही विभागणी अगदी स्पष्ट आहे. देश हा भौगोलिक संदर्भ आहे. म्हणजे देशाच्या चतुःसीमा, त्यात असलेली संसाधनं, लोकसंख्या, राजनैतिक आणि प्रशासनिक व्यवस्थेचं नियंत्रण या सगळ्याचा समावेश होत असतो. म्हणूनच कोणताही निर्णय घेताना तो देश कालपरत्वे घ्यावा, असं म्हटलं जातं. म्हणजे जी भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती आणि निर्णय घेण्याच्या क्षणाला जी परिस्थिती आहे त्या वेळेनुसार केलेला निर्णय असा होतो. तर, राष्ट्र ही संकल्पना अधिक व्यापक आणि समावेशक आहे. यात व्यक्ती आणि ती ज्या ठिकाणी लहानाची मोठी होते तो सगळा प्रदेश, तिच्यात नांदणारी सगळी चराचरात सृष्टी आणि समाज, या दोघांतले संबंध यांचा विचार प्राधान्यानं केला जातो. यात त्या व्यक्तीच्या सभोवतालाचा तिच्यावर सतत परिणाम होत असतो. त्याची परिणती म्हणजे तिच्या अस्तित्वाचा एकूण एक पैलू घडत जातो. त्यातून तिला व्यक्तिमत्त्व लाभतं. म्हणजे तसं पाहिलं गेलं, तर आसपासच्या वातावरणाचा बहुतांश भाग तिच्यात सामावलेला असतो. नव्हे, तो त्या व्यक्तीच्या गुणसूत्रांचा म्हणजेच डीएनएचाच अमूर्त भाग होऊ राहतो. तो सतत तिच्या विचार करण्याच्या पद्धतीतून आणि बोलण्या-वागण्यातून प्रतिध्वनित होत असतो. इंग्रजीत यालाच 'कल्चर' असा शब्दप्रयोग आहे. मातृभूमी आणि तिच्या वातावरणाविषयी मनात रुजलेली आपुलकी, समाजाच्या नीतिनियम चौकटीच्या स्वीकारातून मिळविलेली कर्तव्यं आणि अधिकार या सगळ्याचाच विचार होतो. म्हणजेच राष्ट्र ही आपल्या अस्मितेशी जुळलेली संकल्पना आहे. देश हा निसर्गाच्या कृपेनं मिळतो, राष्ट्र हे जाणीव आणि निष्ठापूर्वक केलेल्या प्रयत्नांतून उभं करावं लागतं.

आजच्या तंत्रज्ञानाच्या भाषेत बोलायचं तर देश हे 'हार्डवेअर' आहे तर राष्ट्र हे 'सॉफ्टवेअर.' मानवतेची सर्वात प्राचीन अभिव्यक्ती असलेल्या ऋग्वेदात वाक् आम्भृणी रचित देवी सूक्तात'अहं राष्ट्री सङ्गमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम्।' 'मी राष्ट्रशक्ती आणि ती चेतना आहे जी वसूंना (समृद्धीच्या देवता) शक्ती आणि प्रेरणा प्रदान करते. ज्यामुळे ते समर्थ होऊन समृद्ध होतात. त्यामुळे मी यज्ञाद्वारे प्रसन्न करून घेतल्या जाणाऱ्या देवतांमध्ये सर्वप्रथम आहे.' ही ऋचा 'राष्ट्र' ही एक चैतन्यमयी, प्रेरणादायक शक्ती, सामर्थ्य आणि समृद्धी या सर्वांच्या उत्तम गुणांचा संगम आणि समन्वय असल्याचं परिभाषित करते. या राष्ट्रीचा आविष्कार आपण 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्तानं पाहिला. ज्या क्षणी आतंकवाद्यांनी पहलगामात हिंदू पर्यटक स्त्रियांच्या पतींना गोळ्या घातल्या आणि 'जा जाऊन मोदीला सांगा, आम्ही तुम्हाला कसं विधवा केलं ते' असं म्हटलं, त्याक्षणी या सर्वांच्या पाठीशी राष्ट्र उभं राहिलं. या आतंकी हल्ल्यात प्राणोत्क्रमण झालेल्या देशवासीयांच्या अपमानाचा सूड घेताना एका अद्वितीय अशा युद्धनीतीची योजना आखून कमीत कमी हानीत शत्रूला हाणण्यात आपण कोणतीच कुचराई केली नाही. देशात बसून देशाच्या सीमेबाहेरची आतंकवाद्यांची




शक्ती-युक्ती आणि संकल्पसिद्धीची घोषणा

ठाणी एक मीटरच्या त्रुटीसह अचूक निशाणा धरून उद्ध्वस्त करण्यात आली. त्यासाठी लागणारं तंत्रज्ञान, तांत्रिक कौशल्य, विविध शाखा आणि विभागांचा समन्वय (कोऑर्डिनेशन), कूटनीतीचा अवलंब करून आखलेल्या योजनेत तसूभरही उणीव राहू न देता अतिशय वेगानं केलेली अंमलबजावणी, प्रत्यक्ष कारवाईदरम्यान आपल्या सैन्यापैकी एकाचीही प्राणहानी न होता आतंकवाद्यांची पाळंमुळं निखंदून काढली गेली. हा सगळाच शक्ती-युक्ती आणि संकल्पसिद्धीचा एक अद्भुत खेळ होता. सगळ्या जगानं आश्चर्यानं तोंडात बोटं घालावीत, असा हा प्रयोग हे आपल्या राष्ट्राच्या राष्ट्रीचं म्हणजेच राष्ट्रशक्तीचं प्रकट होणंच होतं. गेल्या ११ वर्षांपासून सुरू असलेल्या 'राष्ट्र आराधने'च्या सुफलनाची ही सुरुवात आहे. याची सुरुवात झाली ती अतिशय कटू आणि कठोर निर्णय घेण्यातून. आर्थिकदृष्ट्या भारत सक्षम व्हावा म्हणून जीएसटी आणि नोटाबंदी हे दोन महत्त्वाचे निर्णय राबविण्यात आले. राष्ट्रीय सुरक्षा अधिक सुदृढ आणि सबल व्हावी म्हणून सेनेकरिता भक्कम आर्थिक तरतुदी करून विविध शक्तिशाली शस्त्रास्त्रांची खरेदी आणि भारतीय बनावटीची स्वदेशी तंत्रसिद्धता यावर प्रयत्नपूर्वक काम करण्यात आलं. वायुदल, नौदल आणि नौदलाचं वायुदल यांचा ताफा अधिक घातक शस्त्रास्त्रांनी सज्ज करण्यात आला. भारतात तयार झालेल्या अंतराळ यानांच्या मदतीनं भारतीय कृत्रिम उपग्रहांची कार्यक्षम माळाच आपण अंतरिक्षात स्थापन केली. विविध देशांना वेळोवेळी अडीअडचणीत मदतीचा हात देऊन, भारताच्या हिताला सर्वाधिक प्राधान्य देणारं परराष्ट्रीय धोरण राबवून परराष्ट्रीय संबंधांचा एक नवा अध्याय लिहिण्यात आला. हा सगळा कडेकोट बंदोबस्त केल्यानंतरच 'ऑपरेशन सिंदूर' राबवण्यात आलं. एका लष्करी कारवाईचं हे नाव ठेवणारे 'राष्ट्र' ही संकल्पना अंगीकार केलेले, ती आत्मसात केलेले आणि तिला आपल्या अभिव्यक्तीत पुरेपूर उतरवणारे खरे कल्पक आहेत, यात तिळमात्र शंका नाही.

(पान ६ वर)

# वारसदार!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१ आजपासून अडीच हजार वर्षांपूर्वी म्हणजे इसवी सन पूर्व ५०० वर्षांपूर्वी भारतात सगळीकडे फक्त सनातन धर्मच होता. साधारण लोकांमध्ये भगवान शंकराला आपला देव मानणारे शैव आणि भगवान विष्णूला आपला देव मानणारे वैष्णव अशी विभागणी होऊन दोन्ही पंथांचे लोक एकमेकांना विरोधक समजायचे. अनेक लोक त्यामुळे भ्रमित होऊन सनातन धर्म क्षीण होत चालला होता. अशा काळात केरळ राज्यातील कलाडी या गावामध्ये शिवगुरू आणि आर्याम्बा या ब्राह्मण दाम्पत्याच्या पोटी आद्य शंकराचार्य यांचा जन्म वैशाख शुद्ध पंचमीला झाला. आचार्य बालदशेत अत्यंत तेजस्वी दिसत. त्यांची अलोट बुद्धिमत्ता त्याही वयात दिसून यायची. असे म्हणतात की, वयाच्या पहिल्या वर्षी त्यांना अक्षरज्ञान व स्थानिक भाषा मल्याळम येऊ लागली. दुसऱ्या वर्षी ते वाचू लागले.

तिसऱ्या वर्षी त्यांना काव्ये, कोष पुराणे यांचा स्वमतीने अर्थ लावण्याची क्षमता आली. ते तीन वर्षांचे असताना त्यांच्या पित्याचे निधन झाले. अगदी बालपणापासूनच आद्य शंकराचार्य खूपच मेधावी होते. असे म्हणतात की, त्यांच्या वाणीवर साक्षात देवी सरस्वती विराजमान होती. त्यांच्या आईने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे पालनपोषण केले. आईने धीराने त्याची मौंज करून गावातील गुरुजींकडे ज्ञानोपासनेकरिता पाठवले. त्यांच्याकडील सर्व विद्या त्याने तीन वर्षांतच ग्रहण केल्या. इतर विद्यार्थ्यांना तो शिकवत असे, पण त्याने त्याचे समाधान होत नव्हते. त्याला आत्मोन्नतीकरिता दसंन्यास घेऊन ज्येष्ठ गुरूंकडे पुढील ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे होते. त्याला त्याच्या गुरूने पातंजल योगशास्त्र शिकवताना सांगितले होते की, नर्मदेच्या काठी गोविंदभगवत्पाद नावाचा महान योगी राहतो. लोक त्याला भगवान पतंजलीचा अवतार मानतात. हे ऐकून शंकरने याच श्रेष्ठ गुरूंचा शिष्य होण्याचे ठरवले होते. पण नवरा वारलेला व एकुलता एक मुलगा संन्यास मागतो म्हटल्यावर आईने साफ नकार दिला. मातृभक्त शंकरला आईच्या परवानगीशिवाय घराबाहेर पडावयाचे नव्हते. काही दिवसांनी शंकर आणि आई नदीवर आंघोळीला गेले असताना शंकराचा पाय एका मगरीने पकडला. आता सुटका नाही म्हटल्यावर शंकर आईला म्हणाला, ''आता मी एवीतेवी मरणारच तर मला संन्यास घेण्याची परवानगी दे. मी मनाने संन्यास घेईन व माझा मरणोत्तर मार्ग सुलभ होईल.'' आई कष्टाने म्हणाली, ''घे बाबा संन्यास.'' एवढ्यात काही कोळी धावून आले. त्यांनी ढोसून ढोसून मगरीला हाकलून लावले. पायाला जखम झाली, पण शंकर जिवानिशी सुटला. घरी आल्यावर 'तुझ्या मृत्युसमयी मांडी द्यावयाला मी नक्की येईन.' असे वचन मातेला देऊन बाळ शंकर केरळहून जंगले, दऱ्याडोंगर, नद्या ओलांडत नर्मदेच्या काठी पोहोचला. गावातल्या लोकांनी त्याला गोविंदपाद जेथे राहात, त्या गुंफेचा पत्ता सांगितला. शंकर तेथे गेला. गोविंदस्वामी काही दिवसांची अखंड समाधी घेत असत. अशा वेळी त्यांचे शिष्य तेथे थांबत नसत. त्याच वेळी शंकर तेथे पोहोचला. आता वाट पाहणे एवढेच त्याच्या हातात होते. आठ वर्षांचा शंकर गेले दोन दिवस गुहेसमोर हात जोडून बसला होता. आणखी किती वेळ प्रतीक्षेत जाणार, हेही त्याला माहीत नव्हते. पण ज्याकरिता आपण घर सोडून इतके दूर आलो ते आपले आराध्य समोरच्या गुहेत आहेत व तेच आपणाला प्रकाशाची वाट दाखवणार आहेत, याची त्याला खात्री होती. काही वेळाने स्वामींची समाधी उतरली. गुहेबाहेर कोणीतरी बसले आहे, असे पाहून त्यांनी विचारले 'कस्त्वं?' म्हणजे 'कोण तू?' आनंदाने भारलेला शंकर उत्तर देणार तोच तो चमकून थबकला. आपण तर अज्ञान बालक आणि आपण आपली ओळख 'शंकर!' तो योग्यांचा योगी शंकर, त्याचे नाव घेऊन द्यावयाचे? हा मोठा उद्धटपणा नव्हे काय? स्वामींनी आपले नाव थोडेच विचारले आहे? त्यांनी विचारले 'तू कोण?' क्षणभर थांबून, त्याने नम्रतेने पण आत्मविश्वासाने श्री शंकराचार्यांनी त्यांच्या गुरूंना जे उत्तर दिले ते आज आत्मषटक, निर्वाणषटक या नावाने प्रसिद्ध आहे... ''**मनोबुद्ध्यहमार चित्तानि नाहं न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे । न च व्योम भूमिर्न तेजो न वायुः चिदानन्दरूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।।**'' म्हणजे मी मन, बुद्धी, अहंकार व चित्त नाही, कान, जीभ, नाक, डोळे किंवा पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश यापैकी काहीही नाही... मी निर्विकल्प, निराकार, अमेय, सर्व विश्वाचा विधाता, चिदानंदरूपी शिवाचा मी अंश आहे. अशी सहा कडवी आहेत. त्यानंतर त्यांनी अद्वैतमताचा प्रसार करण्यासाठी भारतात पदभ्रमण सुरू केले. या यात्रेचा समारोप काशी विश्वनाथ येथे केला. आदिशंकराचार्यांनी 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' हे तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी शैव व वैष्णव हा वाद संपवण्याचे एक मोठे काम केले. आदिशंकराचार्य हे अद्वैत वेदान्तमताचे उद्गाते व भारतीय हिंदू धर्मीयांचे तत्त्वज्ञ होते. त्यांनी सांख्यांचा प्रधानकारणवाद आणि पूर्वमीमांसिकांचा ज्ञानकर्म समुच्चयवाद खोडून काढत अद्वैतवाद प्रस्थापित केला आणि ज्ञानमार्गाचा पुरस्कार केला. इ. पू. ५०० च्या आसपास कन्याकुमारी ते काश्मीर आणि द्वारका ते जगन्नाथपुरी असे सर्व भारतभर भ्रमण करून त्यांनी वैदिक धर्माची पुनःस्थापना केली. त्यांनी ब्रह्मसूत्र, उपनिषदे व भगवद्गीता आणि अन्य विषयांवर अनेक भाष्यग्रंथ लिहिले आहेत. त्यांनी तत्त्वज्ञानविषयक अनेक ग्रंथ, संस्कृत स्तोत्रे आणि तत्सम काव्ये रचली आहेत. त्यांच्या अनेक पद्यरचना अनुप्रासादी काव्यालंकारांनी ओथंबलेल्या आहेत. हिंदू धर्मातील सर्वोच्च आचार्य आद्य शंकराचार्यांनी द्वारका मठ, जगन्नाथपुरी मठ, शृंगेरी मठ आणि ज्योतिर्मठ येथे चार पीठे निर्मून त्यावर प्रत्येकी एक पीठासीन शंकराचार्य नेमून आचार्य परंपरा घालून दिली. आद्यगुरू वयाच्या फक्त ३२ व्या वर्षी समाधिस्थ झाले.




लेफ्ट. कर्नल अरुण छाब्रा यांच्या फोटो समोर त्यांचा मुलगा कर्नल वरुण छाब्रा.



वडील एअर कमोडोर संजय शर्मा व मुलगी फ्लाईट लेफ्टनंट अनन्या शर्मा.



वडील पिएर, आई मेरी क्युरी यांच्यानंतर इरेननेसुद्धा नोबेल पारितोषिक मिळवून वारसा जपला.



एअर चीफ मार्शल (निवृत्त) विवेक चौधरी आणि त्यांचा मुलगा विंगकमांडर मिहिर चौधरी ही बाप-लेकाची जोडी; ज्यांनी दोघांनीही राफेल हे हायपर सोनिक लढाऊ विमान सोबत उडवले व मिहिरने वडिलांचा वारसा जपला.

**२.** नऊ वर्षांचा वरुण छाब्रा त्याच्या बाबांची वाट पाहत होता. कारण 'प्यारा सेक्युरिटी फोर्सेस'मध्ये असलेल्या त्याच्या वडिलांचे प्रमोशन झाले होते. लवकरच ते त्यांच्या बटालियनचे प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळणार होते. १३ ऑक्टोबरला मी घरी येईन; मग आपण सेलेब्रेट करू, असा त्यांचा निरोप होता. पण ते आलेच नाहीत. कारण ११ ऑक्टोबर १९८९ रोजी अचानक रात्री त्याचे वडील लेफ्टनंट कर्नल अरुण छाब्रा यांना भारताच्या शांती सेनेचा भाग म्हणून श्रीलंकेतील सरकारच्या विनंतीनुसार, एलटीटीई बंडखोरांना बंधक बनवण्यासाठी श्रीलंकेतील जाफना विद्यापीठाच्या आवारात हेलिकॉप्टरद्वारे पाठवले. पण शत्रूला आधीच माहिती मिळाल्यामुळे ही योजना फसली. या लढाईत ३० भारतीय सैनिकांना देशासाठी बलिदान द्यावे लागले. त्यात १४ ऑक्टोबरला वरुणचे वडीलसुद्धा स्वर्गवासी झालेत. वडिलांची त्यांच्या बटालियनचा प्रमुख म्हणून कार्य करण्याची इच्छा अपूर्ण राहिली म्हणून बाबांचा वारसा पुढे नेण्याचे त्याने ठरवले. त्यासाठी त्याने जिवापाड मेहनत केली. दुर्दम्य क्षमतेच्या जोरावर त्याने वडिलांची इच्छा पूर्ण केली. विविध प्रमोशन घेत घेत आज तो वडिलांच्याच बटालियन १० प्यारा रेजिमेंट सेक्युरिटी फोर्सेसमध्ये कमांडिंग ऑफिसर हे पद मिळवून कर्नल वरुण कुमार छाब्रा म्हणून त्यांचा वारसा पुढे चालवतो आहे.

३. एअर कमोडोर संजय शर्मा, हे १९८९ पासून मिग-२१ या सुपर सॉनिक लढाऊ विमानाचे श्रेष्ठ फायटर पायलट आहेत. त्यांची मुलगी अनन्या बालपणापासूनच मला वडिलांसारखे फायटर पायलट व्हायचे आहे, असे स्वप्न पाहायची. त्या दिशेने परिश्रम घेऊन तिने स्वतःला तयार केले आणि डिसेंबर २०२१ मध्ये तिची फ्लाईट लेफ्टनंट अनन्या शर्मा म्हणून भारतीय वायुदलात नेमणूक झाली. सध्या ती आवाजाच्या गतीपेक्षाही वेगवान म्हणजे सुपर सॉनिक लढाऊ सुखोई-३० या आयएएफच्या विमानाची फायटर पायलट आहे. या बापमुलीच्या जोडीने ३० मे २०२२२ रोजी इतिहास रचला, जेव्हा त्यांनी हवाई दल स्टेशन बीदर येथे वेगवेगळ्या विमानात बसून हॉक-१३२ विमानाच्या एकाच फॉर्मेशनमध्ये उड्डाण केले व आयएएफमध्ये हॉकचे फॉर्मेशन म्हणजे आकाशात विमान उडवताना वेगवेगळ्या लढाऊ विमानांची विशिष्ट रचना बनवणारी पहिली बाप-मुलगी जोडी बनली. मुलाखतीत वडिलांचा वारसा पुढे चालवण्याचे माझे स्वप्न सत्यात उतरल्याचे तिने सांगितले.

**शिकायचे काय?** वेदांग (६) : शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष, छंद वेद (४) : ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद शास्त्रे (८) : पुराण, मीमांसा, न्याय, धर्मशास्त्र, आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद (संगीत-नृत्य-नाट्य शास्त्र), अर्थशास्त्र, योगशास्त्र व अगदी कृत्रिम बुद्धिमत्तापर्यंत इतर आधुनिक विविध शास्त्रात आणि सामाजिक, देशभक्ती व विविध क्षेत्रात आपल्याला भारताचा वारसा पुढे न्यायचा आहे. त्यासाठी वयाची व विषयांची, लिंगाची, जातीची मर्यादा नाही. आज सर्वत्र अधर्माचे पेव फुटले आहे.

कुटुंब संस्था व सनातन धर्म संकटात आहे. व्यसने व व्यभिचार यांचा सुळसुळाट झाला आहे. स्वार्थासमोर देश-धर्म बाकी सर्व तुच्छ समजून फक्त सुखलोलुपता वाढल्यामुळे सत्त्व, साधना, सद्विचार यांना विसरून मन व तनाचे रोग वाढले आहेत. अशा काळात सर्वांच्या सुखासाठी आदिशंकराचार्य यांचा वारसा पुढे नेणे हे वारसदार म्हणून आजच्या पिढीचे कार्य आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या कालखंडात, वेगवेगळ्या थोर स्त्री व पुरुषांनी आपले आयुष्य सनातन धर्म व भारतासाठी वेचले. त्यात आपले सर्व संत, छत्रपती शिवाजी व संभाजी महाराज, अहल्याबाई होळकर, अलिकडच्या काळात बाळ गंगाधर टिळक, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी व रामानुजन, डॉ. रमण, डॉ. भाभा, डॉ. ए. पी. जे. कलाम, आदी शास्त्रज्ञ, रतनजी टाटांसारखे उद्योजक, देशभक्त व समाजसुधारक अनेकांनी आपले योगदान दिले. आता आपली पाळी आहे...

(लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## प्रेमाचा गुढार्थ । प्रेम जाणे ।।

प्रेमाचे हे गीत । प्रेम भावे गावे ।।
प्रेमाने जिंकावे । सकळांसी ।।१।।

द्वेष निंदा भाव । गतीचे रोधक ।।
आयुष्या जाचक । क्लेशदायी ।।२।।

आशेच्या मुळाशी । दु:खाचेचं जाळे ।।
आपुलेच गळे । कापताती ।।३।।

मृगजळा संगे । रमतो का मना ।।
सुटेल का पान्हा । वांझोटीस ।।४।।

सावध होऊनी । साधावा भावार्थ ।।
प्रेमाचा गुढार्थ । प्रेम जाणे ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## मानते की थोडी बेहिशोबी आहे

थोडी चंचल, थोडी अल्लडशी आहे छोट्या छोट्या गोष्टीसाठी
रुसणे कुणी येऊन मग मनधरणी करणे बेहद आवडते अन् मग
खळाळून हसणे डोळ्यात पाणी येईस्तोवर, का असे होते?
बालपण अजून, सोडून कुठे गेलंय? आहे आसपास थबकलेले,
दुबकलेले आणि रेंगाळलेले माझ्या मनात बसावे वाटते
दादाच्या खांद्यावर, ताईच्या कडेवर, आईच्या कुशीत..
साल संत्र्याची हळूच पिळावी डोळ्यांत फिदीफिदी हसावे
वाजवीत टाळ्या गुलबक्षीच्या फुलांची गुंफित वेणी
दुडूदुडू धावत मोजावी
अंगणातील रंगरंगुली फुलपाखरे सानुली..
लगोरीची फोडीत शिडी, हाणावा चेंडू पाठीत, गोल गोल
फेर धरीत गावी गाणी नभाकडे पाहत मोजावे चांदणे, टिपूर
चांदण्याच्या प्रकाशात, वेडे होऊन देहभान अवघे विसरावे..
लपाछपी, गारगोटी, नदी की पहाड सगळे अजूनही डोळ्यापुढे
उभे, आठवतात मैत्रिणी, सारे सारे खेळ डोळ्यांपुढून जात
नाही बालपणाचा काळ खंत होते
परतून का येत नाही हा काळ..

विद्या कुळकर्णी

## प्रवास

चांदणं आभाळभर सांडायचं, तेव्हाचे दिवस भरून चाललोय
मी उरात, उराच्या हृदयगर्भात दूर कुठंतरी... माझं मलाच
कळत नाही, कळलं नाही... जायचं आहे कुठे...?
एक पायवाट हरवलेली, एक धूळवाट खोल खोल रुतलेली...
धुळीत उमटलेली सापाची फरकाड घट्ट चिकटून बसलेली
अगदी मनाच्या तळाशी! रखरखत्या उन्हात भरणारा बाजार
तिन्ही सांजेला हातघाईवर आलेला... पीठगिरणीवर वाटीभर
पिठासाठी याचना करणारा जीव कुठे असेल आता?
दिवस येतात आणि जातात चालणं मात्र थांबत नाही,
जगणं थांबेपर्यंत!

पुंडलिक आंबटकर

# राजमाता

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

भारतीय संस्कृती आणि इतर संस्कृतींमधील एक महत्त्वाचा फरक म्हणजे आपल्या संस्कृतीवर कायमच मातृत्वाची दाट छाया राहिली आणि मायलेकरांमधील ममत्वाला प्राचीन काळापासून आपल्या संस्कृतीने सर्वोच्च स्थान दिले. ऋग्वेदातील आदितीचे मातृसौंदर्य निरखताना कोण मोहित होणार नाही! 'यत् जातं, यत् जानित्वम्' म्हणजे सृष्टीमध्ये जे काही घडले आहे आणि पुढे जे घडणार आहे, त्या साऱ्याचे मूळ कारण आदिती आहे.

जन्मदात्री जननी आदितीच आहे. ती अमृतस्य नाभिः आहे, ती गो रूपधारा आहे आणि क्षीरामृत पाजून विश्वाचे पोषण करण्यात तन्मय झालेली जननीही तीच आहे. सबंध विश्वाचे सुमंगल चिंतणारी तिची भाषा आहे. हजारो सूर्यांचे तेज पेलणारी तिची देहबोली आहे. आदिती म्हणजे संपूर्ण विश्वाची माता आहे. आदिती म्हणजे मूर्तिमंत प्रेम. आदिती म्हणजे हृदयात न मावणारे ओतप्रोत वात्सल्य आहे. विश्वाची आई आदिती ही भूदेवी आहे. विश्वस्य भर्त्री जगतः प्रतिष्ठा असलेली ही लोकधात्री आदिती देवी आपल्या कर्तृत्वशाली मुलांबरोबर वैभवाने उभी आहे. संसार सागरातून तरून जाण्यासाठी तिच्या मुलांना आदितीच्या दिव्य नौकेचा आधार मिळाला आहे. रामायण-महाभारत कथांमध्येदेखील मातृप्रेमाची सर्वत्र शिंपडण आहे. मातृप्रेमाच्या कोंदणात पुत्राच्या पराक्रमाचे सामर्थ्य आहे. श्रावण बाळ, कौसल्येचा राम, कुंतीचे पाच पांडव, द्रौपदीचा अभिमन्यू, गंगेचा देवव्रत हे सर्व कमी होते की काय म्हणून महायुद्धाच्या पृष्ठभूमीवर कुंती मातेने कर्णासाठी केलेला करुण विलाप मंद्र सप्तकात अजूनही सुरू आहे.

प्राचीन काळातील फक्त महाराष्ट्रापुरताच विचार करायचा तर माता-पुत्राचे असीम प्रेम या कणखर दगडांच्या देशात निर्व्याजपणे फुललेले बघायला मिळते. आपल्या देशाचा विश्वसनीय इतिहास मौर्य काळापासून सुरू होतो. सम्राट अशोकाच्या काळी आपला महाराष्ट्र मौर्य साम्राज्यात सामील होता. त्यानंतर केंद्रसत्ता दुर्बल झाल्यामुळे देशात लहान लहान राज्ये जन्माला आली. महाराष्ट्रातले सातवाहन राज्य हे त्यापैकीच एक. प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात सातवाहनांचा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. या वंशाचे राज्य ख्रिस्तपूर्व २३० पासून ख्रिस्तोत्तर २५० पर्यंत म्हणजे जवळजवळ पाच शतके महाराष्ट्रात होते. प्रतिष्ठान म्हणजेच हल्लीचे पैठण ही त्यांची राजधानी असावी. राजा सातकर्णींच्या काळी सातवाहनांचे राज्य दूरवर पसरले. त्याचा विवाह महारठी कळलाय या नागवंशी राजाच्या नागनिका नावाच्या राजकन्येशी झाला होता. पूर्वीच्या काळी 'निका' या शब्दाचा अर्थ स्त्री होत असे. शक राजवटीतील स्त्री म्हणजे 'शकनिका' त्याचप्रमाणे नाग राजवटीतील या राजकन्येला 'नागनिका' हे नाव पडले. जुन्नरच्या जवळ नाणेघाटात अनेक प्राचीन लेणी असून त्यापैकी एका लेण्यात सातवाहनांचे कोरीव लेख आहेत. यामध्ये नागनिका, राजा सातकर्णी आणि तिच्या राजकुमारांचे पुतळे आहेत. पुतळे भग्नावस्थेत आहेत आणि राजकुमारांची काही नावेही अर्धवट आहेत. पण या लेण्यांवरून महाराष्ट्राच्या प्राचीन काळाच्या जीवनपद्धतीचे समग्र दर्शन तर होतेच; त्याचबरोबर ऋग्वेद काळापासून चालत आलेले आई-मुलाच्या अतूट बंधनाचे सूत्र या अतिप्राचीन शिल्पांवरून आकळते.

विदर्भातील प्रसिद्ध इतिहास संशोधक महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांच्या लेखानुसार नाणेघाटातील दुसरा लेख तिचा मुलगा वेदिश्री याच्या काळचा आहे. त्यावेळी ती वृद्ध झाली होती. तिला तीन मुले होती. सर्वात मोठा मुलगा कुमार भाय याच्या मृत्यूने ती होरपळली होती. त्यानंतर पतिनिधनामुळेही तिच्यावर अस्मानी संकट आले, पण तिने धीर सोडला नाही. आपल्या इतर मुलांवर वेदिश्री आणि सती (शक्ती) वर तिने आयुष्य ओवाळून टाकले. तिचा मुलगा वेदिश्री महान सम्राट होता. त्याच्या काळातच नाणेघाटमधील शिलालेख लिहिला गेला असावा. या शिल्पांवरून कळलेली तिच्या आयुष्याची कहाणी फारच अद्भुत आहे. पती निधनानंतर डगमगून न जाता तिने प्रखरपणे वैदिक धर्माचे पालन केलेच आणि तिच्या मुलांनाही करायला लावले. तिच्यापुढे सर्व सुखे हात जोडून उभी होती. तिने उर्वरित आयुष्य संन्यस्त वृत्तीने घालवले. अनेक यज्ञ केले.

प्रचंड दानधर्म केला. खरं तर प्राचीन प्रथेप्रमाणे स्त्रियांचा उल्लेख पतीच्या नावानंतर केला जातो. पण कोरीव लेखांमध्ये नागनिकेचा उल्लेख तिच्या पतीच्या नावाआधी केलेला आहे. यावरून तिला तिच्या पतीबद्दल वाटणारे प्रेम व्यक्त होतेच; पण त्याचबरोबर तिला आणि तिच्या राजकुमारांना तिच्या कर्तृत्वाची सखोल जाणीव होती, हे सिद्ध होते. नाणेघाटातील प्राकृत लेखात मोजक्या शब्दात तिच्याबद्दल लिहिले आहे, ''मासोपवासिनीय गहतापसाय चरितब्रह्मचरियाय दिखव्रतयंत्रसुंडाय यंत्रा हुता'' ''नागनिका महिनों महिने उपवास करीत असे. एखाद्या तपस्विनीप्रमाणे तिचे जीवन होते. तिने अनेक यज्ञ केले. व्रते आणि यज्ञ करण्यात ती फारच कुशल होती.'' नाणेघाटमधील तिच्यावरील दुसरा लेख नागनिकेच्या वृद्धापकाळी कोरला असावा.



आपल्या अत्यंत सात्त्विक आईचे अतिशय सुंदर वर्णन त्याने या लेखात केले आहे. प्रथमतः धर्म, इंद्र, संकर्षण, चंद्र, सूर्य, यम वरूण, चार लोकपाल, कार्तिकेय यांना नमन केले आहे. नंतर तिच्याबद्दल म्हटले आहे की, अत्यंत श्रेष्ठ अशा श्री सातकर्णींची भार्या व पूर्तद, वरद, कामद, धनद अशा वेदिश्री राजाची व श्रीमान सती (शक्ती) याची माता (नागनिका) हिने आपल्या पतीची सहधर्मचारिणी म्हणून व स्वतःही अनेक श्रौत याग केले. यात दानधर्म केलेल्या गाई, हत्ती, घोडे, रथ, कार्षापण नामक चांदीची नाणी, सोन्या-चांदीचे अलंकार यांचे सविस्तर वर्णन आहे. आजच्या काळातही पतीचे निधन झाल्यावर घरी पत्नीचे महत्त्व कमी होत जाते. आईच्या वृद्धापकाळात मुले तिला विचारेनाशी होतात. पण महाराष्ट्रात अतिप्राचीन काळात नागनिकेने पती निधनानंतरही संपूर्ण राष्ट्रावर स्वतःचे वर्चस्व ठेवलेच; त्याचबरोबर स्वतःच्या मुलांनाही अतिशय कर्तृत्ववान बनविले.

वृद्धापकाळचे तिचे तपस्वी आणि देदीप्यमान रूप बघून आपण स्तंभित होतो. नागनिकेच्या मुलांचे मातृप्रेम कोरीव लेखांमधून जागोजागी दिसते. याच सातवाहन राजवंशातील २३ वा राजा म्हणजे गौतमीपुत्र सातकर्णी. ऐतिहासिक काळात महाराष्ट्राला परकीयांच्या दास्यातून मुक्त करणारा हा पहिला वीरपुरुष. दुसऱ्या शतकाच्या सुरुवातीला शक क्षत्रप नहपानाचा पराभव करून पश्चिम महाराष्ट्र पुन्हा आपल्या अधिपत्याखाली आणणारा गौतमीपुत्र सातकर्णी नाशिक लेण्यातील कोरीव लेखात स्वतःचा बेनाकटक स्वामी असा उल्लेख करतो.

बेना कटक म्हणजे बेना किंवा वेणा नदीच्या काठचा प्रदेश. नाशिकच्या नंबर तीनच्या लेण्यामध्ये एक विस्तृत लेख त्याच्या आईने, माता गौतमी बलश्री हिने त्याच्या मृत्यूनंतर १९ वर्षांनी आपल्या नातवाच्या वासिष्ठिपुत्र पुळुमावि याच्या कारकीर्दीत लिहिला. हे लेणे पूर्ण झाल्यावर भिक्षू संघाच्या स्वाधीन करताना गौतमी बलश्रीला आपल्या महापराक्रमी मुलाची आठवण येऊन शोक अनावर झाला. आपल्या लेखात ती लिहिते, ''सातकर्णी हा हिमालय, मेरू, मंदार या पर्वतांसारखा थोर होता.'' नंतर तिच्या मुलाचे राज्य किती दूरवर पसरले होते, याचे ती वर्णन करते.

''त्याचे राज्य ऋषिक (खानदेश), अश्मक (गोदातीरचा देश), मुळक (पैठणजवळचा देश), सुराष्ट्र (काठेवाड), कुकुर (राजपुताना), अपरांत (कोकण), अनुप, विदर्भ, आकरावंती (माळवा) येथपर्यंत पसरले होते.'' पुढे ती म्हणते, ''मलय, श्वेतागिरी, चकोर इत्यादी पर्वतांचा तो स्वामी होता. त्याचे वदन सूर्यकिरणांनी प्रफुल्ल झालेल्या कमलाप्रमाणे होते. त्याचे घोडे तीन समुद्रांचे पाणी प्यायलेले होते. पूर्ण चंद्राप्रमाणे तो प्रियदर्शन होता. गजश्रेष्ठाप्रमाणे त्याची गती सुंदर होती. त्याचे भुज शेषासारखे दीर्घ व भरदार होते. आपल्या मातेची शुश्रूषा करण्यात तो व्यग्र असे.'' शेवटी ती म्हणते, ''सातवाहन वंशाला त्याने पूर्वीचे वैभव प्राप्त करून दिले होते. तो शास्त्रांचा आधार, सज्जनांचा आश्रय, लक्ष्मीचे अधिष्ठान होता. समरांगणात युद्ध करीत असताना पवन, गरुड, सिद्ध, यक्ष, राक्षस, विद्याधर, भूत, गंधर्व चारण, चंद्र, सूर्य इत्यादी गगनचारी त्याच्याकडे आश्चर्याने पाहात असत.'' आपल्या मुलाचे कोडकौतुक करण्यात गौतमी बलश्रीने कदाचित अतिशयोक्ती केली असेलही. पण आईच्या हृदयातून अलगद वर आलेला हा अमृतकुंभ वाचताना मन हरखून जाते. ऋग्वेद काळातील माता आदितीकडून मिळालेला मातृप्रेमाचा हा वारसा आपल्याला गौतमी बलश्रीच्या रूपात प्राचीन महाराष्ट्र संस्कृतीत सापडतो. आपल्या अतिप्राचीन संस्कृतीत गौतमीपुत्र सातकर्णी नामक एका सम्राटालाही मातेची शुश्रूषा करण्यात धन्य वाटत होते, ही आपल्या संस्कृतीची श्रीमंती. हे प्राचीन शिल्प पाहताना मनात नकळत वर्तमान काळातल्या वृद्धाश्रम संस्कृतीशी तुलना होते. अतिप्राचीन काळापासून आलेले माय-लेकरांचे प्रेमाचे बंध छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि त्यांच्या आई जिजाऊंनी जोपासले. मातृ व पुत्र प्रेमाच्या आपल्या संपन्न संस्कृतीचा वारसा दोघांनीही पुढे नेला. जिजाबाई अत्यंत न्यायी आणि पराक्रमी. आपल्या पुत्राबद्दल त्यांना आत्यंतिक प्रेम आणि अभिमान होता. शिवाजी महाराजांनाही आपल्या आईसाहेबांबद्दल अतिशय प्रेम आणि भक्ती होती. ''अशीच आमुची आई असती सुंदर रूपवती, आम्हीही सुंदर झालो असतो वदले छत्रपती'' कल्याणच्या सुभेदारांच्या सुनेचा किस्सा सर्वश्रुत आहेच.

महाराष्ट्राच्या राजकीय, भौगोलिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत डोळस आणि त्याचबरोबर प्रेमळ मातृत्वाचा फार महत्त्वाचा वाटा आहे. माय-लेकरांच्या अतूट बंधामुळे अनेक समृद्ध राजवटी निर्माण झाल्या आणि जोपासल्यादेखील गेल्या. राजमातांच्या सजग मातृत्वामुळे अनेक पराक्रमी राज्यकर्ते महाराष्ट्रात निर्माण झाले. राज्यकर्त्यांच्या निस्सीम मातृप्रेमामुळे त्यांच्या भरजरी राजवस्त्रांचा पोत तलम आणि तरल झाला. राजमातांनीच संस्कृतीचं अंगण खेळायला दिलं आणि आकाशी गरुडझेप घ्यायला राजकुमारांच्या पंखांना बळ दिलं. प्राचीन संपन्नतेचे रहस्य मातृप्रेमाच्या आणि पुत्रप्रेमाच्या अमृतकुंभातच दडलेले आहे.

# चटका लाऊन वैशाख जातो!



ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

**वैशाख आणि चैत्र ही जोडगोळी हातात हात घालून चालणारी, मात्र चैत्र जेवढा चैतन्यदायी वैशाख तेवढाच अस्वस्थ करणारा. रणरणत्या उन्हात वैशाख वणवा जेव्हा स्वतःच्या चरम सीमेवर असतो तेव्हाच खऱ्या अर्थाने सूर्याच्या उग्र शक्तीचे दर्शन आपल्याला होते. वैशाखाचे ऊन आपल्या कवितेमध्ये शब्दांकित करण्याचे धाडस कदाचितच कुणी एखादा कवी करत असेल. दुपारच्या उन्हात कोमेजून जाणारे चेहरे, वृक्ष, माणसं हे सर्व पूर्वीपासून चालत आलेले आहेच. चैत्रात लाल पिवळी पोपटी अशी बहरून आलेली पालवी वैशाखात राठ आणि काळसर पानांमध्ये परिवर्तित झालेली असते. एखादा दुसरा पिंपळ मात्र ऐन वैशाखात आपल्या पानाची कोवळी झालंर पानावर नाचवत वैशाखाच्या उन्हाला वाकुल्या दावत असतो. पिंपळाला बोधीवृक्ष असे म्हटले जाते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. याच वृक्षाखाली सिद्धार्थ गौतमास दिव्य ज्ञान प्राप्त होऊन ते बोधी झाले, बुद्ध झाले, तथागत झाले. मी खूप वेळ या बाबीचा विचार केला, निव्वळ एखाद्या वृक्षाखाली बसून दिव्य ज्ञान प्राप्त होऊ शकते का? असा प्रश्न मला फार पूर्वीपासून पडतो. आणि उत्तर शोधताना माझेच मन मला सांगते, सिद्धार्थ, हे शाक्य वंशातील प्रमुखाचे म्हणजे राजा शुद्धोधनाच्या घरी जन्मलेला राजपुत्र होते, शुद्धोधनाने त्यांच्या शिक्षणाची आणि त्यांच्यावर होणाऱ्या संस्काराची खूप काळजी घेतली होती. गृहत्यागानंतर विविध अनुभव घेतल्यानंतर जेव्हा सिद्धार्थ भटकंती करत असताना वैशाखाच्या रणरणत्या उन्हात जीवाची काहिली होत असताना या शितल बोधीवृक्षाखाली विराजमान झाले असावेत आणि त्या शितल वृक्षाच्या सावलीत बसून त्यांनी राजपुत्र म्हणून मिळवलेले संपूर्ण ज्ञान तसेच गृहत्यागानंतर आलेल्या अनुभवाचा परिपाक यांचा समन्वयित असा जो अन्वयार्थ काढला तेच खरे दिव्य ज्ञान असे मला वाटते.**

वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी जन्मास आलेल्या सिद्धार्थांना वैशाखी पौर्णिमेच्या दिवशीच दिव्य ज्ञान मिळावे हा एक योगायोग असू शकत नाही. तर वैशाखातील उन्हामुळे सृष्टीची होणारी तगमग, तहानेमुळे होणारी सृष्टीतील जीवांची होणारी व्याकुळता हे सर्व पाहून जीवनसृष्टीस नेमके काय हवे? असा प्रश्न सिद्धर्थाला पडला असावा आणि वैशाख पौर्णिमेच्या स्वच्छ चंद्र प्रकाशात, शितल चांदण्यात त्याचे उत्तर सापडले असावे. कालांतराने ही वैशाखी पौर्णिमा बुद्ध पौर्णिमा म्हणून ओळखली जाईल असा विचार तथागतानेही केला नसावा. मात्र ते घडले. ती पौणिमाच नव्हे तर जगाच्या मोठ्या तत्वज्ञानाचा एक भाग तथागत ह्या शब्दात व्यापला गेला आहे.

बुद्ध पौर्णिमेसोबत चर्चा होते ती जंगलातील प्राणी गणनेची...! वैशाखच्या उन्हामुळे जंगलातील पाण्याचे साठे मोजक्या ठिकाणी उपलब्ध असतात, अशावेळी २४ तासात प्राणी एकदा तरी पाणी पिण्यासाठी पाणवठ्यावर येणार असा सरासर विचार करून इंग्रज काळापासून भारतामध्ये प्राणी गणना सुरू झाली. बुद्धाच्या अहिंसा या तत्त्वासोबत आपण तिची सांगड घालत असलो तरी खर्या अर्थाने पाण्याचे मोजके साठे उपलब्ध असणे, वैशाख पौर्णिमेच्या रात्री भरपूर चंद्र प्रकाश असणे अशा काही कारणामुळे हा दिवस निवडला गेला असावा. इतर ऋतूमध्ये जसे कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्रप्रकाश मोठ्या प्रमाणात असला तरी पाण्याचे भरपूर साठे हिवाळ्यामध्ये ठीकठिकाणी उपलब्ध असतात त्यामुळे कोजागिरी पौर्णिमेपेक्षा वैशाखी पौर्णिमा इंग्रज लोकांना प्राणी गणनेसाठी सोयीची वाटली असावी असे मला वाटते. वैशाखाच्या उन्हाबद्दल काय बोलावे? चैत्रात फुलारून आलेल्या झाडांचे मोहोर उन्हामुळे गळून गेल्याचे आपण सर्वत्र पाहत असतो. मात्र, या गळालेल्या मोहरा सोबत याच झाडांवर फळे आकार घेऊन आपल्याला खुणावत असतात.

निसर्ग एका हाताने देतो तर दुसऱ्या हाताने भरभरून देतो ते असे. वैशाखामध्ये बहरून येतो तो गुलमोहर, हा गुलमोहर बहरून येताना आपली स्पर्धा चैत्रात रानोमाळ आगीच्या फुलासारख्या बहरून आलेल्या पळस, काटेसावरी, आणि पळस पांगरा अशा झाडासोबत आहे या जिद्दीने फुलारून येतो. पाहता पाहता ह्या झाडाची सर्व पाने गळून जातात आणि फक्त लालबुंद फुलाचा बहर तो गुलमोहराच्या फांद्या फांद्या मधून आपल्याला खुणावत असतो, कोकिळेपासून, चातक आणि अगदी चिमुकला फुलचुख्या असे पक्षी या झाडावर गर्दी करून असतात. काळसर निळसर भुंगे, मधमाशा यांची सुद्धा गर्दी या झाडावर दिसू लागते. त्याच झाडावर कुठेतरी उंचावर कावळ्याचे घरटे दिसते. आणि कावळ्याने लवकर घर केले म्हणजे यावेळी पावसाळा चांगला होणार असा निष्कर्ष शेतकरी राजा काढू लागतो. कावळ्याचे पावसात भिजणारे घर पाहूनच कुणा लेखकाला चिमणीची आणि कावळ्याची घरटे वाहून जाण्याची कथा सुचली असावी.

चिमणी आणि कावळा यात चिमणी सर्वांची आवडती होती, लहानपणी एक घास चिवूचा तर दुसरा काऊंचा... असे वाक्य ऐकत मागील शतकापर्यंतच्या अनेक पिढ्या जेवल्या आहेत. आता मात्र फ्लॅटचे बंद दारामध्ये चिऊ काऊ दिसणे दुरापास्त झाले आहे. गाय गोठ्यात आणि नीज डोळ्यात हे समीकरणच कुठे दिसत नाही. अंगाई गाणारी आई मोबाईलवर स्वतःचा व्हिडिओ तयार करून रील तयार करण्यात मग्न आहे. अंगाई गात निजणारा बालक मोबाईलवर एखादे गाणे ऐकत स्वतः स्वतःचा निजत आहे. मोबाईलवरची रेंज ५ जीपर्यंत सापडत गेली आणि आपली बालसखी चिमणी मात्र हरवत केली याचा विचार करायला आपल्याला वेळ राहिला नाही. गुलमोहरासारखा वैशाखामध्ये फुलावरून येणारा बहावासुद्धा तेवढाच आकर्षक, पिवळ्या फुलांचे घोस झाडावर झुंबरासारखे लटकतात आणि हा पिवळा धमक फुलोरा डोळ्यामध्ये साठवून घेणाऱ्याच्या डोळ्याचे पारणे फेडतो आणि मनामध्ये त्याला पुन्हा पाहण्याची तहान आणि उर्मी कायम जिवंत ठेवतो. बहाव्याला गंध का नसावा? कदाचित रंग आणि गंध दोन्ही असल्यावर निसर्गाचं हे साजर रूप माणसांनी आणि इतर जीवसृष्टीतील प्राण्यांनी गिळगृंत केलं असतं अशी भीती निसर्गाला असावी. म्हणूनच त्याने काही फुलांना रंग तर काही फुलांना गंध दिला असावा.

देव बाभळीच्या फुलांचा सुगंध दुपारच्या उन्हाला आल्हादायक करणारा असतो. देव बाभूळ सोडा मला तर पिसाळलेल्या काटेरी बाभळीचे पांढरेशुभ्र काटेही आकर्षक वाटतात मात्र ते जोवर टोचत नाहीत तोवरच बरं! चाफा बोलेना असे म्हणत कविवर्य बी यांनी या सुंदर झाडाला उगाच संन्याशाच्या पंक्तीत बसवले असे मला वाटते. कारण पांढरा चाफा, सुवर्ण चाफा आणि रक्तवर्णी असा लालबुंद चाफा मी नेहमी जवळून पाहत आलो.

माझ्यासारख्या निसर्गाच्या रसिकाला निसर्गाचं सुंदर लेणं असलेला हा चाफा संन्यासी वाटत नाही. आमच्या लहानपणी वैशाखाच्या उन्हात एखाद्या झाडाखाली गर्दी करत काचेच्या गोट्या खेळणारी आमची मित्र मंडळी पुढे कॅरम खेळणे त्याचबरोबर शीतपेय डावावर लागत पत्ते खेळणे इतपत पुढारले होते. मात्र संध्याकाळ झाली आणि ऊन थोडे कलल्यासारखे वाटले की टीव्हीवरच्या मॅच मध्ये तेंडुलकरची सेंचुरी असो की कपिल देवची हॅट्रिक....

तिकडे दुर्लक्ष करून सर्व टोळी मैदानावर स्वतःची मॅच खेळण्यासाठी गर्दी करायची. आज घराघरात एसी आणि कुलरच्या हवेत सर्व मैदानी खेळ नेस्तनाबुत झाले आहेत. मैदाने बाकी आहेत मात्र मैदानावरील खेळाडू हरवले आहेत. एखादेवेळी दहा बारा लेकर मैदानात बसलेली दिसतात ती सर्व शरीराने एकमेकांच्या सोबत बसून मोबाईलमध्येच हरवलेली असतात. वैशाख फक्त रणरणते ऊन घेऊन येतो असं नाही तर तो भणभणता वाराही घेऊन येतो. बांबूच्या वनात या वाऱ्यामुळे वाजणारी शीळ आता इतिहास जमा झाली असली तरी या वाऱ्याचा वेग अजूनही जाणवतो. घराची दारा खिडक्या वाजवत हा वारा आपल्या अस्तित्वाची दखल घ्यायला लावतो. कधी- कधी कोरड्या ढगांमध्ये कुठून कसा पण तो गारवाही घेऊन येतो. पाहता पाहता वळीवाच्या पावसाने आसमंत ओलाचिंब करून जातो. वळीवाचा पाऊस अवेळीचाच, क्षणात ओलावा देतो आणि दुसऱ्या दिवशी आपल्या आगीवर पाणी ओतण्याचे काम पावसाने केले म्हणून चिडलेला सूर्य ओल्या झालेल्या मातीतील पाणी वाफेच्या रूपाने बाहेर काढण्यासाठी प्रचंड रागाने तपतो आणि घामाने चिंब भिजलेल्या सृष्टीला उन्हाळा म्हणजे सूर्याची अधिसत्ता हे समीकरण ठणकावून सांगतो.

वैशाखात शाळांना कुलूप टांगून मास्तर आणि विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी गाव खेड्याकडे निघून गेलेले असायचे तो काळ आता मागे पडला आहे. मुलांच्या मामाचा गाव हरवला आहे. विद्यार्थी कोणत्या ना कोणत्या अभिजात कलेमध्ये आपल्याला रुची आहे हे सिद्ध करण्यासाठी विकतच्या उन्हाळी वर्गामध्ये आपले छंद जोपासत आहे. उन्हाळी वर्गामध्ये बसून चित्र रंगवण्यापेक्षा एखाद्या झाडाखाली बसून निसर्गाचे चित्र डोळ्यांमध्ये साठवण्यात जी सजीवता होती ती ज्या पिढीने अनुभवली आहे ती पिढी सुद्धा आपल्या भावी पिढीला या आनंदापासून वंचित ठेवत उन्हाळी वर्गामध्ये डांबून ठेवत आहे. आंब्याच्या झाडाखाली जाऊन पाडाचा आंबा नेमका हेरून तो दगडाने नेमका टिपून चाखण्यात जो गोडवा आहे तो डब्यामध्ये मिळणाऱ्या आम्रखंडामध्ये नाही हे सांगितले तरी कोणी समजून घेण्यासाठी तयार नाही. मैदानावर कोणताही खेळ खेळल्यामुळे वाढणारी खेळाडू वृत्ती आणि होणारा शारीरिक विकास याची बरोबरी विकतच्या मॅटवर योगासन केल्यामुळे होणार नाही याचीही जाणीव ठेवत नाही.

वैशाख रणरणते उन्ह, भणभणता वारा घेऊन येतो. आईस्क्रीम, कोल्ड्रिंक्स यांची लज्जतदार मेजवानी घेऊन येतो. कधी तो आंबट गोड आंब्याची रसाळी, पापड कुरडया करताना भगिनींची मैफिल सजवायचा, सुख दुःख वाटून घ्यायचा. भर उन्हामध्ये निवांतपणा देणारा वैशाख आताशा दिसत नाही, आज दिसतो तो चटका देऊन जाणारा वैशाख...

कदाचित या वैशाखात उन्हाची प्रखरता पाहून आणि यावर मात करण्यासाठी अरण्याची आणि पर्यावरणाची जोपासना व्हावी या हेतूने पर्यावरण दिवस साजरा केला जात असावा, नाही का? तर्क अनेक असतात. मात्र, त्या तर्काच्या पलीकडे तर कधी अलीकडे एक वास्तव असते आणि वैशाखाचे वास्तव अगदी एका ओळख सांगायचे तर, चटका लावून वैशाख जातो असे म्हणावे लागते.

पान१ वरून

# भारतीय अर्थविश्वात नवा आत्मविश्वास

'मूडीज' या आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थेने भारताचा वाढीचा दर ६.३ टक्के राहील, असे म्हणूनच म्हटले होते.

'मॉर्गन स्टॅनली'ने आपल्या अहवालात जो धोरणात्मक वातावरण अधिक अनुकूल असल्याचा उल्लेख केला आहे, तो अत्यंत अर्थपूर्ण आहे. सरकारने अलीकडील काळात केलेल्या सुधारणांमुळे भांडवली बाजारासाठी मजबूत संरचना निर्माण झाली आहे. बँकिंग क्षेत्रातील सुधारणा, एनबीएफसी क्षेत्राला दिलेली मजबुती, 'सेबी'मार्फत पारदर्शकता वाढवणे, 'आयपीओ'चा 'बूम' आणि डिजिटल व्यवहारांचा प्रसार हे सगळेच घटक देशांतर्गत बाजाराला स्थैर्य देत आहेत.

देशात कायम असलेली राजकीय स्थिरता अर्थव्यवस्थेला तसेच, देशांतर्गत बाजारांना स्थिरता देताना दिसून येते. धोरण सातत्य का महत्त्वाचे असते, हेच यातून अधोरेखित होते. 'एमएसएमई' आणि ग्रामीण भागातील गुंतवणुकीला मिळत असलेली चालना अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी साहाय्यभूत होत आहे. मध्यम आणि लघु उद्योग, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे मूळ घटक आहेत. त्यांना प्रोत्साहन मिळत असल्याने भारतीय शेअर बाजारही वाढत आहेत. देशातील मध्यमवर्गीय, सेवानिवृत्त नागरिकांच्या बचती बाजारात येण्यासाठी विश्वासार्ह वातावरण देशात निर्माण होत आहे. शेअर बाजार हा केवळ शहरांपुरता मर्यादित न राहता, तुलनेने लहान शहरांतील नागरिकही गुंतवणुकीत सहभागी होताना दिसून येत आहेत.

शेअर बाजार ही अर्थव्यवस्थेची नाडी असते, असे म्हणतात. आज भारताची ही नाडी ठणठणीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. जागतिक बाजारात भारताच्या आवाजाला अधिक महत्त्व प्राप्त होताना दिसून येते.

'मॉर्गन स्टॅनली'चा अंदाज ही केवळ भविष्यवाणी नाही, तर भारताच्या आर्थिक नीतींवरील जागतिक विश्वासाचे प्रमाणपत्र आहे. या विश्वासाचे सोने करण्यासाठी देशांतर्गत धोरणांत सातत्य, पारदर्शकता आणि दीर्घदृष्टी ही आवश्यक अशीच. शेअर बाजाराचे उच्चांक हे केवळ आकड्यांचे प्रदर्शन नसून, राष्ट्राच्या आत्मबळाचे दर्शनही घडवणारे ठरतात.

# प्रतिमान

५.५ टक्क्यांवरून सहा टक्क्यांपर्यंत वाढवल्याने बँकेच्या आर्थिक सुरक्षतेतही वाढ झाली. 'आरबीआय'ने दिलेल्या या लाभांशामुळे सरकारची वित्तीय तूट ४.५ टक्क्यांवरून अंदाजे ४.२ टक्क्यांपर्यंत कमी होण्याचा मार्ग मोकळा झाला. यामुळे सरकारला चालू आणि विकासात्मक खर्च सांभाळण्यासाठी कर्ज घेण्याची गरज कमी होणार असून त्यामुळे तिजोरीवरील कर्जभारही कमी होईल. राजकोषीय तूट कमी झाल्याने जागतिक गुंतवणूकदारांचा आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचा भारतावरचा विश्वास वाढतो. याचा थेट फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला आणि चलनाच्या स्थिरतेला होतो.

सध्या देशातील रोजगारनिर्मिती आणि आर्थिक वृद्धी यासाठी हा लाभांश लाभदायक असाच! 'आरबीआय' आणि केंद्र सरकारमधील धोरणात्मक समन्वय परस्परपूरक असाच दिसतो. 'आरबीआय'च्या आर्थिक विवेकबुद्धीमुळे आणि सरकारच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या समर्पित धोरणांमुळे भारताचा आर्थिक पाया अधिक सशक्त होत आहे.

वाढत्या खर्चाचा दबाव न ठेवता, निधीची योग्य वाटणी आणि नियोजन करणे, हे राजकोषीय व्यवस्थापनासाठी आवश्यक आहे. त्यामुळे सरकारचा आर्थिक आराखडा दीर्घकालीन विकासाला चालना देणारा ठरतो.

शेवटी 'आरबीआय'चा हा लाभांश म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक मोलाचा आधार आहे. या निधीमुळे सरकारला राजकोषीय तूट कमी करत विकासाच्या विविध योजनांमध्ये भर घालण्याची संधी मिळाली आहे. 'आरबीआय' आणि केंद्र सरकारमधील समन्वय हे भारताच्या उज्ज्वल आर्थिक भविष्याचे प्रतिबिंब आहे.



# पाकचे बुडते जहाज...

एकूणच काय तर, पाकिस्तान स्वतः जसा उद्ध्वस्त होईल, तसा त्यांच्या शेजार्यांनाही करेल, अशी भीती आहे. त्यामुळेच या देशापासून अधिक सावधगिरी गरजेची.

आकडेवारीचा विचार केल्यास पाकिस्तानची आर्थिक वृद्धी दोन टक्क्यांवर, महागाईचा दर २५ टक्क्यांवर, बेरोजगारी दर हा नऊ टक्क्यांपर्यंत आहे. सरकारी कर्जांचे प्रमाणही ७० टक्क्यांवर पोहोचलेले. ४० टक्क्यांहून अधिक जनता ही दारिद्र्य रेषेखाली आहे. पाकिस्तान कित्येकदा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्जाऊ रक्कम घेऊन मोकळा झाला आहे. एक टक्क्याहून कमी जनता ही थेट कर परतावा भरते.

शिक्षणाचीही वानवाच. पाकिस्तानात तरुणांची संख्या भारताप्रमाणेच अधिक. पण, त्यांच्या हाताला शिक्षण किंवा काम-कौशल्य नाही. शेतीवर आधारित मोठा वर्ग आहे. मात्र, भारताने सिंधू जलवाटप कराराला स्थगिती दिल्यामुळे तेथील शेतीही बेभरवशाची. खासगी क्षेत्रात सरकारी क्षेत्राचा हस्तक्षेप काही केल्या कमी होताना दिसत नाही. त्यामुळे उद्योगधंदेही नाहीत. परिणामी, पाकिस्तानी अर्थव्यवस्था रुळावर येणे केवळ अशक्यप्राय. असा अस्थिर देश शेजारी असणे, हे भारतासाठीही भूतकाळातही लाभदायी नव्हते, वर्तमानातही नाही आणि भविष्यातही नसावे. त्यामुळे पाकिस्तानची शकले पडून, हा देश अंतर्गत द्वंद्वातूनच उद्ध्वस्त होण्याकडे वाटचाल सुरु झाली आहे, हे निश्चित.

कथा

राजीवलोचन पुंडलिक

# दहशत

पिंपळाच्या पानांचा सडा पडला होता. पावसाची एक सर नुकतीच येऊन गेली होती. जमीन ओली होती. पानांवरून पाण्याचे थेंब टपकत होते. फांद्यांच्या बेचक्यात पारव्याचे घरटे होते. त्यात मादीने चार अंडी दिली होती. तपकिरी रंगाचा, आठ फूट लांबीचा महाभयानक नागराज जिभल्या चाटत हळूहळू फांदीवरून पुढे सरपटत जाऊ लागला. किंग कोब्रा! पारवा नर आणि मादी कर्कश चित्कार काढत नागाच्या जवळून घिरट्या घालत होते. कीमा माकडही चीऽची असा आवाज काढत होता. त्याने झाडाची पानं, काटक्या नागराजावर फेकल्या. पेरू तोडून नागाला जोरात मारला आणि नागाची फांदीवरची पकड सैल झाली. तो घसरून मातीवर पडला. पारव्याची होणारी पिलं जिवंत सुटली.

आवाज ऐकून डिसुझा मास्तर बाहेर आले. नाग पानांच्या खाली लपला. मास्तरांना खाली पडलेला पेरू आणि कीमा माकड दिसला. 'यू नॉटी कीमा' असं म्हणत ते आत परत गेले. नागराज हळूच सरपटत भिंतीकडे गेला. ओलसर मातीचा सुगंध अन् पानांचा स्पर्श त्याला हवाहवासा वाटला. तिथेच पडून राहिला. वेळेवर आपण पळू शकलो नाही, पानांमध्ये लपलो म्हणून वाचलो, एवढे कसे आपण सुस्तावलो...!

बिजली म्हणते ते खरं आहे का? झाडाच्या फांदीभोवती वेढे घेत ती वेलीवर चढली होती. खाली मुळापाशी तो पहुडला होता. मातीत माखल्याने मलूल दिसत होता. शेवटची कात टाकल्याला सहा महिने उलटले होते. आज सकाळीच त्याने हिरवा टंच टोड (बेडूक) गट्ट केला होता, त्यामुळे जरा सुस्ती चढली असेल, असं त्याला वाटलं. बायका-मुलांना तो घाबरवत नव्हता. ते आले की छान फणा काढून त्यांना दर्शन द्यायचा. त्याच्या अंगावर ते फुलं, लाह्या फेकायचे. बिजलीला ते नाही आवडायचं. एकदा सणाच्या दिवशी दोघेही सोबतीनं पुंगीवर गाणं ऐकता ऐकता बेभान होऊन नाचत होते. बायका-मुलं भोवती गोळा झाली. भक्तिभावाने त्या दोघांची पूजा करू लागली. तेवढ्यात एका बाईनं फेकलेले गेंदेदार झेंडूचे फूल बिजलीच्या डोळ्याला लागलं. बिजली चवताळली. तिने त्या बाईकडे पाहून फुत्कारत झेप घेतली. बाई किंचाळली, पूजेचं तबक सोडून पळू लागली. घाबरून सगळेच पळाले. त्याने बिजलीला थांबवले, बिजली म्हणाली, ''बघ मला कसे सगळे घाबरतात. तू फुत्कारत नाहीस तर तुझ्या अंगावर खडे फेकतात आणि तू काहीच करत नाहीस. चांगली दहशत बसली पाहिजे.'' तो म्हणायचा, ''अगं, ते भक्तिभावनेने पूजा करतात, फुलं वाहतात, आपल्याला दूध देतात. त्यांच्यावर असं फुत्कारत नको जाऊस.'' ''मी नागीण आहे आणि नागिणीसारखी राहणार. तू नुसता फुगला आहेस. आळशी झाला आहेस. जरा हालचाल कर... कात टाक... चपळ हो... नाही तर मरशील! आपण रेल्वे वस्तीत राहतोय, हे लक्षात ठेव!'' बिजलीने थयथयाट केला. गेल्या आठवड्यात आलेल्या पावसाचे पाणी बिळात शिरलं आणि तिला पक्कं कारण मिळालं. पिलांना घेऊन ती त्याला सोडून निघून गेली. त्याला फार वाईट वाटलं होतं. बिजलीवर त्याचे खूप प्रेम होते, पण ती त्याला समजून घेत नव्हती. रेल्वे कॉलनीत खाण्यापिण्याची चंगळ असते. उंदीर, बेडकं, अंडी, कोंबड्या मुबलक मिळतात.

डिसुझा मास्तरांचा हा बंगला रेल्वे स्टेशनला लागूनच असल्यामुळे सरपटत सरपटत रुळाकडे लवकर जाता येतं. घुशी आणि उंदीर सारखे फिरत असतात. शिवाय त्याला आवडणारे वंगणाचं तेल रुळांच्या सांध्यावर मिळायचे. पूर्ण लांबीने रुळाच्या बाजूला चिकटून झोपल्याझोपल्या लांब जीभेने तेल चाटायला त्याला आवडायचे. तासन्तास तो रुळाच्या बाजूला पडलेला असायचा. पहाटे त्याला रुळांच्या बाजूला अंगावर घाण पडायची. त्याचवेळी लाईनमन सांध्यांना ठोकायला आणि तेल लावायला यायचे, तेव्हा तो मुकाट्याने बिळात परत यायचा. त्यांच्या घरात चुकूनही घुसलो तर जीवच घेतात. काठ्या, दांडके, विळ्या घेऊन सात-आठ लोक येतात. लपायला दगडांच्या मागे गेलो तर काठ्या घुसवून हुसकावून लावतात. भिंतीवर चढलो तर सरळ चुन्याची निवळी फेकतात. त्याचं अंग क्षणभर शहारलं. बिजली सोडून गेली. बरं नाही वाटत. बिजली हिणवायची, ''तू अलिकडे फारंच साधू सज्जनासारखा वागतोस. तुला पाहिल्यावर कोणाला भीती वाटत नाही. परवा खेळता खेळता मुलं चेंडू शोधत आली, वारुळात काठी घुसवली, आपण अजून आत घुसलो. फुस्स करून बाहेर आलो असतो तर सगळे पळाले असते..!'' खरंच, बिजली बरोबर सांगते. असं गरीब, सज्जन साधूसारखं राहिलो तर आपली दहशत राहणार नाही, लोक त्रासच देतील. त्याने डोळ्यांची उघडझाप केली, एकदा जीभ बाहेर काढून चटकन आत घेतली. त्याला मुंगळ्यांचा वास आला. अंजीराच्या झाडावर सगळे मुंगळे शिस्तीने एका रांगेत चालले होते. त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. जीभेच्या एका फटकाऱ्यात त्याला दहा मुंगळे मिळाले. जरा आंबट चव जिभेवर आली...बरं वाटलं! त्याने एकदा शेपटीच्या वेटोळ्याकडे पाहिले, पण अंगावरच्या पानांमुळे शेपटी नीट दिसली नाही. हळूच पुढे सरकला. तो पुढच्या अंगणात गेला.

पेरूच्या झाडाखाली त्याला जागा स्वच्छ वाटली. मनमोकळा श्वास घेऊन त्याने पूर्ण शरीर फुगवले आणि मान उंचावून फणा काढला. ऐटीत सगळीकडे नजर फिरवली. त्याला पाठीमागचा भाग आणि शेपटी दिसली... 'अरे, खरंच की, किती विटला रंग आपला! एवढा सुंदर तपकिरी रंग, अगदी रयाच गेली!' स्वतःची लाज वाटून त्याने फणा आणि मान खाली घातली आणि मुकाट्याने बिळाकडे वळला. बिजली का सोडून गेली, हे त्याला आता कळलं. आपण कात टाकायलाच हवी, ही सुस्ती झटकायलाच हवी. माझी भीती वाटली पाहिजे. तो सळसळत मागच्या भागात गेला. चिंचेच्या झाडावर माकडं झुलत होती, त्यांचा गोंगाट, किंचाळणं ऐकून त्याने फणा काढत एक जोरात फुत्कार सोडला. माकडं घाबरून पळाली. 'हे असं... असं वागायला हवं नागासारखं! पण त्या आधी ही कात टाकायला हवी.' तो मान उंच करून जागा शोधू लागला. कात टाकताना कोणी बघायला नको. सरपटत तो भिंतीला घासून गेला. बोगनवेलीच्या फांद्या आणि मुळे जमिनीवर पसरली होती, पण त्यांच्या खालून जायला जागा होती. एक दीर्घ श्वास घेतला. पूर्ण अंग फुगवले. मुळाच्या खालून तो घुसला. वळसा घेऊन तोंड शेपटापाशी नेले. आळोखेपिळोखे देत तो पूर्ण वाकडा झाला, मातीवर लोळला...अंगावरचा पांढुरका पापुद्रा थोडा चुरगळल्यासारखा वाटला; कात अजूनही चिकटून होती. त्याच्या लक्षात आलं, माती ओली होती. तो पुन्हा भिंतीकडे सरकला. त्याला लाकडाचा मोठा ओंडका दिसला. ओंडका चांगला लांब आणि वाळून टणक झाला होता. ओंडक्याला त्याने मान घासली. थोडं खरचटलं. पूर्ण शरीर आकुंचित केलं. ओंडक्याला आणि भिंतीला घासून तो पुढे सरकू लागला. तशी ती कात भिंतीच्या खरखरीत भागाला चिकटली आणि तो पूर्ण मोकळा झाला. एकदम हायसं वाटलं. मोकळ्या जागी जाऊन ऐटीत फणा काढला. तो सुंदर दिसत होता.

(पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर

# भक्तिसुखाचे ठायी, दुःखाची वार्ताच नाही

विदर्भाच्या भूमीत उगवलेले भक्तीचे ब्रह्मकमळ म्हणजे शेगावचे संतप्रवर श्रीगजानन महाराज! श्रीमहाराजांचे अवघे चरित्र आपल्यासमोर आले ते संत दासगणू महाराजांमुळे. 'श्रीगजानन विजय' हा ग्रंथ म्हणजे श्रीगजानन महाराजांच्या अवतारकार्यातील महत्त्वाच्या घटनांची अधिकृत नोंद आहे, असे आजही मानले जाते. हे ओवी रूपातील लिखाण म्हणजे केवळ ग्रंथ नसून त्याला पोथीचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. या ग्रंथाच्या पारायणाने, मननाने एक वेगळीच अनुभूती मिळते, हा भाविकांचा विश्वास आहे. याचे श्रेय जाते ते, निःसंशयपणे श्रीदासगणू महाराजांकडे! दासगणू महाराजांचे जीवन हे अत्यंत नाट्यमय घटनांनी भरलेले आहे.



दासगणू महाराजांचा जन्म १८६८ सालचा आणि मृत्यू नोव्हेंबर १९६२ सालचा. ९४-९५ वर्षांच्या आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्यांनी अव्वल इंग्रजी काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळाचेही एक संपूर्ण तप अनुभवले. एका फार मोठ्या आणि धामधुमीच्या व समाजपरिवर्तनाच्या काळाचे ते डोळस साक्षीदार होते. बालपणात ते अत्यंत उनाड होते, असे त्यांनीच नोंदविलेले आहे. सुरुवातीच्या काळात दासगणू महाराजांनी लावण्या, शृंगारिक काव्ये अशा रचना केल्या. नंतरच्या काळात त्यांना एकेक्षणी याची किळसच आली. आपल्या या शृगांरिक रचना त्यांनी स्वहस्ते नष्ट केल्या आणि ते भक्तिमार्गाकडे वळले. या लहानश्या जागेत त्यांचे संपूर्ण चरित्र आणि वाङ्मय सीमित होणे केवळ अशक्य आहे. एकाच गोष्टीचा उल्लेख करतो. दासगणू महाराजांच्या आजवर प्रकाशित झालेल्या वाङ्मयातील रचनांची संख्या दीड लाखाच्या घरात आहे. चरित्रकाव्य, खंडकाव्य, विविध कीर्तनाख्याने, पोवाडे, स्तोत्रे इत्यादी आणि अजूनही अप्रकाशित असलेले आणि त्यांनी स्वतः नष्ट केलेले लिखाण वेगळे. मंगेश माहात्म्य, शंकराचार्य चरित्र, ज्ञानेश्वर चरित्र, माधवाविजय अशा त्यांच्या रचना प्रसिद्ध आहेत. म्हणूनच त्यांना आधुनिक महिपती असे नामाभिधान लाभलेले आहे. दासगणू महाराज मूळचे पंढरपूरजवळच्या करकंब गावाचे. त्यांचे मूळ नाव गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे. महाराजांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील अकोळनेर या गावी झाला.

महाराजांनी एक वेळ पोलिस खात्यात कॉन्स्टेबल म्हणून महिना १३ रुपये पगारावर नोकरी केली होती. त्यांचे वरिष्ठ नानासाहेब चांदोरकर यांच्या सेवेत महाराज त्यावेळेला होते. चांदोरकरांना तमाशा बघण्याचा आणि लावण्या ऐकण्याचा शौक होता. त्यावेळी दासगणू महाराजांनी लावण्या आणि तमाशातील कवने लिहिली. पुढे ती सारी कवने त्यांनी स्वहस्ते नष्ट केली. पोलिस खात्यातील नोकरी सोडल्यानंतर त्यांनी विरक्ती धारण केली आणि ते कीर्तने करू लागले. एकदा दासगणू महाराजांनी संतश्रेष्ठ साईबाबांसमोर कीर्तन केले. दासगणू महाराजांच्या अंगावर तेव्हा कीर्तनकाराचा उत्तम वेष होता. 'देवाची भक्ती करायला तुला एवढी वस्त्रे कशाला हवीत?' असे साईबाबा त्यांना म्हणाले. त्यानंतर दासगणू महाराजांनी आयुष्यभर केवळ धोतर नेसून उघड्या अंगाने कीर्तने केली, अशी नोंद आहे. दासगणू महाराजांच्या साहित्यसागरातील स्वतेजाने चमकणारी रत्ने म्हणजे त्यांनी रचलेली कीर्तनाख्याने. महाराज एक उत्तम कीर्तनकार होते. ते नारदीय पद्धतीने कीर्तन करीत. कीर्तनाविषयी त्यांना प्रत्यक्ष संत साईबाबांचा आशीर्वाद लाभला होता, असे त्यांच्या चरित्रात नमूद केले आहे.

महाराष्ट्राला कीर्तनाची एक अजेय आणि तेजस्वी परंपरा आहे. सामाजिक प्रबोधनाचे ते एक साधन आहे. दासगणू महाराजांच्या काळात आजच्या सारखी प्रभावी प्रसार माध्यमे नव्हती तरीही, कीर्तन या परंपरेचा दासगणू महाराजांनी व्यापकरीतीने उपयोग केला. त्यांनी स्वतःची एक स्वतंत्र कीर्तन पठडी निर्माण केली, असेही अनेकांचे मत आहे. श्रोत्यांच्या मनःचक्षूंसमोर तो प्रसंग प्रत्यक्ष उभा करण्याची नाट्यमयता दासगणू महाराजांच्या कीर्तनात होती. दासगणू महाराजांची अंदाजे ६०-६५ आख्याने छापील स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यांच्या आख्यानाचा उपयोग ते स्वतः कीर्तनात करीत. त्यांच्या आख्यानांचे विषय म्हणजे ईश्वरी अवतार आणि संत. त्यात जसे महाराष्ट्रातील संत आहेत, तसेच परप्रांतीय संतदेखील आहेत. इतकेच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, अहल्याबाई होळकर, लोकमान्य टिळक यांच्या जीवनावरही त्यांनी आख्याने रचलेली आहेत. दासगणू महाराजांच्या साहित्यनिर्मितीला सुरुवात झाली त्यावेळी ते आयुष्याच्या मध्यावर उभे होते. त्यानंतरचा सर्व काळ त्यांनी ईशभक्ती आणि वाङ्मय निर्मितीतच व्यतीत केला. श्रीदासगणू महाराजांच्या समग्र साहित्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांना असलेले तत्कालीन परिस्थितीचे आणि वास्तवाचे भान. तसेच त्यांना येणाऱ्या काळाचीही चाहूल लागलेली होती. ते द्रष्टे होते यात संशयच नाही.

शेगावनिवासी संत श्रीगजानन महाराजांविषयीचा 'गजानन विजय' या ग्रंथाचा त्या दृष्टीने विचार करून बघा. संत म्हटले की, चमत्कारही आलेच. श्रीगजानन महाराजांच्या चरित्र ग्रंथातही चमत्कारांचे वर्णन आहेच. परंतु दासगणू महाराजांनी त्या चमत्कारांचे जे स्पष्टीकरण दिले आणि सामाजिक आशयाशी त्या चमत्कारांची जी सांगड घातली, तशी अन्यत्र कुठे दिसत नाही. या दृष्टीने या ग्रंथाच्या पाचव्या अध्यायातील भास्कर पाटलाची कथा अभ्यासण्याजोगी आहे. वाचणाऱ्याच्या आणि श्रवण करणाऱ्याच्या मनात निष्काम भक्ती उत्पन्न करण्याचे रसायनच या कथेत आहे. कारण एकच, दासगणू महाराजांची प्रासादिक, सुबोध आणि थेट मनाला भिडणारी लेखनशैली! त्यांनी आपल्या रचनांमध्ये अनेक पद्यप्रकारांचा वापर केला आहे. त्यांनी लिहिलेला एक धावा इथे वानगीदाखल देत आहे. **'विठोबा।। हे भीमातट वासा।। देवा धाव रे।। केशवा।। झडकरी पद मज दावा।। देवा धावरे।। नारायणा।। नको करू माझी दैना।। देवा धाव रे।। माधवा।। अनाथ पदरी घ्यावा।। देवा धावरे।।** महाराजांनी आख्यानकाव्यासोबतच विविध पदेही लिहिलेली आहेत. त्यांचे संगीताचे ज्ञान उत्तम होते.

संत सावता माळी आख्यानात त्यांनी एक धुमाळी लिहिली आहे. अनेक लोकप्रिय नाट्यगीतांच्या चालींवर त्यांच्या रचना आहेत. संत तुकाराम महाराजांच्या चरित्रावरील आख्यानात असलेले एक पद 'राना रानात गेली बाई शीळ' या गाण्याच्या चालीवर बेतलेले आहे. तुकाराम महाराजांच्या पत्नी जिजाईच्या तोंडी ते पद आहे. **घरादाराचा झाला बाई खेळ ।।ध्रु।। माझा पती देव तुझ्या पायी रे। वेडा झाला त्या सुदबुध नाही रे। तुलसी काष्ठाची गाला घाली माळ।।१।। यावर संत तुकाराम बुवांचे उत्तर असे आहे... घरादाराचा केला नाही खेळ।।धृ।। भक्ती उपजे दैन्याच्या पोटी ग। या भक्तिची किंमत मोठी ग। भक्ती सुखार्थ इंद्र घोटी लाळ।।१।।** महाराजांनी आयुष्यात विविध अनुभव घेतलेले आहेत. त्या अनुभवांचे अत्यंत निरपेक्षपणे, अलिप्त राहून विश्लेषण केले आहे. त्याचे चिंतन करून भक्ती आणि समाजोद्धार या सूत्रांवर आधारित लिखाण केलेले आहे. नुसतेच लिखाण केले नाही, तर कीर्तनासारख्या तत्कालीन लोकप्रिय माध्यमाचा त्यांनी जाणीवपूर्वक अंगीकार केला. केवळ भक्तीच नव्हे, तर दांभिकतेचे बुरखे फाडण्यापासून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्यापर्यंत विविध विषय त्यांनी हाताळले आहेत. दासगणू महाराजांच्या अपार लेखन सागरात अनेक लखलखती रत्ने आहेत. समाजात जातिभेद, पंथभेद, उपासना भेद, धर्मांधील तेढ नको इतकी वाढीला लागलेली आहे. समाजात परस्पर सौहार्द नांदावे, समाज समरस व्हावा यासाठी संत आणि सत्पुरुषांनी परिश्रम केले. सामाजिक समरसतेसाठी या विभूती झिजल्या. परंतु समाजाचे आजचे चित्र पाहू जाता, आपले वर्तन या विभूतींना आणि त्यांच्या विचारांना कमीपणा आणणारे आहे, असे कोणाला जाणवते. दासगणू महाराजांच्या काळातही काही वेगळी परिस्थिती नव्हती.

(पान ६ वर)

ललित

अजित देशमुख

# माझी बाग आणि झपाटलेला पहिला पाऊस

माझ्या बागेला मी फार्म हाऊस न म्हणता बागच म्हणतो. फार्म हाऊस म्हटलं की डोळ्यासमोर गेटवरील कुत्र्यापासून सावध रहा अशी ठळक अक्षरातील पाटी, चेकर्ड टाइल्सच्या पायवाटा, त्यांच्या दोन्ही बाजूला गोल्डन डुरांडाच्या आकार दिलेल्या रोपांची कड, मधेच उभ्या दांड्यांवर पांढर्या गोल हंड्या असलेले दिवे, उंच कंपाऊंडला लागून उभ्या अशोकाच्या झाडांची रांग, आणि लॅण्डस्केप निपुणांनी लिहून दिल्याप्रमाणे मोजकीच झाडांची लागवड, एक लॉनचा चौकोन, त्याला रंगीत विटांची बॉर्डर, त्यामध्येच बाजूला पार्टी सदस्यांसाठी एक वॉश बेसिन, लॉनमधे झाडाच्या मोठ्या खोडाची चकती वापरून केलेला इको टी पॉय. त्याभोवती गोल लाऊन ठेवलेल्या प्लॅस्टिकच्या रंगीत खुर्च्या, बाजूला तळाशी रंगीत टाइल्स लावलेला आटोपशीर तलाव, पोर्च असलेला बंगला, त्यावर सोलर सिस्टीम, पावसाळ्यात Rain Water Harverting वगैरे वगैरे... इथे प्रत्येक गोष्ट





corrorvbed. सगळं आखीव रेखीव आणि चकाचक. जणू आपल्यापुरतंच घरापासून लांब वसवलेलं छोटं शहर.

माझ्या बागेत असं चित्र नाही. परेडच्या आखीव मैदानापेक्षा इथे झाडांनाच आनंदात मनसोक्त जगण्यासाठी केलेली त्यांचीच दाट वस्ती. झाडं जणू एकमेकांच्या खांद्यावर हात ठेऊन उभी. रामफळाच्या बाजूला तुती जोमाने वाढतेय, तर करमराच्या झाडाचा एक हात तोतापुरी आंब्याच्या खांद्यावर आणि दुसरा सुरंगीने धरून ठेवलेला. सरबती लिंबाचे झाड त्याच्या शेजारील तमालपत्रांचा सुगंध घेत उभे, दोन चिकूच्यामधील कढीपत्ता त्यांच्याही पेक्षा उंच होऊन आपल्या छत्रीचा पसारा फुलवतोय. दुसर्या बाजूला गुलाबी जांबाची फळे देणारं भरमसाठ वाढलेलं झाड त्याच्याच बाजूच्या चिकूला गळा मिठी मारून उभं. तिकडे पायरीच्या बाजूचं चाफ्याचं झाड आडव्या फांदीने वाट अडवून ठेवणारं. डबल जास्वंदीची एक काडी आडोश्याला खोचून तयार केलेले रोप मी असेच वाढू दिले. आता जवळजवळ पंधरा फूट उंच झालेल्या त्याचे खोडच सुमारे सहा इंच व्यासाचे झाले आहे. त्याची फुले उंचावर असल्यामुळे काढता येत नसली तरी दाट हिरव्या पानांतील असंख्य लालभडक फुलं आणि त्यांवर सुईच्या चोचीने मध खायला येणारे पक्षी पाहणं ही एक पर्वणी असते. बकुळ आणि ताम्हण वृक्षांची तीच तर्हा. इथे जातीभेद नाही. रुद्राक्षाचे झाड दहा बारा फूट वाढल्यावर त्याच्या बुंध्याजवळ उंबराचे एक झाड आपोआप उगवले.

दत्त तत्वाने शिव तत्त्वाचीच निकटची सोबत निवडली. दोन्ही वृक्ष एकमेकांना चिकटून भराभरा वाढले. उंबर वृक्ष फळांनी लगडलेला. रुद्राक्षाला तुलनेने फळे खूप कमी. पपई अशाच कुठेही उगवलेल्या. तशीच अननसं... कुठे आंब्याच्या पारावर तर कुठे जांभळी जवळ. कुंपणा जवळील आलामांडा या वेलीचा एक हात मधल्या जास्वंदीमधून जाऊन रानभेंडीशी हस्तांदोलन करतोय. केळीच्या झाडांचं तर काही खरं नसतंच. खालचे मुंढवे कापलेले नसले की केळीं कायम एकमेकींच्या अंगावर हात टाकून उभ्या असतात. त्यातली एखादी मधोमध असलेली केळ विताना अडत नाही. ती व्यायल्याचेही काही काळानंतर कळते. मात्र दीड दोनशे केळ्यांचा, इतर केळींच्या झाडांनी आपल्या आडोश्यात ठेवून वटवाघूळांपासून लपवलेला लोंगर तयार झाला की तो काढताना मात्र आपली दमछाक होते.

इथले अंगण सुद्धा मातीचे चोपलेले असते. अनेक जणांनी तिथे कायमस्वरूपी लादी बसवावी अशी सूचना केली. मला मात्र ते मातीचेच हवं आहे. नाहीतर अंगणात दयाळ, साळुंकी, राखी वटवट्या हे पक्षी किडे, मुंग्या टिपायला कसे येतील? पावसाळा संपला की शेणाने सारवलेल्या अंगणात सकाळी उजाडायच्या आत अनवाणी चालावे. मऊशार कार्पेटवर पाऊले ठेवल्यासारखे वाटते. शेणाच्या सारवणाचे पाणी आपोआप कडेच्या झाडांच्या मुळाशी जाते. त्यामुळे त्यांना अनायासे शेणखतही मिळते. पावसाळा सुरू होण्याच्या बेतात त्याच्या आगमनाची खबर, एखादी सर, नाचून दवंडी पिटल्यासारखी येऊन जाते. जाताना झाडांच्या पानांवरच्या धुळीवर ठिपके उमटवून जाते. तापलेल्या तव्यावर चार थेंब पाणी शिंपडून तो किती तापलाय हे आचारी पाहतो तशी ढगांकडून ही जमिनीची तपासणी असावी. आणि मग सकाळीच बागेची काळजी घेणार्या मामांचा फोन येतो. येताय काय आज? पाऊस रात्रभर नुसता कोसळून आत्ता जरा थांबलाय! लाईट रात्रीपासून गेले ते आत्ता आलेत. त्या पहिल्या दमदार पावसाची आणि बागेची भेट झाल्या झाल्या, बाग पाहण्याची मला उत्कंठा असतेच. मी लगेच निघतो.

हायवे सोडून गावरस्ता धरला की मी गाडी हळू हळू चालवतो. दुतर्फा सृष्टी स्वच्छ धुवून निघालेली असते. रस्त्यालगतचे दगडच काय, रस्ता आणि बारीक खडी सुद्धा राखाडी रंग टाकून काळेभोर झालेले असतात. गाडी जशी पुढे पुढे जाते तसतसे मातीतूनच उडाल्यासारखे दयाळ पक्षी चोचीत गांडुळ किंवा अन्य किडे धरून उडताना दिसतात. कधी नाही तो एरवी झाडांवर दिसणारा कोतवाल पक्षीसुद्धा खाली उतरून जमिनीलगत उड्या मारताना दिसतो. पाऊसाने घरटी विस्कटल्यामुळे बुलबुलच्या जोड्या आपसात आपलं दुःख आळवत असतात. चिंचेच्या झाडावर बगळ्यांचा एक थवा भिजलेल्या पंखातून चोची फिरवत अस्ताव्यस्त झालेल्या पिसांचा भांग पाडण्यात तल्लीन झालेला दिसतो. रस्त्याच्या कडेला एखादी लेकुरवाळी कोंबडी आपल्या कापसाच्या गोळ्यांसारख्या पिल्लांना आपल्यापासून लांब न जाण्याविषयी दरडावत आजूबाजूला पिल्लांवर टपलेला शिक्रा तर नाही ना याची खातरजमा करून घेत आहे. पाऊसाच्या माऱ्याने खडी मधील माती धुवून गेल्यामुळे किडे अनायासे वर आल्याने आपल्या पायाने माती वासकरत पिल्लांना खाणे शोधून देण्याचे तिचे सायास आता वाचले.

थोडं पुढे गेलं की गावची नदी. खरं तर ओहोळच तो. कर्नाळा डोंगरराजीतून खाली वहात येणारे पाऊसाचे पाणी एकत्रित होऊन त्याचा मोठा प्रवाह बनून ते या ओहोळातून थेट खारपाड्याच्या खाडीत सामील होऊन समुद्राला जाऊन मिळते. त्यावरील पुलावर आलो की मी थांबतो. इंजिन बंद करून हळूच खाली उतरतो. पाण्याची मोठी डबकी नाहीशी होऊन ओहोळ चहाच्या रंगाचा होऊन वाहता झालेला असतो. एरवी चिखलात उभे असलेले ढोकरी पक्षी आता पाण्यापासून जरा दूर आपली मान आणखीनच आत ओढून पाण्याचा वेग कमी होण्याची वाट पहात कुबड आल्यासारखे निश्चल उभे असतात. ओहोळा वरून गेलेल्या केबल्सवर पांढर्या छातीचा आणि निळ्याभोर पंखांचा खंड्या आपली किरमिजी रंगाची लांब चोच मानेबरोबर इकडे तिकडे हलवत, भक्ष्याकडे सूर मारण्यासाठी पाण्याकडे नजर ठेऊन असतो. बागेच्या फटकाजवळ जावे तर प्रथम रानसई रस्त्याच्या चढावा वरून वाहात आलेल्या पाण्याबरोबर खाली आलेला कचरा रस्त्यावर विखुरलेला समोर येतो.


फाटकातूनच अधीर डोळे बागेकडे लागतात. एरवी पिकलेली पाने खाली सोडताना दिसणारी झाडं आज अगदी शांत असतात. गाडी आत घेतली की फाटक ते घर यामधील वाटेवर थोड्या अंतरावर मी थांबतो आणि पावसाळी बूट चढवून खाली उतरतो. बाग अगदी स्तब्ध असते. कसलाही आवाज नाही. फक्त वरच्या पानांवरून खालच्या पानांवर ओघळणाऱ्या थेंबाचा. टप... टप आवाज. सूर्य नारायण काळ्या ढगांच्या आड असल्याने बाग थोडी अंधारलेली. त्यामुळे शांतता आणखी गडद भासते. झाडे स्वच्छ धुवून निघालेली असतात. भरपेट जेऊन घेतल्यावर, जेवण अंगावर आल्यासारखी पेंगुळलेली. प्रत्येक झाडाची एखाद दुसरी फांदी डुलकी लागून मान टाकल्यासारखी खाली झुकलेली असते. मध्यम आजाराच्या झाडाची अशी फांदी पुन्हा सरळ करून दुसऱ्या फांद्यांमध्ये अडकवायला उचलली की वरच्या फांदीतून पाण्याचे थंडगार थेंब अंगावर पडून एक गुदगुल्या करणारी शिरशिरी आणतात. एक थेंब नेमका चष्म्यावर पडतो. मग चष्मा काढून पुसा. तयार होत असलेली अननसं माना आणखीनच जमिनीकडे टेकवत झोपी गेलेली दिसतात. **(क्रमशः)**

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य (भाग ४९)

# कर्मयोगी रवींद्रनाथ



कॅलिडोस्कोप किंवा शोभादर्शक यंत्र आपण सर्वांनी पाहिले असेल किंवा हाताळले असेल. ते आपण जसजसे फिरवू, तसतश्या वेगवेगळ्या नयनरम्य मनोहर आकृत्या दिसायला लागतात. प्रत्येक वेळी वेगळी आकृती! गुरुदेव रवींद्रनाथांचे व्यक्तिमत्व देखील मला असेच कॅलिडोस्कोपसारखे वाटते. प्रत्येक वेळी वेगळे दिसते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आपण शोध घेऊ तेवढा कमी. सूर्योदय किंवा सूर्यास्ताच्या आकाशात दिसणार्या सगळ्या रंगछटा कागदावर प्रकट करणे थोडेच शक्य असते! तसाच हा 'रवी'! त्याची किरणे इतकी विविध रंगांची आणि मनोहारी की शब्दात पकडणे अवघडच!

तुकाराम महाराजांच्या शब्दात त्यांच्याबद्दल बोलायचे तर 'बोले तैसा चाले' असे हे व्यक्तिमत्व होते. समाजात सुधारणा घडवून आणण्याची इच्छा असणारा, शिक्षणात क्रांतिकारक बदल घडवून आणणारा, ग्रामविकासाचे विविध प्रकल्प हाती घेणारा, शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान आणून शेतकर्यांच्या प्रगतीसाठी सदोदित प्रयत्नशील असणारा, साहित्यक्षेत्रात नवनवीन प्रयोग करणारा, संगीत क्षेत्रातील जुन्या नव्या परंपरांची सांगड घालणारा, चित्रकलेतील प्रयोग करून स्वतःची नवीन शैली निर्माण करणारा हा अवलिया होता. केवळ पुस्तकी पांडित्य त्यांच्या जवळ नव्हते. या लेखापासून त्यांचा उल्लेख 'गुरुदेव' म्हणूनच करूया... गुरुदेवांचा काळ अनेक अंधश्रद्धा आणि जाचक रुढी परंपरा यांनी प्रभावित झालेला होता. अशा या काळात आपल्या मुलाचा रथिंद्राचा विवाह त्यांनी एका विधवा मुलीशी केला. त्यांनी ठरवले असते तर अनेक चांगल्या मुली त्यांच्या मुलासाठी चालून आल्या असत्या परंतु गुरुदेव केवळ इतरांना फुकाचा उपदेश करणाऱ्यातले नव्हते. त्यांनी स्वतःच एका विधवेशी आपल्या मुलाचा पुनर्विवाह करून समाजापुढे आदर्श घालून दिला. या मुलीचे नाव प्रतिमा. १९१० मध्ये ही प्रतिमा गुरुदेवांची सून म्हणून आली. दुर्दैवाने तिला अपत्य होऊ शकले नाही परंतु शांतिनिकेतनमधील मुलांची ती आई झाली. गुरुदेवांच्या पत्नी मृणालिनीदेवी वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षीच त्यांना सोडून गेल्या. त्यावेळी मुले लहान होती. आणि गुरुदेवांचा संसार उघड्यावर पडला होता. हा संसार सांभाळण्याचे महान कार्य या प्रतिमादेवीने केले. शांतिनिकेतन आणि श्रीनिकेतन या गुरुदेवांनी स्थापन केलेल्या दोन महत्त्वाच्या संस्था. शांतिनिकेतनमध्ये बालविकासाचे कार्य चाले तर श्रीनिकेतनमध्ये ग्रामविकासाचे कार्य चाले. प्राचीन काळातील ऋषींनी नुसती वेदपुराणे लिहिली नाहीत तर शेती देखील केली. त्यांचे जीवन म्हणजे उक्ती आणि कृती यांचा सुरेख संगम होता. त्याच ऋषीकुलांचा वारसा सांगणाऱ्या परंपरेतील आधुनिक ऋषी म्हणजेच गुरुदेव रवींद्रनाथ टागोर. तसे पाहिले तर गुरुदेवांचे घराणे हे जमीनदार घराणे होते परंतु सामान्य शेतकऱ्यांबद्दल त्यांना जिव्हाळा होता. त्यांच्या सुखदुःखाशी ते एकरूप झाले होते म्हणूनच स्वतः शेतीत राबण्यासाठी, त्यात घाम गाळण्यासाठी ते पुढे सरसावले. त्यात त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. त्यांनी नुसतीच शेती केली असे नाही तर ते त्यातील उत्तम जाणकारही होते आणि आपल्या कृषीविषयक प्रयोगातून त्यांनी अनेक चांगले निष्कर्ष आपल्या विद्यार्थ्यांपुढे आणि शेतकऱ्यांपुढे ठेवले. इंग्रजांनी शेतकऱ्यांचा आणि शिक्षणाचा संबंध तोडला. शहरात इंग्रजी शिक्षण घेणारी मुले शेतात राबायला किंवा कष्ट करायला कमीपणा मानू लागली. शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती यात अंतर पडत गेले आपल्या समाजाचा किंवा देशाचा विकास करायचा असेल तर आधी खेड्यांचा विकास झाला पाहिजे हे तत्व गांधीजींनी प्रतिपादन करण्याच्या आधी अनेक वर्षे गुरुदेवांनी सांगितले होते. गुरुदेवांनी ठरवले असते तर आपल्या मुलाला इंग्लंडमध्ये बॅरिस्टर होण्यासाठी पाठवले असते. परंतु त्यांनी त्याला कृषीविषयक आधुनिक शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला पाठवले. भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा एक अनोखा दुवा होता. समाजाच्या विकासासाठी अखेरच्या श्वासापर्यंत कार्यरत राहणारा हा कर्मयोगी होता. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात पदार्थविज्ञानशास्त्रावर ग्रंथरचना केली. बुद्धीच्या विकासासाठी विज्ञान विचार करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. विश्वभारतीतल्या प्रमथनाथ सेनगुप्त या फिजिक्सच्या प्राध्यापकांना बरोबर घेऊन विश्वपरिचय नावाचा आधुनिक विज्ञान कोश त्यांनी तयार केला. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात हातात जपमाळ घेऊन न बसता अखंडपणे कार्यरत राहणारा हा कर्मयोगी होता. मऊ मेणाहुन आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदू ऐसे' ही उक्ती सार्थ करणारे हे व्यक्तिमत्व होते. मातीत रमणारी ही बोटे काव्यलेखन आणि गायन वादनातही रमायची. घरामध्ये पाहुणे असतील तर गृहिणीला स्वयंपाकातही मदत करायची. अशा या नाजूक आणि कलाप्रेमी बोटांसोबतच कुस्तीचे डावपेच लढू शकणारे बलदंड बाहू देखील त्यांना होते. गुरुदेवांचे शरीर एखाद्या पंजाबी शेतकऱ्यांप्रमाणे धडधाकट होते. त्यांना मल्लविद्या शिकण्यासाठी त्यांच्या वडिलांनी एक पहिलवान सुद्धा ठेवला होता. इथे भगवान कृष्णाची आठवण येते.

कृष्णाची नाजूक बोटे बासरीचे मधुर स्वर देखील छेडत असत आणि अनेक राक्षसांना आणि मल्लांना अस्मान दाखवणारे त्याचे बळकट बाहू देखील होते.

प्रख्यात वनस्पती शास्त्रज्ञ डॉ जगदीशचंद्र बोस हे गुरुदेवांचे घनिष्ठ मित्र होते. पद्मा नदीत पद्मा नावाच्या आपल्या आवडत्या बोटीत बसून गुरुदेवांनी आपल्या आयुष्याची काही वर्षे काढली. या काळात त्यांनी शेतकर्यांशी संवाद साधला. कष्टकर्यांच्या सुखदुःखांशी ते एकरूप झाले आणि याच काळात त्यांची साहित्य निर्मिती देखील झाली. या काळात शनिवार रविवारी डॉ जगदीशचंद्र बोस त्यांच्याकडे बोटीवर मुक्कामी असत. गुरुदेवांची नवीन कथा, कविता किंवा नाटक यांचे ते प्रथम वाचक किंवा श्रोते असत. दोघेही एका दृष्टीने संशोधक होते एक वनस्पतींचे रहस्य शोधणारा आणि दुसरा मानवी जीवनाचेच गूढ उकलण्याचा प्रयत्न करणारा. विद्यार्थ्यांना मातृभाषेतच शिक्षण दिले पाहिजे. इंग्रजीतले ज्ञानभांडार, तत्त्वज्ञान, विचारधन मातृभाषेत विद्यार्थ्यांसाठी खुले केले पाहिजे असे त्यांचे मत होते. परंतु ते केवळ बोलणार्यातले नव्हते. उत्तम इंग्रजी जाणत असताना सुद्धा व्यासपीठावरून ते बंगाली भाषेतच श्रोत्यांशी संवाद साधत. कलकत्ता विद्यापीठामध्ये पदवीदान समारंभात बंगालीतून भाषण करणारे गुरुदेव हे पहिले भारतीय विचारवंत होते. त्यावरून त्यांची तथाकथित इंग्रजाळलेल्या शिक्षित लोकांनी कुचेष्टा केली. परंतु गुरुदेवांना त्याची पर्वा नव्हती. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते गुरुदेवांचे!

# ग्रहसंकेत

**(रविवार, १ जून ते शनिवार, ७ जून २०२५)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.

✻ **रविवार, १ जून-** अरण्य षष्ठी, विंध्यवासिनी पूजा, चांगदेव महाराज यात्रा पुणतांबे ✻ **सोमवार, २ जून-** कामु रेवाप्पा माळी महाराज पुण्यतिथी खुपसंगी (ता. मंगळवेढा) ✻ **मंगळवार, ३ जून-** दुर्गाष्टमी, तुकामाय महाराज पुण्यतिथी यहेळगाव (जि. हिंगोली) ✻ **बुधवार, ४ जून-** महेश नवमी, कुमारी पूजन, गुरुदेव रानडे पुण्यतिथी निंबाळ (जि. विजापूर) ✻ **गुरुवार, ५ जून-** जागतिक पर्यावरण दिन, गंगादशहरा समाप्ती, गंगावतार, आनंदगिरी महाराज पुण्यतिथी करंजवडे (ता. वाळवा) ✻ **शुक्रवार, ६ जून-** निर्जला स्मार्त एकादशी (या उपवासाने बारा एकादशींच्या व्रताचे फल मिळते.), किल्ले रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा, गायत्री जयंती ✻ **शनिवार, ७ जून-** भागवत एकादशी, बकरी ईद, श्री रामदासबाबा पुण्यतिथी बेलापूर (जि. नगर)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २, ४ जून ✻ **जावळ-** ६ जून (१० नंतर), ✻ **गृहप्रवेश-** २ जून (सकाळी १० नंतर)

### मेष :- सौख्याच्या घटना

राशी स्वामी मंगळ ६ जूनला पंचमात येत आहे. दगदग थोडी कमी होणार आहे. आहार विहारावर नियंत्रण ठेवावे. पोटाच्या तक्रारी वाढणार आहेत. उष्णतेपासून त्रास संभवतो. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. स्थावर प्रश्न आता सुटतील. नव्या विचारांना चालना देता येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १, ४

### वृषभ:- उपासना करावी

व्ययेश, सप्तमेश मंगळ ६ जून-ला सुखस्थानी येत आहे. विनाकारण धावपळ वाढणार आहे. नोकरी, व्यवसायात विचाराने रहावे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. महत्त्वाची कामे पूर्ण विचाराने करावीत. यांत्रिक क्षेत्रात प्रगतीच्या घटना घडतील. गुढ विद्येत प्रगती होईल. अपेक्षित संधी लाभतील. राशीतील रवि, हर्षलमुळे उत्साह, धडाडी वाढेल. इष्ट देवतेची उपासना करावी. शुभ ता. २, ४

### मिथुन:- सुख स्वास्थ लाभेल

राशी स्वामी बुध राशीतच गुरूवर येत आहे. मंगळ धनातून मुक्काम हटवणार आहे. त्यामुळे सुख स्वास्थ लाभेल. व्यवसायीक चिंता कमी होतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. महत्त्वाच्या संधी लाभणार आहेत. स्वागतच करावे. सरकारी कामे चिकाटीने होतील. अनावश्यक खर्च टाळावा. कौटुंबिक जीवनात सुख समाधान लाभेल. शुभ ता. १,४

### कर्क:- वादाचे प्रसंग टाळावेत

पंचमेश, दशमेश मंगळ धनस्थानी केतूवर येत आहे. खर्चाचे प्रसंग वाढणार असले तरी प्राप्तीचे प्रमाणही वाढणार आहे. उपजत कला गुणांचा विकास होत जाईल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. वादविवादाचे प्रसंग टाळावेत. सरकारी कामे मनासारखी होतील. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अपेक्षित् संधी लाभतील. शुभ ता. ४

### सिंह:- सुसंधी लाभतील

सुखेश, भाग्येश मंगळ राशीत केतूवर येत आहे. विनाकारण धावपळ करू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात स्वमताग्रह टाळावा. सामंजस्याने रहावे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. प्रशासन सेवेत अनुकूलता वाढेल. अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. २, ४

### कन्या:-अडचणी वाढतील

तृतीयेश, अष्टमेश मंगळ बारावा होत आहे. तेथे केतूही आहे. त्यामुळे औषध, पाण्यासाठी खर्च वाढणार आहे. कर्मस्थ बुध, गुरूमुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अडचणी वाढणार असल्या तरी मार्गही निघत जाईल. ज्ञानदान, बँक, वाहतूक क्षेत्रात प्रगती होईल. संसर्गजन्य आजारापासून जपून असावे. शुभ ता. २, ४

### तुला:-स्पर्धांमध्ये यश

धनेश, सप्तमेश, मंगळ ६ जूनला लाभस्थानी येत आहे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. भाग्यातील गुरू बुधामुळे कार्यक्षेत्रात चांगली वाटचाल करू शकाल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणींची चिंता करू नका. प्रसंगी मार्गही निघत जाईल. नव्या कामांना गती मिळेल. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या संधी लाभतील. शुभ ता. १, २

### वृश्चिक:- समस्या सुटत जातील

राशी स्वामी मंगळ कर्मस्थानी येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. अष्टमातील बुध गुरूमुळे प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. वैद्यकिय, कृषि, संरक्षण अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. समस्या सुटत जातील. फार चिंता करू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. स्वमताग्रह टाळावा. शुभ ता. २

### धनु:- योग्य निर्णय घ्यावेत

पंचमेश, व्ययेश, मंगळ भाग्यस्थानी येत आहे. राशीसमोर बुध, गुरू असल्याने मनासारख्या सौख्यदायी घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. अडचणींची चिंता नको. संतती सौख्य लाभेल. दगदग टाळावी. अपेक्षित संधी लाभणार आहेत. प्रतिकूलतेवर मात कराल. विवाह विषय कार्याला गती मिळेल. योग्य निर्णय घ्यावेत. शुभ ता. १, २

### मकर:- आनंददायी कालावधी

सुखेश, लाभेश मंगळ अष्टमात केतूवर येत आहे. त्यामुळे प्रकृतीच्या तक्रारींकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. सुखस्थ शुक्रामुळे सौख्याच्या घटना घडतील. कौटुंबिक जीवनात आनंददायी कालावधी आहे. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. गिरी मसाल्याचे पदार्थ जास्त खाऊ नयेत. दूरच्या प्रवासाचे बेत टाळावेत. विचाराने रहावे. शुभ ता. २, ४

### कुंभ:- विचाराने रहावे

राशी समोरच केतूवर मंगळ येणार आहे. कौटुंबिक जीवनात पेल्यातील वादळे पेल्यातच ठेवावीत. स्फोटक परिस्थिती निर्माण होवू देऊ नका. चौथे रवि, हर्षल विनाकारण धावपळ वाढविणार आहेत. काळजी घ्यावी. नव्या समस्या आल्या तरी काळजी करू नका. मार्ग निघत जाईल. कला- गुणांचा विकास होईल. विचाराने रहावे. शुभ ता. १, ४

### मीन:- प्रकृतीकडे दुर्लक्ष नको

धनेश, भाग्येश मंगळ षष्ठात केतूवर येत आहे. हितशत्रूंची काळजी नको. बुरी नजरवाले तेरा मुँह काला असे म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. आर्थिक स्थिती समाधानकारक राहिल. आजपर्यंत जशी चिकाटीने प्रगती केली, तशीच चिकाटी यापुढे ही ठेवा. प्रगती होत जाईल. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. शुभ ता. १, ४

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# अष्टविनायक लेण्याद्री



श्री गणेश हे सर्वांचे आराध्य दैवत. श्री गणेश-पूजन करून कुठलेही कार्य आरंभ करण्याची आपली परंपरा आहे. महाराष्ट्रात श्री गणेशाची आठ स्थाने प्रसिद्ध आहे. या अष्टविनायक यात्रेची प्रत्येक मराठी माणसाला ओढ असते. अष्टविनायक यात्रा पुण्यातून सुरू केल्यास सोयीचे अंतर, उपलब्ध सुविधा यामुळे दोन ते तीन दिवसात व्यवस्थित पूर्ण होते. मोरगावच्या श्री मयूरेश्वर गणेशापासून या यात्रेची सुरुवात होते. अष्टविनायक यात्रेतील प्रत्येक स्थान वैशिष्ट्यपूर्ण असून प्रत्येक स्थानाची एक स्वतंत्र आख्यायिका आहे. मोरगावचा श्री गणेश हा अष्टविनायक यात्रेतील पहिला गणपती. मोरगावला श्री गणेशाने मोरावर स्वार होऊन सिंधुरासुर राक्षसाचा वध केला म्हणून मोरगावचा मयूरेश्वर हे नाव प्रचलित झाले. डोक्यावर नागाचा फणा असलेल्या या स्वयंभू गणेशमूर्तीची सोंड डावीकडे असून मूर्तीच्या आजूबाजूला रिद्धि-सिद्धी विराजमान आहेत. जमिनीपासून उंचावर एका दगडी चौथऱ्यावर हे मंदिर बांधले आहे. मुख्य मंदिर गर्भगृह, दर्शन मंडप व सभामंडप अशी तीन भागात मंदिराची विभागणी झाली आहे. मंदिराला भक्कम तटबंदी असून चारही दिशांना दारे आ-हेत. अष्टविनायकांपैकी ही उजव्या सोंडेची एकम व मूर्ती आहे. अशी आख्यायिका आहे की, श्री विष्णू, मधू व कैटभ राक्षसासह कित्येक वर्षे युद्ध करीत होते; मात्र यश मिळत नव्हते. भीमा नदीच्या काठावरील सिद्धटेक पर्वतावर कठोर तप करून व श्री गणेशाकडून वरदान मिळाल्यावर या दोन्ही राक्षसांचा वध शक्य झाला.

सिद्धटेकचे मंदिरात मूर्तीच्या डाव्या व उजव्या बाजूला जय-विजय यांच्या मूर्ती आहेत. महाद्वारावर नगारखाना असून या मंदिरास साधारण एक किलोमीटरचा प्रदक्षिणा मार्ग आहे. पालीचा श्री बल्लाळेश्वर हा ब्राह्मण वेश परिधान केलेल्या दुर्मिळ रूपात आहे. कल्याणशेठ नावाच्या गृहस्थांनी, बल्लाळ नावाच्या मुलाला सतत गणेशपूजनात व्यस्त असतो म्हणून जंगलात झाडाला बांधले आणि वाचविण्यास तुझ्या गणपतीला बोलाव, असे सांगितले. मुलाने श्री गणेशाची आळवणी केली तेव्हा ब्राह्मण रूपात प्रकट होऊन गणेशाने बल्लाळाला मुक्त केले. त्याने देवांना इथेच राहावे, अशी विनंती केली तेव्हा श्री गणेशांनी एका दगडात निवास केला. तीच श्री बल्लाळेश्वराची मूर्ती मंदिरात विराजमान आहे. यानंतर महडच्या वरदविनायकाचे दर्शन घेतात. हे देऊळ लहान असून देवळाच्या मागे एक तळे आहे. देवळाच्या चारही बाजूंना हत्तीच्या आकृती कोरल्या असून मंदिर परिसर शांत व रम्य आहे. थेऊरचा चिंतामणी; भक्तांच्या सर्व चिंता, संकट दूर करतो. कपिल मुनींना त्यांचे चिंतामणी रत्न श्री गणेशाने परत मिळवून दिले, म्हणून त्यांनी कदंब वृक्षाखाली श्री गणेशाची पूजा केली व त्यांना चिंतामणी असे नाव दिले. मंदिराचे द्वार उत्तराभिमुख असून मूर्तीचे मुख पूर्वेला आहे.

मुळा, मुठा व भीमा या तीन नद्यांच्या संगमावर हे मंदिर वसलेले आहे. लेण्याद्रीचा गिरिजात्मज हा सहावा गणपती. अष्टविनायक यात्रेतील डोंगरावरील हे एकमेव मंदिर आहे. ओझरचा श्री विघ्नेश्वर भक्तांच्या मार्गातील सर्व विघ्ने दूर करतो. श्री गणेशाने विघ्नासुर राक्षसाचा पराभव केला. शरण आलेल्या राक्षसाने दयेची याचना केली. जेथे गणपती पूजन होईल तेथे विघ्नासुराने जायचे नाही, अशी अट घालून गणपतीने विघ्नासुराला अभय दिले. म्हणून श्री गणेशाची येथे विघ्नेश्वर रूपात पूजा केली जाते. मूर्ती पूर्वाभिमुख असून डाव्या सोंडेची आहे. देवळाच्या भिंतीवर सुंदर चित्र व शिल्प असून मंदिराचा कळस सोनेरी आहे. रांजणगावचा महागणपती हा अष्टविनायक यात्रेतील आठवा गणपती. श्री गणेशाचे सर्वात शक्तिशाली रूप आहे. श्री शिवशंकर व त्रिपुरासुर युद्धात निर्णायक क्षण येतच नव्हते, तेव्हा श्री शंकरांनी गणेशाला आवाहन करून षडाक्षर मंत्राचा पाठ केला. श्री गणेश प्रकट झाले आणि त्यांनी युद्धात मार्गदर्शन केले. त्रिपुरासुराचा नाश झाला. मंदिर पूर्वाभिमुख असून दक्षिणायन काळात सूर्याची किरणे मूर्तीवर पडतात.

लेण्याद्रीच्या गणेशलेणी ''मायासा भुवनेश्वरी शिवस्ति देहश्रीता सुंदरी, विघ्नेशम सुत्माप्तूकम संहिता कुर्वेतापो दुष्करम, ताख्य भूतप्रकट प्रसन्न वरदो तिष्ठतया स्थापितम, वंदेह गिरिजात्मज परमज तम लेखनांद्रिशितम.'' अष्टविनायक यात्रेत लेण्याद्रीचे दर्शन घडते, परंतु शिवनेरी किल्ल्यावर जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीलाही लेण्याद्रीच्या गिरिजात्मजाचे दर्शन घेण्याची ओढ असते. पुण्यापासून साधारण १०० किलोमीटर अंतरावर व जुन्नरवरून अवघ्या सात किलोमीटरवर लेण्याद्रीचा गणपती आहे. मंदिरात जाण्यासाठी साधारण तीनशे ते सव्वातीनशे दगडी पायऱ्या चढून जावे लागते. येथे ज्यांना चढणे शक्य नाही त्यांच्यासाठी डोलीची व्यवस्था आहे. जुन्नरच्या उत्तरेला असलेल्या या डोंगररांगात काही लेणी आहेत, त्यांना 'गणेश लेणी' असे म्हणतात. मंदिरात श्री गणेशाची स्वयंभू मूर्ती आहे. मंदिर दक्षिणाभिमुख असून गणेशमूर्ती उत्तराभिमुख आहे. मूर्तीच्या आजूबाजूला श्री महादेव व श्री हनुमान यांच्या मूर्ती आहेत. येथील गणपतीची मूर्ती कोरीव असल्याने प्रदक्षिणा घालणे शक्य नाही. मुख्य मंदिरासमोर मोठा सभामंडप असून आजूबाजूला लहान लहान खोल्या आहेत. या सभामंडपाला एकाही खांबाचा आधार नाही. मात्र मंदिराच्या समोरील बाजूस रेखीव खांब आढळतात. या लेण्यांच्या समूहात काही शिलालेख, चैत्यगृहे, पाण्याची कुंडे आहेत. गिरिजा हे पार्वतीचे नाव असून गिरिजाचा आत्मज म्हणजे पुत्र यावरून 'गिरिजात्मज' असे नाव प्रचलित झाले. गणेश पुराण कथेनुसार देवी पार्वतीने श्री गणेश पुत्ररूपात प्राप्त व्हावा यासाठी या पर्वतावर १२ वर्षे कठोर तप केले. भाद्रपद चतुर्थीला पार्वतीने स्नान केल्यावर अंगाच्या मळापासून एक मूर्ती तयार केली. गजाननाच्या त्या पार्थिव मूर्तीची पूजा केली असता, पार्वतीसमोर सहा हात व तीन डोळे असलेला एक बालक प्रकट झाला. श्री गणेश गिरिजात्मज रूपात लेण्याद्री येथे बराच काळ राहिले. या काळात त्यांनी अनेक दानवांचा संहार केला. लेण्याद्रीच्या पायऱ्या चढून वर गेल्यावर सर्वात पहिले चैत्यगृह आहे. चैत्यगृहात दुतर्फा खांबांच्या रांगा असून सर्व लेण्यांसमोर मोकळी जागा आहे. येथील खांबांच्या तळाशी व वरच्या भागाला जलकुंभाची प्रतिकृती आहे. खांब अष्टकोनी असून वरच्या बाजूला असलेल्या जलकुंभावर सिंह, वाघ, हत्ती अशा शिल्पाकृती कोरलेल्या आहेत. चैत्यगृहाच्या मधोमध एकसंध घुमट आतल्या बाजूने कोरला असून छताला अर्धगोलाकार कमानी आहेत. या लेणीसमूहातील एकही खांब, कमानी नसलेल्या प्रशस्त सभामंडपात प्रवेश केला की, गिरिजात्मजाचे दर्शन होते. या गुहेत सूर्य उगवल्यापासून ते सूर्य मावळेपर्यंत व्यवस्थित उजेड राहील, अशी प्रकाशयोजना केलेली आहे. गाभाऱ्यातील छोट्या छोट्या खोल्या लक्ष वेधून घेतात. यात अनेक ऋषिमुनींनी तप केले असावे. लेण्याद्रीच्या डोंगरावर स्थित गिरिजात्मज गणेशाच्या आजूबाजूला अनेक लेणी आहेत. हा लेणीसमूह एकाच मोठ्या आकाराच्या शिळेत कोरलेला आहे. डोंगरावर पाण्याची कुंडे असून वर्षभर डोंगरावर पाणी पुरावे, असे नियोजन केले आहे. तीनशे-साडेतीनशे पायऱ्या चढून वर गेल्यावर आलेला थकवा या थंडगार पाण्याच्या स्पर्शाने नाहीसा होतो. येथील काही लेण्यांमध्ये बौद्धस्तूप कोरलेले आहेत. लेणीत आतल्या बाजूने वर्तुळाकार कोरीव काम केले असून यामुळे लेणीत आपल्या आवाजाचा प्रतिध्वनी ऐकू येतो. आकर्षक कोरीव काम असलेले खांब हे कुठल्याही लेणीसमूहातील आकर्षणाचा विषय असतो. सह्याद्रीच्या उंच सरळसोट कड्यांवर, अत्यंत दुर्गम जागी, ज्यांनी ही शिल्पे खोदली त्यांच्या साहसाचा प्रत्यय येथे गेल्यावर येतो. आपल्या पूर्वजांची दुर्दम्य इच्छाशक्ती, परमेश्वरावरील विश्वास, धर्मावरील श्रद्धा, साहसी वृत्ती आणि अद्वितीय शिल्पकला यांचा परिचय करून घेण्यासाठी ही सह्यशिल्पे आवर्जून पाहायलाच हवी.

पान ४ वरून

## दहशत

कथ्या-तपकिरी रंगात एकदम चमकदार दिसत होता. अंगावरचे खवले उठून दिसत होते. तेवढ्यात त्याची नजर वर गेली. कीमा माकड दिसताच त्याने एक फुत्कार काढला. घाबरून कीमाने दुसऱ्या झाडावर उडी मारली. ते पाहून त्याला समाधान वाटलं. काही वेळ तो तसाच फणा काढून त्याच स्थितीत होता. एवढ्यात त्याला पावलांचा आवाज ऐकू आला. तसा तो चपळाईने दुसऱ्या ओंडक्याखाली घुसला आणि लपून हळूच बघू लागला... तो माळी होता. कुऱ्हाड हातात घेऊन ओंडक्यापाशी पडलेली सात फुटी कात हातात घेऊन पाहात होता. याला घाबरवलं पाहिजे, नाहीतर कुऱ्हाड घेऊन आपल्यावरच यायचा. त्याने फणा काढून जोराने फुत्कार सोडला. माळी दचकला. साप- साप ओरडत पळत सुटला. त्याला गंमत वाटली आणि आनंदही झाला. बिजली म्हणते तशी भीती मी दाखवू शकतो. आता मात्र आपण बिजलीला आवडेल असेच वागायचे. पण ती कुठे गेली. कुठे शोधू मी तिला? तो विचारात पडला... एवढ्यात माळी त्याच्या साथीदारांना घेऊन आला. हाताने ओंडक्याकडे इशारा केला. तसे चार-पाच गड्यांनी ओंडक्याखाली काठ्या घुसवल्या आणि त्याला बाहेर खेचलं.! एक फुत्कार सोडून नागाने माळ्याच्या पायाकडे झेप घेतली. माळ्याच्या अंगठ्याला तो कडकडून चावला आणि सवयीप्रमाणे उलटा झाला. पण हाय रे! बाकीच्या लोकांनी एकदम चुन्याची निवळी त्याच्या पोटावर आतल्या भागावर फेकली आणि काठ्या-दांड्यांनी त्याच्यावर तुटून पडले. चुन्याच्या निवळीने तो भयंकर भाजला. अर्धमेला झाला आणि वर काठ्यांचे प्रहार. त्याच्या लक्षात आलं की, आपण आता वाचत नाही. बिजलीचं आपण आधीच ऐकायला हवे होते. आणि त्याने प्राण सोडला... नागाची हालचाल पूर्ण थांबल्याची खात्री पटल्यावर लोकांनी माळ्याकडे पाहिले; तो काळानिळा झाला होता आणि तोंडातून फेस काढत शेवटचे आचके देत होता. त्याच्या हातात नुकतीच टाकलेली कात होती.

पान ५ वरून

## भक्तिसुखाचे ठायी, दुःखाची वार्ताच नाही

'भक्तिलीलामृत' या ग्रंथात बेदरच्या संत माणिकप्रभूंची कथा त्यांनी वर्णिली आहे. हिंदू आणि यवन यांच्यातील समन्वयाचा विचार अत्यंत साक्षेपाने मांडलेला आहे.

**हिंदू आणि मुसलमान। निर्माण करिता नारायण। त्या नारायणांचे वाचून। काही नसे जगामध्ये।। त्यासी कोणी ब्रह्म म्हणिति। कोणी अल्ला नाम देती। जरी नामे पृथक निश्चिती । परी विभूती एकचि असे।।** आपापला धर्म योग्य पद्धतीने पाळावा आणि समाजात विषमता येऊ नये हीच त्यांची इच्छा होती. सगळेच धर्म सारखे असले, तरी आपल्या धर्माला त्यागून दुसरा धर्म स्वीकारणे सोपे नसते आणि ते करू नये, असाही एक विचार त्यांनी मांडलेला आहे.



संतांनी आणि संतचरित्राच्या आख्यानकारांनी भक्तिमार्गाचा प्रसार आणि प्रचार करताना एका वास्तवाचे भान अवश्य ठेवलेले दिसते. ते म्हणजे आपण ज्यांच्याशी संवाद साधित आहोत तो समाज अठरापगड जातींचा, सर्वसामान्य प्रापंचिक आणि मुळात पापभीरू आहे. प्रपंचाचा त्याग करून आणि अंगाला राख फासून डोंगरदऱ्यात आणि जंगलझाडीत जाण्याचा उपदेश या समाजाला करणे योग्य नाही, हे या मनीषींनी जाणले होते. प्रपंचात राहूनच ईश्वरभक्ती कशी करता येईल आणि आपला प्रपंच सुखाने कसा करता येईल, यावरच त्यांनी भर दिला. परंतु असे करताना धर्माच्या मर्यादा ओलांडू नये, असेही दासगणू महाराजांनी सांगितलेले आहे.

**अवघ्या धर्मतत्त्वाठायी। फरक येतुलाही नाही। ते अवघेचि एकमयी। अवघेंच आवडती ईश्वरा ।। परी सर्व धर्मांचा अंगीकार। साविधी करावया साचार।। अशक्य आहे फार। ते केव्हाही घडणे नव्हे।।** त्यासाठी दासगणू महाराजांनी सर्व धर्मांचा समन्वय साधणारा एक विचार दिला. तो अन्यत्र कुठेही आढळत नाही. हे त्यांचे सूत्र विचार करायला भाग पडते. ते म्हणतात...

**तात्त्विक विचारे हिंदू असावे । तेजसपणे यवन व्हावे। दयेपुरते बसावे। जैन-बौद्ध होऊनिया ।।** समन्वयाचे तत्त्व त्यांनी आपल्या प्रत्येक विचारातून मांडलेले आहे. मुळात ते कीर्तनकार होते. प्रत्यक्ष श्रीसाईबाबांचा त्यांना आशीर्वाद होता, असे त्यांच्या चरित्रात नमूद आहे. वर त्याचा उल्लेखही केला आहे. त्यांचे दैवत पांडुरंग होते. तरी त्यांच्या कीर्तनशैलीत सर्व पंथांचा समन्वय दिसून येतो.

संतांच्या चरित्रातील लहान-लहान घटनांचे विश्लेषण अत्यंत मार्मिक पद्धतीने करीत ते कीर्तन रंगवीत असत. संत दासगणू महाराजांचे चरित्र आणि कर्तृत्व तसेच साहित्य इतके वैविध्याने भरलेले आहे की, त्यावर कितीही लिहिले तरी कमीच आहे. त्यांच्या साहित्याचे मूळ अधिष्ठान ही परमेश्वरभक्तीच आहे.

वयाच्या २५-३० वर्षांपर्यंत बेबंद जीवन जगणारा, पोटासाठी पोलिस खात्यात ११ वर्षे नोकरी करणारा आणि नंतरचे आयुष्य केवळ भक्तिमार्गाने समाजप्रबोधनासाठी वेचणारा हा भगवद्भक्त म्हणजे मराठीतील संत, पंत आणि तंत या तीनही परंपरांमध्ये बसणारा कदाचित एकमेव कवी आहे.

समाजजीवन आणि राष्ट्रजीवन यांचे एकही अंग असे नाही की, ज्यावर महाराजांनी भाष्य केलेले नाही.

**भक्त आणि भगवंती। भेद नुरे तिळरती। आणि ऐश्याच होण्याप्रती। भक्ती ऐसे म्हणावे।। भक्तिसुखाचे ठायी । दुःखाची वार्ताच नाही। ज्ञान म्हणून जे का काही। तेच स्वरूप भक्तीचे।।** असे सांगणाऱ्या आधुनिक महिपती दासगणू महाराजांचे साहित्य आणि कर्तृत्व म्हणजे अवघ्या जगताचे ईश्वरी संचित आहे.

सुखी आणि समाधानी जीवन जगण्याचा मंत्र असणारे त्यांचे साहित्य नव्या पिढीने अवश्य वाचायला हवे.

पान २ वरून

## राष्ट्र देवो भव!




आता हा सिंदूर विघ्नविनाशक गणपती आणि संकटमोचक हनुमंताचाही आहे तसंच सगळ्या भारतीय विवाहित महिलांचा स्वाभिमान आणि सौभाग्यसूचक शृंगारही आहे. गणपती आणि मारुतीच्या मूर्तींना लावायचा शेंदूर हा शिशाच्या ऑक्साईडपासून बनतो. हा पदार्थ नैसर्गिकरीत्या पृथ्वीवर आढळतो. लेड ऑक्साईड दळून बारीक केलेले चूर्ण म्हणजेच शेंदूर. भारताबाहेर याला व्हर्मिलियन म्हणतात, पण मूर्तिलेपनासाठी त्याचा विनियोग मात्र केवळ भारतातच करण्यात येतो.

शेंदूर लावलेला गावदेवीचा तांदळा (अवयवरहित, म्हणजे हात-पाय नसलेली, केवळ मुखवटा किंवा पाषाण स्वरूपात असलेली देवीची मूर्ती), गणपती आणि मारुतीच्या मूर्तींचा आढळ भारतात सर्वत्र आहे. या तीनही देवता अनुक्रमे बुद्धी, बल आणि शक्तीच्या कारक असून तीनही संग्राम देवता आहेत. त्यामुळे मंगळ ग्रहावर त्यांचं अधिपत्य आहे. मंगळ ग्रह हा रक्तपात आणि युद्धाशी संबंधित ग्रह आहे. म्हणून या सर्वांच्या पूजनाकरिता शेंदूर हे अत्यावश्यक पूजाद्रव्य आहे. तसंच शेंदूर हा काही अंशी विषारी असा पदार्थ आहे.

पूर्वीच्या काळी गायकाच्या स्वरयंत्राला इजा पोहोचविण्यासाठी तिला/त्याला अन्नातून शेंदूर खाऊ घालण्याची कटकारस्थानं प्रतिस्पर्धी गायकाच्या कंपूतील लोक करत. त्यामुळे घशातून आवाज येणंच बंद होतं आणि गायकाचं गाणं थांबतं. (संदर्भ : कै. पुरुषोत्तम दारव्हेकर मास्तर लिखित 'कट्यार काळजात घुसली.' पंडितजी गाऊ शकत नाहीत म्हणून खाँसाहेब त्यावर्षीची स्पर्धा जिंकतात.) भारतानं राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नं पाकिस्तानची बोलती बंद केलीच; शिवाय इतर देशांसह आपल्या देशातील विरोधकांचीही स्वरयंत्रं निकामी केली.

केवळ भारतीय सधवा स्त्रियाच आपल्या सौभाग्याचं अलंकरण म्हणून आपल्या मस्तकावर आणि सीमंतात म्हणजे केसांच्या भांगात लाल कुंकू भरून मिरवतात. हिंदी भाषिक शेंदूराला आणि भांगात भरण्याच्या कुंकवाला 'सिंदूर' हा एकच शब्द वापरतात. याच सिंदूरला राष्ट्रीय अस्मितेचं प्रतीक मानण्यात आलं आणि ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून सर्व जगाला एक कडकडीत इशारा देण्यात आला. हे एक हिंदू राष्ट्र आहे आणि आमच्याशी वाकड्यात शिराल तर उद्ध्वस्त करण्याची क्षमता आणि सामर्थ्य आमच्यात आहे.

भारताच्या राष्ट्रीयत्वाचा हा हुंकार सगळ्या जगात गुंजला आणि दीर्घकाळपर्यंत त्याचे प्रतिध्वनी कानी येत राहतील, याची विशेष काळजी घेण्यात आली. 'राष्ट्र देवो भव' हा अस्सल भारतीय संस्कार आपल्याला राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठेच्या पलीकडे घेऊन जात राष्ट्राला देव मानून त्याची भक्ती करणारा तू हो, हे मनावर बिंबवणारा आहे. या आपल्या भारतीय संस्काराचं कसोशीनं पालन करणं, हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

# आशा - जीवनाच्या अर्थशून्यतेवरील उतारा !

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



सकारात्मकतेचे तत्वज्ञान २६९

तणाव, निरुत्साह, उदासीनता, दडपण या साऱ्यांवर एकच अक्सीर इलाज- आशा! अर्थहीनता हे सगळ्यात मोठे आव्हान होत चालले आहे आजच्या जीवनात! आणि अर्थ हवा असेल तर त्याआधी आशा हवी. विक्टर फ्रँकी म्हणतो, आशा नसेल तर कशालाच मतलब उरत नाही. माणसं प्रवाहपतित होतात, दिशाहीन होतात तेव्हा त्यांना किनाऱ्यावर आणणारी पहिली काठी असते. आशा तिची सर्वप्रथम निगा राखायची असते. जखमांच्या खोलवर जाऊन होणारे उपचार, शल्यकर्म सगळं नंतर, आधी मनात आशा पेरावी लागते. हेही दिवस जातील, तुला काही होणार नाही, तू लवकर बरा होशील, पूर्ववत होशील. आशा म्हणजे निश्चित काही होणार याचा सांगावा नसतो, पण कृती केल्यावर काहीतरी मनासारखे होणार असते आणि आपल्याला ते बुडू देत नाही. फक्त तीन पायऱ्या चढायच्या असतात. उद्दिष्ट आखणे, शक्यतांवर विसंबून राहणे आणि पावलापुरता प्रकाश शोधणे! **जगाचं ओझं असह्य झालंय-** थांबा, तुम्ही एकटे नाहीत. शीण, थकवा, दमणूक, वेगाशी जुळवून घेता न येणे ही आता बहुतेकांची तक्रार झालीय. अशी मोडतोड पृष्ठभागावरही दिसायला लागलीय. चिडचिड, अबोले, घुसमट, शांतपणे तुटत चाललेले नाते! जगण्याचे मैदान अस्थिर आणि तुलनेत कमी प्रगती जाणवल्यावर आशादायी चित्र बघणेही भोळसटपणाचे वाटू लागते. विज्ञान सिद्ध करू पाहतंय आशा म्हणजे अंधश्रद्धा नाही, आशा म्हणजे वेदना नाकारणे नाही, किंवा चेहेऱ्यावर सगळं ठीक आहे चे ढोंगी भाव आणणे नव्हे.

**आशा म्हणजे-** मनोधारणा, आशा म्हणजे रणनीती/ व्यूहरचना, आशा म्हणजे कौशल्य!

जमील झांकी, होप फॉर सिनिक्स या पुस्तकाचा लेखक म्हणतो. काय होणार आहे, हे माहित नसतानादेखील आपण मात्र धडाधड असे पर्याय निवडत असतो ज्यांचा भविष्यात प्रभाव पडणार असतो. आशादायी असणे म्हणजे दिवास्वप्न पाहणे असे नसते. प्रत्यक्षात ती मेंदूमधील एक आकलनात्मक प्रक्रिया असते कारण त्यात उद्दिष्ट्ये, कार्यकारण भाव आणि मार्ग दाखविणारे विचार समाविष्ट असतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची, त्यातून उद्भवणाऱ्या नकारात्मकतेला हाताळण्याची आशा एक चावी असते.दृष्टिकोन सकारात्मक ठेवला तर स्वतःच्या क्षमतांवरचा विश्वास दृढ होत जातो आणि जीवनातील आव्हानांना तोंड देण्याची सिद्धता बळावते. आशा हा जरी व्यक्तिगत अनुभव असला आणि त्याला कितीही असत्य म्हणून टाळायचे प्रयत्न केले तरी मानवावर होणारा आशादायी प्रवृत्तीचा परिणाम सर्वदूर स्वीकारला गेला आहे, किमान तो दुर्लक्षिण्याजोगा नाही यांवर वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैद्यकीय चिकित्सक सगळ्यांचे एकमत आढळते. भलेही त्याला चमत्कार असे संबोधिले जाऊ शकते. बरेचदा असे चमत्कार आशादायी स्वभावाचा परिणाम असतात. आशा हा गुण माणसांमधील निर्धाराला शक्ती देतो, अंधकारमय वाटेवर साथ देतो आणि अशक्यप्राय परिस्थितीमधून सुरळीतपणे बाहेर पडण्याचा मार्ग दाखवितो.

स्वतःच्या ध्येयांशी प्रामाणिक आणि समर्पित राहाणे, ती साध्य करण्यासाठी प्रेरणा देणे हे आशादायी स्वभावाचे मुख्य वैशिष्ट्ये असते. युद्ध सुरु ठेवायची जिद्द मिळते आशा या सद्‍गुणातून आणि त्यातून सद्यस्थिती सुधारेल यावरच विश्वास वाढतो, भलेही मानवी अस्तित्व अनाकलनीय असो. मानसशास्त्रज्ञ आणि नामवंत संशोधक (सध्या आशा या विषयावरचे त्याचे संशोधन जगभर गाजतेय) चार्ल्स सिन्देरने २००२ साली अतिशय मनोवेधक विधान केले आहे. इंद्रधनू एखाद्या लोलकासारख्या विविध रंगांच्या छटा अनेक मार्गांनी पाठवित असते. जणू संदेश देत असते. काय काय शक्य आहे! आपल्यातील चैतन्य त्यामुळे उसळी मारून पुन्हा प्रस्थापित होते. आशा हे मनाचे व्यक्तिगत इंद्रधनू आहे.

### आशा या भावनेचा अर्थ

चार्ल्स सिन्देरचे १९९१ सालचे सुरुवातीचे संशोधन मानते. आशा सकारात्मक दिशेचे पहिले पाऊल असते कारण ध्येय सुनिश्चित झालेले असते, त्याच्या पूर्तीचे नियोजन झालेले असते. या जीवनहेतूंपासून काय मिळेल याचीही मानसिक तयारी असते. अस्तित्वाच्या प्रांतात आजारपण, उपशामक काळजी यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी ध्येय साध्य करण्याच्या क्षमतेवर अधिक काम शक्य आहे, हँसी सुनके फ़सल पकती हैं हे मानणे अधिक महत्वाचे असते. म्हणून चार्ल्स सिन्देरने आशेचे सिद्धांत मांडले. त्यानुसार आशावादी असणे म्हणजे आयुष्य टिकविणारी मानवी ताकत असते आणि तिचे तीन घटक असतात-

१) **ध्येय विचार** - सुस्पष्ट वचनबद्धता

२) **मार्ग विचार**- विशिष्ट व्यूहरचना करून त्या ध्येयप्राप्तीचा विचार करणे

३) **तर्क विचार**- या रणनीतीचा वापर करण्यासाठी आवश्यक प्रेरणा आणि क्षमता यांचा वापर

प्रतिकूलतेमुळे आशा लोप पावत नाही, उलट गरिबी, युद्ध किंवा दुष्काळ अशांना समर्थपणे तोंड देते. आयुष्यातील आव्हानांपासून कोणाचीही सुटका नसते हे जितके सत्य, तितकेच त्यांच्याबद्दल दृष्टिकोन सकारात्मक ठेवणे, स्वतःला समजावणे- हैं रातभरका ये मेहमाँ अँधेरा, किससे रोके रुका हैं सवेरा

### चार उदाहरणे-

**१) वास्तववादी आशा-**

विल्स, कॉट आणि गिब्सन या प्रकाराची व्याख्या असे करतात- वाजवी अथवा संभाव्य निष्पत्ती संभवते ती वास्तववादी आशा! अशा अर्थाने की तीव्र वेदनेने तळमळणाऱ्या रुग्णाला माहित असते, आपला आजार कायमचा जाणार नाही. तशी संभावना अतर्क्य, पण औषधोपचारांनी काही आराम पडला तरी पुरे. आपल्या परिस्तिथीचे आकलन होण्यासाठी तिच्या लक्षणांचे निरीक्षण आणि समजून घेणे एवढे पुरेसे असते. तिथून आशेचा प्रांत सुरु होतो. कदाचित सकारात्मक सुधारणा होईल म्हणून दृष्टिकोन खुला ठेवावा.

**२) आदर्शवत आशा-**

सामूहिक प्रयत्नांनी परिस्थिती सुधारते, सगळ्यांचे भवितव्य उज्वल होते असा दृष्टिकोन. वेबने २०१३ साली सिद्ध केले की आदर्शवत आशा वर्तमानाला नाकारते आणि अधिक चांगल्या पर्यायांच्या शोधात यशस्वी होते. राजकीय उदाहरण म्हणजे सरकारने समाजाचे भले करावे.त्यासाठी शक्यतांचे क्षितिज विस्तारता येते.

**३) निवडक आशा-**

बरेचदा केवळ वर्तमानच अवघड असत नाही तर भविष्य काळही अनिश्चित असतो. शारीरिक वेदनांबरोबर अचानक गंभीर आजाराचे निदान झाले तर मानसिक विकार आणि उद्वेगाची लक्षणे संभवतात. शल्य, भय आणि जिवलगांच्या काळजीने माणसाला निराशावादी अनुभव येतात.

अशावेळी चिंताजनक वा कठीण परिस्थिती सुधारण्यासाठी तुम्ही काही करू शकत नाही ही भावना माणसाला पंगू बनविते. गरार्ड यांनी अशा वेळी मर्यादित आशेचा आणि परिणामांचा विचार आपल्या नकारात्मक भावनांचे नियमन करू शकतो असे विधान केलेले आहे.

**४) अमूर्त, अनुभवातीत आशा-**

इव्हस, निचतेर आणि रिटेनबघ यांचे दृष्टीने अतींद्रिय आशा तीन घटकांची मिळून बनते-

**(अ) रुग्णाची आशा-** सरतेशेवटी सगळं सुरळीत होईल.

**(ब) सामाईक आशा-** एखादा विशिष्ट परिणाम अभिप्रेत नाही, पण वाईट झालेच तर त्याची तीव्रता आणि कालावधी कमी असेल. जीवावर आलं, पण शेपटावर निभावलं.

**(क) वैश्विक आशा-** भविष्यावर विश्वास पण त्याचवेळी हतबलता, अगतिकता यांना वाव न देणे. प्रयत्न न सोडणे. आव्हानांना सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवणे. अस्तित्ववादी आशा असंही वर्णन केलं जातं.

### अर्थशून्यता

जेव्हने आणि वेस्त्रा यांनी एका टप्प्यानंतर आयुष्य अर्थहीन कां भासते यावर १९९८ साली एक शोधनिबंध प्रकाशित केला.

### त्यातील महत्वाचे मुद्दे-

(१) घसरण आणि त्यातून उत्पन्न होणारी परिस्थिती काहीवेळा हातातून ताबा सुटत चाललाय असं वाटणं

(२) **जखमांचे प्रभाव** - अपयश किंवा काहीतरी गमावल्यावर होणाऱ्या मुक्या वेदनांचे परिणाम

(३) **बूमरँग परिणाम-** बदलासाठी सगळे प्रयत्न केले पण पहिले पाढे पंचावन्न

(४) **परकेपणाच्या जाणिवा** - आपल्याला कोणीच समजून घेत नाही, कोणाशीही जुळवून घेता येत नाही याचे दुःख

### आशादायी विचारांचे लाभ-

(१) शिक्षण, क्रीडा क्षेत्रात चांगली कामगिरी, उत्तम शारीरिक स्वास्थ्य, आत्मविश्वासात आणि आत्मनिर्भरतेमध्ये वाढ, सुधारलेले मानवी संबंध

(२) आशावादी दृष्टिकोन उत्तम आरोग्याशी निगडित असतो. आशा जतन करणारी माणसे यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते.

(३) भयाऐवजी ताणतणावांकडे आव्हान या भूमिकेतून बघण्याची सवय. आपोआप तीव्रता कमी होते, तणावाचा प्रसार कमी होतो.

(४) तीव्र वैफल्याचा सामना करताना आशावाद ही संरक्षक ढाल बनते. वैफल्य अनियंत्रित, अकल्पित न राहता त्याला हाताळता येते.

(५) आशेच्या माध्यमातून दीर्घकालीन जीवनहेतूंची आखणी करता येते, पूर्वानुभवांवर आधारित पावले उचलता येतात. अशा व्यक्तींचे आपल्या वाटचालीवर नियंत्रण असते. पर्याय शोधण्याच्या सवयीमुळे यशाची शाश्वती वाढते.

(६) आशा आणि जीवन साफल्य हे आंतरिक जुळणीचे उदाहरण आहे.

(७) आशा आणि भविष्य ही जोडगोळी कायम प्रेरणादायी असते आणि मर्यादांचा बाऊ न करता माणसाची बांधिलकी आणि सामिलकी यांना प्रोत्साहित करते.

### आशेचा नकाशा-

आपण भविष्याचा कसा विचार करतो यावरून आपले यश ठरते. आपल्याला काय हवंय आणि त्यासाठी आपण कितपत सज्ज आहोत हे कळालं की आपले प्रयत्न आणि झोकून देण्याची प्रवृत्ती झेपावते. प्रबळ इच्छाशक्ती त्यासाठी इंधन ठरते. मानवी स्वायत्तता त्याला दिशा देते.

### हा नकाशा खालील टप्प्यांमध्ये तयार होतो-

(अ) ध्येय निश्चिती

(ब) कृती आराखडा

(क) अडथळ्यांची निश्चिती

(ड) अडथळ्यांवर मात

(इ) प्रेरणा टिकवून ठेवणे

(ई) मनन

पंख असणारी एकमेव गोष्ट म्हणजे आशा असं एमिली डिकिन्सन म्हणतो. आपल्या कवितेत आशेचे वर्णन करताना तो पुढे म्हणतो-

पंख असलेली आशा हृदयात अधिष्ठित असते
शब्दांवाचून स्वरमालिका गात असते-
अथक, निरंतर!
झंझावातात, वादळवाऱ्यात सुरेलपणा टिकवून ठेवते
वादळ त्यावेळी नक्कीच हळवे झालेले असते.
तो छोटा पक्षी मग शरमिंदा होतो
मी आशेचे गाणे थंड प्रदेशातही निरंतर ऐकलेलं आहे
आणि अपरिचित सागर किनाऱ्यावरही
पण त्या गीताने कधीही माझा हिस्सा नाही मागितला!
पण त्या गीताने कधीही माझा हिस्सा नाही मागितला!!

# जीव विसावला । विटेखाली ॥ (भाग-६२)

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

आयुष्यभर इतकी पायपीट झालीय या जीवाची की, आणखी पायपीट करण्याचं बळच अंगी शिल्लक राहिलं नाही. आणि रहिल तरी कसं? कारण जोवर संसारी सुखालाच शाश्वत सुख-समाधान मानत गेलो त्यामुळे जीवाच्या आकांताने त्याच्या मागे वेड्यासारखा धावत राहिलो. कधी कधी ते गवसल्याचा आभासही झाला पण तोही क्षणभरच आभासच तो! आणि त्यासाठी पुन्हा पुन्हा धावत राहिलो, पण हाती काहीच लागलं नाही.

तेव्हा थकून भागून एका विशाल वृक्ष नजरेस पडला. म्हटलं इथे थोडा विसावा घेऊ याच्या छाये खाली आणि पुढचं पुढे बघु. म्हणून त्या विशाल वृक्षाच्या छायेखाली विसावलो, गाढ निद्राधीन झालो. ते स्वप्न होते की दृष्टांत ते देवच जाणे पण कुणी तरी मला समजावत होतं की, वत्सा, अरे मुळात हा संसाराच दुःखाने भरलेला आहे. हा संसारच तर दुःखाचं मुळ कारण आहे. तो जो सुख-समाधान दाखवतो ना? तेच मृगजळ आहे हे निटसं जाणून घे. या मृगजळाने कधीतरी कुणाची तहान भगलीय का? किंवा भागते का? याचा तूच सारासार विचार कर.

अरे वेड्या अशा मृगजळामागे लागुन का फुकाचा बेजार होतोस? आणि हे अनमोल जीवन उगाच वाया का घालवतोस? अरे वेड्या शाश्वत सुख-समाधन तुझ्या हातात असतांना उगाच वण वण का भटकतोस? उठ जागा हो आणि ज्या कारणासाठी तुझा जन्म झाला आहे ते कारण जाणून घे, स्वरूपाला ओळख आणि त्याच्यासाठी दोन पावलं पुढे टाक, मग मी आहेच तुला सांभाळायला. त्या गाढ निद्रेतून (की स्वप्नातून) खाडकन् जागा झालो आणि काय झालं कुणास ठाऊक पण जन्मोजन्मीच्या थकव्याची मरगळ दूर झाली आणि नवचैतन्य अंगात शिरलं, ताजातवाना झालो. यापूर्वी एवढा कधीच ताजातवाना झालो नव्हतो. एवढी कसली उर्जा मिळाली की, क्षणात मरगळलेल्या मनाला चैतन्याची पालवी फुटली आणि जीवनाचं मर्म आणि वर्म दोन्ही मनाला कळालं. तरी ह्या द्वाड मनाला प्रशन पडलाच की हे असं अचानक कसं घडलं?

एव्हाना सावल्या मावळतीकडे किंचितशा झुकल्या होत्या. वृक्षाची सळ सळ टाळ-मृदुंगाचा नाद घेऊन अवतरली. वर पाहिलं तर तो पिंपळ वृक्ष निघावा. त्याच्या असंख्य पानातून **राम कृष्ण हरि** हा एकच अनाहत नाद सळ सळत होता. तीच सळ सळ चैतन्याच्या रूपात शरीरभर सळसळत राहिली. मनाला स्वप्नांचे (दृष्टांताचे) एकेक पदर उलगडत गेले. नुक्तीच तिथून दिंडी गेली होती. तिच्या पायधुळीचा अभिर गुलाल आसमंतात उधळला होता. आणि हा पिंपळ काही साधासुधा नव्हता तर प्रत्यक्ष माऊलींचा सोन्याचा पिंपळ होता. होय माऊलींचा सोन्यचा पिंपळ आहे तर हा? लोचनातून इंद्रायणी चंद्रभागा वाहु लागल्या. मन गहिवरलं. पिंपळाला गच्च मिठी मारली. आणि काकळतेने विनंती केली की...

**अनंत योनिंचा । करूनी प्रवास ॥**
**थकल्या जीवास । पोटी घे बा ॥३॥**

माऊली, म्या पामरावर काय कृपा केली हो ही? अहो कसे पांग फेडू मी. मी तर असा अडाणी, अज्ञानी मुढ बालक आहे. मला यातलं काहीच कळत नाही तरी कळतं केलंत तुम्ही मला? काय म्हणावं याला? पण माऊली मला यातलं काहीच नको फक्त **हरि मुखे म्हणा हरि मुखे** याची जाण तेवढी माझ्या मनाला रहु द्या आणि पुण्याची गणना करण्या इतकी प्रगल्भ बुद्धी कृपा करून होऊ देऊ नका. कारण बुद्धी जर पुण्याची गणना करू लागली तर अहंकार होण्याची भिती वाटते. या अहंकारापायी तर कितीतरी युगे या 'पुनरपि जननम्. पुनरपि मरणम्'च्या' चक्रात हा जीव अडकून पडला होता.

माऊली, पुन्हा त्या चक्रात मला अडकवू नका. आणि अडकलोच तर एकच करा की, जन्मोजन्मी तुमच्या चरणाचं दास्यत्व मला लाभु द्या. अन्य कसलंही मागणं नाही माझं. मुक्ती नाही मिळाली तरी चालेल पण तुमच्या चरणांवेगळा मला करू नका. माझे अनंत कोटी अपराध जरी असले तरी ते पदरात घ्या. कारण युगानुयुगे अनंत योनींचा प्रवास करून हा जीव खूप थकला आहे हो.

आता आणखी प्रवास करण्याचं बळच अंगात शिल्लक राहिलं नाही. तेव्हा एकच कळकळीची विनंती आहे की, या पामराला पोटी घे बा. आणि तुमच्या चरणाचा सदैव दासच करून ठेवा. मऊलीच्या कुशी शिवाय आणि चरणांशिवाय अधिक आनंदी आणि अधिक सुरक्षीत जागा वैकुंठातही शोधून सापडणार नाही माऊली. म्हणून या पामरावर एवढी कृपा कराच...

**संत सहवास । लाभला भाग्याने ॥**
**पूर्व संचिताने । धन्य झालो ॥४॥**

माऊली, माझ्या अनंत जन्माचं पुण्य आज फळाला आलं असावं म्हणूनच या द्वाड मनाला तुमचा लळा लागला आहे. गाभाऱ्यात तुमच्या संजीवन समाधीवर नतमस्तक झालो तेव्हा कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं.

तुम्ही डोक्यवरती हात ठेवलात आणि वाटलं की, माझी भामा मायच मला प्रेमाने कुरवाळत आहे. तुमच्या चरणावर समर्पित भावानं अभंगाच्या वह्या ठेवल्या आणि माऊली आतून गदगदून आलं हो. टपकन् दोन टपोरे जल बिंदू त्या वह्यांवर पडले. हा आत्म्याने परमात्म्याला केलेला इंद्रायणी-चंद्रभागेचा जलाभिषेक तर नसेल? नेमकं काय म्हणावं याला माऊली? पण एक मात्र नक्की झालं की, तुमची कृपा झाली अन् मला संतांचा सहवास लाभु लागलाय. प्रत्येक संतचरणी नतमस्तक होत असतांनाच आनंद द्विगुणित होत आहे. परमानंद कसा असतो ते मला माहित नाही पण तो जर असेलच तर तो नाश्चितच असाच असेल याची मला खात्री पटली आहे.

माझे अनंत जन्माचे पूर्व संचित पुण्य असेल म्हणूनच हा संत सहवास लाभला हेच माझं परम भाग्य आहे. आणि गाठीशी थोडं पूर्व संचित चांगलं असल्यानेच हे भाग्य आज माझ्या भाळी आले आहे. यातच मी धन्य धन्य झालो, पावन झालो. आता एकच आस आहे की...

**होता बुध्दि शुद्ध । जन्म फळा आला ॥**
**जीव विसावला । विटेखाली ॥५॥**

माणसाचं मन भ्रष्ट झालं तर एखादे वेळी चालेल पण त्याची बुद्धी भ्रष्ट होता कामा नये. कारण मन भ्रष्ट झालं, नको तिकडे भटकु लागलं तर त्याला आवर घालण्यासाठी बुद्धी सज्ज असते पत बुद्धीच जर भ्रष्ट झाली तर तिला को आवरणार? बुद्धी भ्रष्ट झाली की समजावं आपला सर्वनाश निश्चितच आहे.

माऊलींच्या कृपेने संत सज्जनांचा सहवास या पामराला लाभला. मन सदासर्वकाळ हरिनामात मग्न राहून पंढरीची वारी करू लागलं. त्यामुळे मनावरची सारी जळमटं दूर झाली. आता त्याला ओढ लागली ती अलंकापुरीची आणि पंढरीची. मुळचीच शुद्ध असणारी पण संसारी तापाने काळवंडलेली बुद्धी संत सहवाहासात उजळून निघाली. आता बुध्दीला ज्ञानाचे डोहाळे लागु लागले. तिचीही धाव आता ज्ञानपिठाकडे म्हणजेच संजीवन समाधी कडे होऊ लागली. अनंत जन्मीच्या अज्ञानरूपी तिमिराकडून ज्ञानरूपी तेजाकडे जाण्यासाठी बुद्धी आतूर झाली. आणि मन आणि बुद्धीने एकदाच अलंकापुरी गाठली. माऊलींच्या संजीवन समाधीवरती नतमस्तक झाले, आणि क्षुधा-तृष्णाच हरली. हळूहळू विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशलेचा अर्थ उलगडू लागला. **ज्ञानियांचा राजा गुरू महाराव** असे तुकोबा का म्हणाले? जनाबाईने **ज्ञानाचा सागर सखा माझा ज्ञानेश्वर** असे म्हणतानाच पुढे त्या म्हणतात की, **मरोनिया जावे बा माझ्या पोटा यावे** असे का म्हणतात? सर्व संतांना माऊलींचा एवढा का लळा आहे? या साऱ्या प्रश्नांची उकल होत गेली. आवंढा गिळतांना कंठ दाटून आला. डोळ्यातून पुन्हा इंद्रायणी-चंद्रभागा वाहु लागल्या. म्या पामराची वैखरी वाणी मौन झाली. पूर्वजांच्या आशिर्वादाने आणि पुण्याईने हा सुवर्णयोग आला होता.



मनोभावे त्यांना हात जोडले. अर्जुनला भगवंतांनी विराट दर्शन द्यावं तसं माउलींनीच हे सारं काही विराट दर्शन या पामराला दिलं. याची कशी उतराई करावी असा विचार मनात येताच माऊलींनी उठवलं आणि सरळ बोटाला धरून दिंडीत सोडलं. तुकोबांच्या चरणावर मस्तक ठेवलं. तसे महाराजांनी मुलाला बापानं उठवावा तसं उठवलं. हती टाळ दिला. कानात काहीतरी पुटपुटले. माझं तन, मन, बुद्धी सारं सारं अद्वैत झालं. समोर फक्त विठु माऊली दिसु लागली. हातातला टाळ खणखणला आणि मुखावाटे **ग्यानबा तुकाराम** चे बोल आसमंतात आणि अंतरात निनादु लागले. पाय आपोआप पाऊली खेळत वैष्णवांच्या मेळ्यासोबत पंढरीच्या दिशेने चालू लागले.

संत सहवासाने आणि त्यांच्या संस्काराने आता मन आणि बुद्धी दोन्हीही शुद्ध झाले. खरंतर बुद्धी शुद्ध होणं हे किती भाग्याची गोष्ट आहे. हे म्या पामराला शब्दात सांगता येणं कठीण आहे. नव्हे नव्हे ते माझ्यासाठी तरी शब्दतीतच आहे. हां पण एवढं मात्र खरंय की, बुध्दी शुद्ध होताच हा जन्म फळाला आला. माऊलींच्या चरणाच्या ह्या दासाला विठु दर्शनची ओढ लागली. पंढरीच्या वेशीत पाऊल ठेवताच अंगावर अध्यात्मिक समाधानाचे रोमांच उभे राहिले.

माझी नजर नामदेव पायरीचा शोध घेऊ लागली. नामदेव पायरी दिसताच ऊर भरून आला. माझी जनाई इथेच विसावलीय. अख्खा देहच नामदेव पायरीवर झोकून दिला. अंतरी दाटलेला सारा उमाळा बाहेर आला. अभंगात चिंब झालेले नामा, एका, तुका सारे संत प्रकटले मी त्यांच्या चरणाची धुळ मस्तकाला लावली. त्या चरण धुळीला कस्तुरीचा गंध होता. सरळ गाभारा गाठला परब्रह्म परमात्मात्म्याचं मुखदर्शन घेतलं आणि **रूप पाहता लोचनी, सुंदर ते ध्यान, सावळे सुंदर रूप मनोहर...** या साऱ्यात हरवून गेलो. चरणांवरती मस्तक ठेवलं चरणला मिठी मारली. आता माझा मी राहिलोच नव्हतो. हा जीव त्या विटेखाली केव्हा विसावला हे मलाही कळालं नाही. ही माझ्या ज्ञानोबा-तुकोबांची कृपा होती. सर्व आर्त भक्तांवरती अशीच कृपा असु द्यावी हीच माऊलींच्या आणि तुकोबांच्या चरणी विनम्र होऊन प्रार्थना करतो.

**!! राम कृष्ण हरि !!**

(लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना लेखकाची स्वतःचीच आहे.)

# भारतविरोधी 'मजबूर' नेत्यांचा थयथयाट!

'ऑपरेशन सिंदूर'ने भारत हा लष्करीदृष्ट्या किती मजबूत देश आहे, तेच सिद्ध केले आहे. भारताचे सामर्थ्य पाहून जगाची छातीच दडपली. यामुळेच भारतातील देशविरोधी नेत्यांची अंगाची लाही लाही झाली आहे. नरेंद्र मोदी नामक राष्ट्रनायकाच्या पासंगालाही आपण पुरत नाही, हे लक्षात आल्यामुळे भारतविरोधी मजबूर नेत्यांनी थयथयाट सुरू केला आहे.

राजकारण

**राहुल बोरगावकर**



भारतात घडविलेल्या असंख्य लहानमोठ्या दहशतवादी हल्ल्यांनंतरही पाकिस्तानविरोधात बोटही उचलण्याची हिंमत न दाखविलेला काँग्रेस पक्षच पहलगाम हत्याकांडानंतर पाकिस्तानवर हल्ला करण्यास उतावळा होत होता, ही गोष्ट अनेक राजकीय निरीक्षकांना चकित करणारी वाटली. पण, त्यामागे असलेली कुटिल आणि देशद्रोही विचारसरणी लक्षात आल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या चिथावण्यांकडे साफ दुर्लक्ष केले आणि आपली पूर्ण तयारी झाल्यावरच 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानवर चढविलेल्या हल्ल्याने, सारे जग स्तिमित झाले.

देशातील या देशद्रोही विरोधी पक्षांचीही काही दिवस वाचाच बसली होती. पाकिस्तानने नेहमीप्रमाणेच या कारवाईतून कसलाही बोध न घेता भारतावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी उलट हल्ला चढविल्यावर मात्र, भारताने आपल्यातील सुप्त शक्ती जागृत केली. भारताच्या या विराटरूप दर्शनाने सारे जगच एक प्रकारे भयभीत झाले. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'वर कसलीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. मात्र, काही दिवसांनंतर त्यांनी या संघर्षात भारताची किती लढाऊ विमाने पडली, भारताचे किती सामरिक नुकसान झाले, यासारखे प्रश्न उपस्थित मात्र केले.

इतकेच नव्हे, तर भारताने पाकिस्तानच्या याचनेनंतर 'ऑपरेशन सिंदूर' तात्पुरते स्थगित केल्यावरही त्यांनी आणि त्यांच्या 'इंडी' आघाडीतील काही नेत्यांनी, पाकिस्तानवर आणखी हल्ले करण्याची मागणी केली. यापूर्वी बालाकोट आणि उरी हल्ल्यांनंतर राहुल गांधी आणि या नेत्यांनी या कारवाईवर समाधान व्यक्त करणे दूरच, त्याचे पुरावे मागितले होते. त्यामुळे यावेळी त्यांच्या या प्रश्नांमुळे कोणाला आश्चर्य वाटले नव्हते पण, त्यामागील हेतू आता हळूहळू उघड होत आहे. नरेंद्र मोदी यांनी २०४७ सालापर्यंत भारताला एक 'विकसित राष्ट्र' बनविण्याचे ध्येय जनतेपुढे ठेवले आहे. ते त्यांच्या परीने हे ध्येय साध्य करण्यासाठी जिवापाड मेहनत करताना दिसत आहेत. या ध्येयाचे विविध पैलू असून, त्यात संरक्षण सामग्रीच्या क्षेत्रात भारताला स्वयंपूर्ण करण्याचेही लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. भारताच्या संरक्षण क्षेत्राची वाटचाल त्या दिशेने किती वेगात आणि दमदारपणे सुरू आहे, याची छोटी झलक या 'ऑपरेशन सिंदूर'ने भारतीयांना घडविली.

देशप्रेमी जनतेने या रूपाचे स्वागत केले असले, तरी भारतातच राहणार्‍या देशविरोधी शक्तींच्या मनात मात्र त्यामुळे प्रचंड धडकी भरली आहे. कारण, भारत मजबूत नव्हे, तर मजबूर राहावा, यातच या शक्तींचे हितसंबंध गुंतले आहेत.

भारताने ताज्या संघर्षात 'ब्रह्मोस'पासून 'आकाश'पर्यंत विविध अस्त्रांचा वापर करून, पाकिस्तानच्या हवाईदलाच्या चिंध्या केल्या. 'राफेल'सारख्या जबरदस्त शक्तिशाली लढाऊ विमानांचा वापर न करताही, केवळ 'सुखोई' आणि 'मिराज-मिग' यांसारख्या तुलनेने जुन्या पिढीतील विमानांद्वारेच पाकिस्तानची हवाई लढाऊ शक्ती नष्ट केली. हे सर्व करताना, भारतीय हवाईदलाने आणि सेनेने सरहद्द किंवा नियंत्रण रेषा ओलांडण्याचीही तसदी घेतली नाही. भारताच्या या प्रचंड लष्करी ताकदीने आणि तिचा वापर करण्याच्या राजकीय इच्छाशक्तीच विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या मनातील धडकीचे खरी कारण आहे. म्हणूनच 'ऑपरेशन सिंदूर' ही लुटूपुटूची लढाई होती, यासारखे वक्तव्य काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केले. तर 'ऑपरेशन सिंदूर'मुळे काहीच घडले नाही, हा निव्वळ देखावा होता; अशी टीका कर्नाटकातील काँग्रेस नेत्याने केली.

समाजवादी पक्षाच्या एका नेत्याने सेनादलाच्या महिला प्रवक्त्यांची जात काढून आपली जातकुळी किती क्षुद्र आहे, तेच दाखवून दिले. एकंदरीतच दिवाळीच्या दिवशी घरात सुतकी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न, विरोधी नेत्यांकडून केला जात होता. ज्या काँग्रेसने मुंबईवर २६/११ सारखा भीषण हल्ला होऊनही पाकिस्तानला कागदी समज देण्याचा शेळपटपणा दाखविला, त्या काँग्रेसच्या दृष्टीने 'ऑपरेशन सिंदूर' हे विश्वरूप दर्शनच होते. पाकिस्तानकडे अण्वस्त्रे नाहीत हे गुपित उघड झाल्याच्या दुःखाने, काँग्रेसमध्ये सुतक पाळले गेले. आपल्याच देशाची ही प्रगती विरोधी नेत्यांना का पाहावत नाही? असा प्रश्न कोणालाही पडेल. पण, त्याचे उत्तर सोपे आहे.

गेल्या केवळ ११ वर्षांत मोदी यांनी भारताचे स्थान जगात ज्या प्रमाणात उंचावले आहे, ती गोष्ट विरोधकांना म्हणजे काँग्रेसला सहन होत नाही. कारण देशावर सर्वाधिक काळ राज्य करूनही काँग्रेसला मोदी यांच्या निम्म्यानेही भारताचा सन्मान वाढवता आला नाही. कथित आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ असलेल्या मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीतच भारताची अर्थव्यवस्था 'फ्रजाईल ५' या गटात गेली. उलट 'चायवाल्या' मोदी यांनी, भारताच्या अर्थव्यवस्थेला जगात चौथ्या क्रमांकावर नेण्याचा विक्रम केला आहे. काँग्रेसच्या कारकिर्दीत देशाचा फार मोठा भूभाग माओवादी- नक्षलवादी दहशतवाद्यांच्या कब्जात गेला होता. अमित शाह यांनी हा संपूर्ण भूभाग पुन्हा मुक्त करून, तेथे विकासाची गंगा वाहती केली. यासारख्या अनेक गोष्टी आहेत, ज्यामुळे काँग्रेसचे खरे स्वरूप उघड होत आहे. यात सांस्कृतिक व धार्मिक दमनशाहीचा उल्लेखही केलेला नाही. 'ऑपरेशन सिंदूर' हे 'विकसित भारत' या अधिक व्यापक आणि सर्वोच्च ध्येयाचा एक भाग झाले आहे. 'विकसित भारत' हा अन्य क्षेत्रांप्रमाणे संरक्षण सामग्रीच्या क्षेत्रात अन्य देशांवर अवलंबून राहणार तर नाहीच पण, दुसर्‍या देशांना भारतीय बनावटीची शस्त्रे-अस्त्रे निर्यात करणारा बलवान देश असेल, हे मोदी यांचे स्वप्न आहे. आज अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने बनविलेली अत्याधुनिक लढाऊ विमानेही, भारताच्या 'मिग'सारख्या तुलनेने जुनाट लढाऊ विमानांनी पाडली आहेत. यामागे लढाऊ वैमानिकाचे कौशल्य तर आहेच; पण त्याहीपेक्षा त्याच्या मनातील जाज्वल्य देशप्रेम आहे. तालिबानसारख्या मागास आणि रानटी विचारसरणी असलेल्या संघटनेनेही, अमेरिका नावाच्या महासत्तेला दमवून अफगाणिस्तानातून अक्षरशः पळून जाण्यास भाग पाडले होते. त्यांच्या तुलनेत भारत हा तर 'विकसित देश'च म्हणावा लागेल.

नरेंद्र मोदी यांनी प्रथम पंतप्रधानपदाची शपथ घेतली त्या दिवसाच्या ११व्या वर्धापनदिनापूर्वी या नेत्याने, भारतीयांची निवड चुकलेली नसल्याचा संदेश 'मन की बात' या भाषणातून दिला आहे.



# रणभूमीतील राजकारण

रशिया-युक्रेन युद्धाला जवळपास एक हजार दिवस उलटून गेले आहेत. आजही दोन्ही बाजू संघर्षरत असल्याचे चित्र आहे. अर्थात हे चित्र बदलण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर काही प्रयत्न झाले. मात्र, त्यातील प्राङ्गणिक हेतूंवर शंका कायमराहिली. याच संघर्षमय स्थितीमध्ये दि. २५ म रोजी रशियाने युक्रेनवर सर्वांत मोठा हवाई हल्ला केला. तब्बल ३६७ ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करत केलेल्या या आक्रङ्कणात युक्रेनचे मोठे नुकसान झाले. यानंतर अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांनी रशियावर तीव्र शब्दांत टीका करण्याची परंपरा कायम ठेवली. अमेरिकेने एक पाऊल पुढे टाकत 'पुतीन यांचे डोके ठिकाणावर आहे काय?' असा प्रश्नही उपस्थित केला, जो रास्त असाच.

एकीकडे रशियाला शांततेचे डोस पाजणार्‍या तथाकथित न्यायवाद्यांनी दि. २० ते दि. २२ मे रोजीच्या दरम्यान घडलेल्या गंभीर घटनेकडे कानाडोळा केला. ती घटना म्हणजे, युक्रेनकडून रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्या हेलिकॉप्टरवर करण्यात आलेला ड्रोन हल्ला. रशियाच्या आरोपावर अमेरिका आणि त्यांच्या सहयोगी गटांकडून सोयीस्कर मौन बाळगले गेले. पाश्चिमात्य राष्ट्रांची हीच निवडक भूमिका त्यांच्या स्वार्थी चेहर्‍याची ओळख ठरावी. या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय संबंधांतील नीतिमत्तेचा आधारच काढून टाकला आहे.

युक्रेनच्या बाजूने उभे राहणार्‍या देशांचे नेमके साध्य काय? हा प्रश्न आता उघड विचारण्याची वेळ आली आहे. युक्रेनचा संघर्ष आता त्याच्या हातात उरलेला नाही; तो पाश्चिमात्य हितसंबंधांच्या बिनशर्त पाठिंब्याचा आणि त्याच पाठिंब्याच्या बदल्यात मिळणार्‍या लाभाचा खेळ झाला आहे.

ट्रम्प यांच्या 'मध्यस्थी'च्या घोषणांना आता कुणीही जगात गांभीर्याने घेताना दिसत नाही. तरीही क्षणोक्षणिक हातातून निसटत चालेली अमेरिकेला जगाच्या मध्यवर्ती ठेवण्याची खेळी, त्यांना पुन्हा पुन्हा खेळण्याचा मोह होतोच. त्यांच्या सध्याच्या राजकीय भूमिकेतून अमेरिका युद्धाला केवळ एक व्यवसायसंधी मानते, हेच उघड गुपित अधोरेखित होते. कोणतीही मानवतावादी भूमिका, सहवेदना अथवा दीर्घकालीन शांततेची तळमळ ही मूल्ये ट्रम्प यांच्या धोरणांमध्ये नाहीत. रशिया आणि युक्रेन युद्धामध्ये अमेरिका आणि पाश्चात्य राष्ट्रांनी केवळ व्यावसायिक संधी शोधल्या आहेत. या युद्धामध्ये जवळपास १२ हजारजण आजवर नाहक मृत्युमुखी पडले आहेत, तर त्याहून अधिकजण जखमी झाले आहेत. मात्र, पाश्चात्य देशात बहुदा युद्धाच्या ठिकाणी मृत्युमुखी पडणार्‍या सामान्य माणसांची किंमत आकड्यांमध्ये मोजली जाते, संवेदनांमध्ये नव्हे.

युक्रेनसाठी ही भूमिका अधिकच धोकादायक आहे. तो देश एकीकडे युद्धाच्या रणभूमीवर झगडतो आहे, तर दुसरीकडे त्याचे निर्णय पाश्चिमात्य देशांच्या संकेतावर अवलंबून आहेत. रशियाशी प्रत्यक्ष संघर्षरत असताना त्याच्या पाठिशी असलेली ही 'मैत्री' प्रत्यक्षात सत्तांतराच्या खेळीपेक्षा अधिक काहीच नाही. रशियाची भूमिकाही सर्वस्वी निर्दोष म्हणता येणार नाही. परंतु, आंतरराष्ट्रीय संवादात जबाबदारीचे मोजमाप केवळ एकाच बाजूने केले जाते, तेव्हा त्यातून न्याय व शांततेचा मार्ग मिळत नाही. पाश्चिमात्य देश जेव्हा रशियाच्या प्रत्येक कृतीवर कठोर टीका करताना युक्रेनच्या आक्रमक कारवायांवर सोयीस्कर मौन बाळगतात, तेव्हा ते स्वतःच्या नैतिक अधिष्ठानावरच प्रश्नचिन्ह निर्माण करतात. या संपूर्ण संघर्षात सर्वांत मोठी हानी झाली आहे ती सामान्य युक्रेन आणि रशियाच्या नागरिकांची. गेल्या हजार दिवसांत अनेकांच्या भविष्याला कायमस्वरूपी अस्थिरतेचा शाप बसला आहे. हे सारे थांबवण्यासाठी आज आवश्यक आहे तो म्हणजे निष्पक्ष आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन. आक्रमक देश कोणत्याही गटात असो, त्याच्या विरोधात उभे राहण्याचे नैतिक धाडस आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये हवे, दुर्दैवाने त्याचीही वानवा इथे आहे. परराष्ट्र धोरण हे केवळ सीमांच्या रक्षणाचे माध्यम नसते. ते एका देशाच्या नैतिक अधिष्ठानाचे, त्याच्या मूल्यनिष्ठ भूमिकेचे प्रतिबिंब असते. जेव्हा हेच धोरण निवडक स्वार्थी पाठिंब्यावर आधारित असते, तेव्हा त्याचा शेवट नेहमीच अस्थिरतेत होतो. युक्रेनचे आजचे हाल हे केवळ युद्धामुळे नाहीत, तर त्याचा युद्धाकडे पाहणाचा दृष्टिकोन आणि परावलंबी परराष्ट्र धोरणहीकारणीभूत आहे आणि तेच युक्रेनच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सर्वांत मोठे अपयश ठरणार आहे.

# डोंगरी भागातील फळझाडे संकटात



वाढत्या तापमानामुळे जगासाठी नवनवीन समस्या निर्माण होत असताना डोंगराळ राज्येदेखील सुरक्षित नाहीत. हवामान बदलाचा हा प्रतिकूल परिणाम उत्तराखंडमधील फळ उत्पादनांवरही स्पष्टपणे दिसून येतो. गेल्या काही वर्षांमध्ये या भागात सफरचंद, नाशपाती, पीच, मनुका, लिंबू यासारख्या फळांचे उत्पादन कमी झाले आहे. वाढत्या तापमानाचा मुकाबला करण्याची ताकद कमी होत असल्याने पहाडी राज्यांमध्ये वृक्षजीवन संकटात आहे.

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

उत्तराखंडच्या अर्थव्यवस्थेत फलोत्पादनाची मोठी भूमिका आहे. यासोबतच उत्तराखंडमधील बागायतदार देशाच्या फळ उत्पादनात सक्रिय योगदान देत आहेत; परंतु हवामानातील बदलांचा परिणाम त्यांच्यावरही स्पष्टपणे दिसून येतो. एकेकाळी नाशपाती, पीच, मनुका आणि जर्दाळूचे प्रमुख उत्पादक असलेले उत्तराखंड देशात उच्च दर्जाचे सफरचंद उत्पादन करण्यासाठीदेखील ओळखले जाते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये या डोंगराळ राज्यात या फळांचे उत्पादन चिंताजनक पद्धतीने कमी झाले आहे.

२०२० पासून पाहिले तर उत्तराखंडमधील या प्रमुख फळांच्या बागायती क्षेत्रावर आणि उत्पादनावर लक्षणीय परिणाम झाला आहे. विशेषतः आंबा इत्यादी उष्णकटिबंधीय फळांच्या तुलनेत समशीतोष्ण फळांच्या उत्पादनात ही घट दिसून येते. 'क्लायमेट सेंट्रल' या आंतरराष्ट्रीय संस्थेने या संदर्भात एक नवीन अभ्यास केला आहे. तो उत्तराखंडमधील बदलत्या हवामान पद्धतींचा बागायतीवर होणार्‍या परिणामांवर प्रकाश टाकतो. या अभ्यासानुसार, तापमानवाढीमुळे अनेक प्रकारच्या फळांच्या उत्पादनामध्ये घट होत आहे. यामुळे बागायतदार बदलत्या हवामान परिस्थितीला तोंड देण्यास अधिक सक्षम असणार्‍या उष्णकटिबंधीय फळांकडे वळत आहेत. 'क्लायमेट सेंट्रल'च्या अहवालानुसार, उत्तराखंडमध्ये बागायती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होण्याबरोबरच मुख्य फळांच्या उत्पादनातही घट दिसून येत आहे.

हिमालयीन प्रदेशातील उंचावरील भागात पीच, जर्दाळू, मनुका आणि अक्रोड यांसारख्या फळांच्या उत्पादनात सर्वात मोठी घट दिसून आली आहे. त्याचप्रमाणे सफरचंद आणि लिंबूच्या उत्पादनातही पूर्वीच्या तुलनेत घट झाली आहे. पीच, जर्दाळू, मनुका आणि अक्रोड यांसारख्या फळांमध्ये सर्वात मोठी घसरण दिसून आली.

आकडेवारी तपासली असता लक्षात येते की, २०१६-१७ मध्ये उत्तराखंडमध्ये २५,२०१.५८ हेक्टर क्षेत्रात सफरचंदाचे उत्पादन झाले होते. २०२२-२३ मध्ये ते ५५ टक्क्यांनी घटून ११,३२७.३३ हेक्टरवर आले. त्याचप्रमाणे या काळात सफरचंद उत्पादनात ३० टक्क्यांनी घट झाली. लिंबाच्या विविध जातींच्या उत्पादनामध्येही ५८ टक्क्यांची मोठी घट झाली आहे. विशेष म्हणजे उष्णकटिबंधीय प्रदेशात आढळणार्‍या फळांवर हवामानातील बदलांचा कमी परिणाम झाला आहे. फलोत्पादन क्षेत्रात अनुक्रमे ४९ आणि ४२ टक्क्यांनी घट झाली असूनही आंबा आणि लिचीचे उत्पादन कमी- अधिक प्रमाणात स्थिर राहिले. तथापि, या दोन्ही फळांच्या उत्पादनात अनुक्रमे २० आणि २४ टक्क्यांनी घट झाली.

दुसरीकडे २०१६-१७ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये पेरू उत्पादन क्षेत्रात ३६.६ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली. २०१६-१७ मध्ये हे क्षेत्र ३,४३२.६७ हेक्टर इतके होते. २०२२-२३ मध्ये ते ४,६०९.३२ हेक्टर झाले. पेरूप्रमाणेच क्रॅनबेरीच्या उत्पादनातही या काळात सुमारे ६४ टक्क्यांची लक्षणीय वाढ झाली. पेरूसाठी ही वाढ सुमारे ९५ टक्के होती. आकडेवारीनुसार उत्तराखंडमध्ये बागायती क्षेत्रात एकूण ५४ टक्के घट झाली आहे. २०१६-१७ ते २०२२-२३ दरम्यान सर्व प्रकारच्या फळांच्या उत्पादनात ४४ टक्क्यांनी घट झाली. २०१६-१७ मध्ये फळ उत्पादनाचे एकूण क्षेत्र सुमारे १ लाख ७७,३२४ हेक्टर होते, ते २०२२२३ मध्ये ८१,६९२.५८ हेक्टरवर घसरले. त्याचप्रमाणे २०१६-१७ मध्ये उत्तराखंडमध्ये फळांचे एकूण उत्पादन ६,६२,८४७.११ होते. २०२२-२३ मध्ये ते ३,६९,४४७.३ टन इतके कमी झाले. 'क्लायमेट सेंट्रल'च्या मते, २०१६-१७ आणि २०२२-२३ दरम्यान उत्तराखंडमध्ये फळांच्या उत्पादनात झालेली तीव्र घट विविध फळे वाढविण्याच्या पद्धतींमध्ये मोठ्या बदलांकडेदेखील निर्देश करते.

गेल्या आठ वर्षांमध्ये निवडक फळांच्या उत्पादनात झालेली लक्षणीय घट शेती धोरणे, जमीनवाटप, बाजारपेठेतील परिस्थिती आणि कदाचित काही फळांवर पर्यावरणीय परिणामांमधील बदल दर्शवते. त्याच वेळी पेरू आणि क्रॅनबेरीच्या उत्पादनात वाढ दिसून येते. आता बागायतदार स्थानिक मागणी आणि परिस्थितीनुसार अधिक योग्य असलेल्या या प्रकारच्या फळांच्या लागवडीत विशेष रस घेत आहेत. आपण जिल्हानिहाय पाहिले तर बागायती क्षेत्रात सर्वात मोठी घट टिहरीमध्ये दिसून आली. यानंतर डेहराडून येते. तथापि, दोन्ही जिल्ह्यांमध्ये फळांच्या उत्पादनात कोणतीही लक्षणीय घट दिसून आली नाही. दुसरीकडे अल्मोडा, पिथोरागड आणि हरिद्वारमध्ये बागायती क्षेत्र आणि फळ उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. उदाहरणार्थ अल्मोडामध्ये फळांचे उत्पादन ८४ टक्क्यांनी कमी झाले आहे. चमोलीमध्ये २०१६-१७ ते २०२२-२३ दरम्यान बागायती क्षेत्रात फक्त १३ टक्के घट नोंदविण्यात आली; परंतु दुसरीकडे फळ उत्पादनात सुमारे ५३ टक्के घट झाली आहे.

उत्तर काशी आणि रुद्रप्रयागमधील बागायती क्षेत्रात अनुक्रमे ४३ आणि २८ टक्क्यांनी घट झाली असली, तरी फळांच्या उत्पादनात २६.५ आणि ११.७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तापमानातील बदल फळांच्या वाढीवर आणि एकूण उत्पादनावर परिणाम करतात. उष्णता, पाण्याची कमतरता आणि पावसाच्या पद्धतींमध्ये बदल यामुळे वाढत्या तापमानामुळे फळांच्या उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. यासोबतच तापमानातील बदलांमुळे फळांमध्ये कीटक आणि रोग पसरतात. यामुळे कीटकनाशकांच्या फवारणीचा खर्च वाढतो तसेच निर्यातीवर बंधने येतात. उष्ण आणि कोरड्या हिवाळ्यामुळे उत्पादनावर परिणाम होत आहे. १९७० ते २०२२ दरम्यान उत्तराखंडचे सरासरी तापमान १.५ अंश सेल्सिअसने वाढले आहे. याचा अर्थ असा की, या काळात राज्यातील तापमानात दरवर्षी ०.०२ टक्के वाढ झाली आहे. त्याच वेळी जास्त उंची असलेल्या भागात ही वाढ अधिक स्पष्ट होती. संशोधनातून असेही दिसून आले आहे की, तुलनेने उष्ण हिवाळ्यामुळे उंचावरील भागात बर्फ जलद वितळत आहे. त्यामुळे बर्फाच्छादित क्षेत्रे कमी होत आहेत. गेल्या दोन दशकांमध्ये उत्तराखंडच्या उंचावरील भागात हिवाळ्यात तापमान ०.१२ अंश सेल्सिअसने वाढले आहे. दुसरीकडे दर दशकात ११.३ मिलीमीटर दराने पाऊस कमी झाला आहे. यामुळे बर्फाने झाकलेले क्षेत्र सरासरी ५८.३ चौरस किलोमीटरने कमी झाले आहे. उत्तरकाशी, चमोली, पिथोरागढ, रुद्रप्रयाग या जिल्ह्यांमधील बर्फाच्छादित क्षेत्र २००० च्या तुलनेत २०२० मध्ये ९०-१०० चौरस किलोमीटरने कमी झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, हिमालयाच्या उंच प्रदेशात सफरचंद, नाशपाती, पीच, मनुका, अक्रोड, जर्दाळू यासारख्या फळांच्या वाढीसाठी जास्त थंडी आणि बर्फवृष्टी खूप महत्त्वाची असते. त्याच वेळी पाऊस आणि बर्फाचा अभाव पर्वतीय फळांसाठी आवश्यक असलेली थंडी कमी करत आहे. त्यामुळे फळांच्या जीवनचक्रावर परिणाम होत आहे. 'क्लायमेट सेंट्रल'च्या मते, कमी तापमानामुळे त्यांच्या पेशींना नुकसान होऊ नये म्हणून समशीतोष्ण झाडे हिवाळ्यात निष्क्रिय अवस्थेत जातात. त्याच वेळी अतिथंडीनेही फळांचे नुकसानच होते. सफरचंदासारख्या पारंपरिक समशीतोष्ण पिकांना डिसेंबर ते मार्च दरम्यान १,२०० ते १,६०० तासांसाठी सात अंश सेल्सिअसपेक्षा कमी थंड हवेची आवश्यकता असते.

गेल्या ५ ते १० वर्षांमध्ये झालेल्या हिमवर्षावाचा विचार करता सफरचंद पिकांना दोन ते तीन पट जास्त हिमवर्षाव आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये कमी हिमवर्षाव झाल्यामुळे सफरचंदांची गुणवत्ता आणि उत्पादन कमी झाले आहे. गेल्या दोन दशकांमध्ये थंड ठिकाणी पिकवल्या जाणार्‍या फळांचे उत्पादन जवळजवळ निम्म्याने कमी झाले आहे. बर्‍याच काळापासून उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस, पूर, गारपीट आणि भूस्खलनासारख्या आपत्तींचाही परिणाम झाला आहे. यामुळे शेतीचे आणि उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, २०२३ मध्ये खराब हवामानामुळे ४४,८८२ हेक्टर शेतीचे नुकसान झाले होते. शेती आणि फलोत्पादनाच्या कठीण परिस्थितीमुळे उत्तराखंडसारख्या डोंगरी भागातून लोकांचे स्थलांतर वाढले आहे. दुसरीकडे उष्णकटिबंधीय फळांना वाढत्या तापमानाचा फायदा होत असल्यामुळे शेतकरी त्याकडे वळत आहेत. उत्तराखंडमधील काही जिल्ह्यांमध्ये शेतकरी कमी तापमानात वाढणार्‍या सफरचंदाच्या जाती निवडत आहेत. त्याचप्रमाणे नाशपाती, पीच, मनुका, जर्दाळूऐवजी शेतकरी किवी आणि डाळिंबासारख्या उष्णकटिबंधीय फळांची लागवड करत आहेत. कमी उंचीच्या प्रदेशात आम्रपाली आंब्याच्या जास्त घनतेच्या पिकांवरही प्रयोग करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकर्‍यांना जास्त फायदा झाला आहे. अल्प कालावधीत तापमानात बदल होण्याची प्रवृत्ती चिंताजनक आहे. म्हणूनच हवामानशास्त्रीय घटकांमधील, विशेषतः पिकांमधील बदल आणि त्यांच्या पद्धतींच्या संदर्भात दीर्घकालीन ट्रेंडचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

